सालवार ,, १८८
किरळ अंकास ......................४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे पेस ........०।

Single copy........................4 as

# वऱ्हाडसमाचार.

Advertisement
Below 10 lines...2 Rs
per line over10... 4 as
Repetition per line 3 as

## THE BERAR SAMACHAR.

A... L XXVII | AKOLA | MONDAY 1 JANUARY 1894 | NO 1

पु... २८ ...ोला सोमवार तारीख १ माहे जानेवारी सन १८९४ इ० अंक १

...reso...
...o recount
...amount of good
...e to our country. I...
...ns how to aspire
...; has infused a spirit
... patriotism, brought
...e value of self-sacrific...
...of unity; convey...
... differen...

जा...

...क अमानी हैद्राबाद दे. In... अबकारी (दारू, ताडी (शिंदी), आफू आणि गांजा) विक्रीच्या तारखा सन १८९४—९५ साला करितां खालीं लिहिल्या प्रमाणें मुकरर करण्यांत आल्या आहेत. एलिचपूर जिल्हा आणि उमरावती जिल्ह्या पैकीं उमरावती तालुका शिवाय करून सर्व जिल्ह्यांत दारू, ताडी (शिंदी), आफू व गांजा यांजबद्दल मक्ते हरास होतील.

२. एलिचपूर जिल्ह्यांत व उमरावती जिल्ह्या पैकीं उमरावती तालुक्यांत सदर भट्टींत सरकारी देखरेखीखालीं दारू उतरून ठरीव दरानें मक्त्यानें विकण्याबद्दल नवीन (Still head duty, central Distillery and guaranteed minimum revenue system) व्यवस्था चालू झाली आहे करितां तेथें फक्त ताडी (शिंदी), आफू व गांजा यांजबद्दल मक्ते हरास होतील.

३ आफू व तिच्या बनविलेल्या जिनसा याचा मक्ता आणि गांजा व त्याच्या बनविलेल्या जिनसा याचा मक्ता वेगळा वेगळा हरास केला जाईल.

४. प्रत्येक हरास डिपुटी कमिशनर साहेबांचे कचेरींत दिवसां ११ वाजतां होईल.

बुलडाणा—सोमवार तारीख १२ जानेवारी १८९४.

आकोला—सोमवार तारीख २९ जानेवारी १८९४.

वाशीम—सोमवार तारीख ५ फेब्रुवारी १८९४.

वणी—सोमवार तारीख १२ फेब्रुवारी १८९४.

उमरावती—सोमवार तारीख १९ फेब्रुवारी १८९४

एलिचपूर—सोमवार तारीख २६ फेब्रुवारी १८९४.

५. मक्त्याच्या व हरासाच्या शर्तींचे संबंधाची माहिती जिल्ह्याचे कचेरींत मिळूं शकेल.

के. जे. एल्. मेकंजी,
कमिशनर.
मुल्क अमानी हैद्राबाद.

## CORRESPONDENCE

Ellichpur city
December 28, 1893

Sir,

This place once the Capital of Berar is nearly in a state of decline but of late attempts are being made to restore it at least partially to its former importance. A building for the general Library is being constructed on a grand scale. It is expected to be soon finished. All this the city owes to the leading members of the Library. To the great joy of both the Hindus and Mahomedans alike Mr. Vishnu Hari returned from leave and resumed charge of his duties as Tehsildar.

Besides the 6 Municipal Schools there are at this place two Anglo Vernacular Schools—Anglo Marathi and Anglo Urdu. These Schools are doing well. Last year the 8th standard was introduced in the Anglo Urdu School I am glad to say that all the 5 boys sent up from that class came out successful In your issue of the 18th instant you gave the result of the 8th and 9th standards of the different A. V. Schools in the Province but you studiously omittedf togive the result of the Anglo Urdu School at Ellichpur. I am at a loss to know how to account for it. If the omision is intentional I have nothing to say but if otherwise I wish you would make enquiries and give the result of this school also.

The Tehasil which is the ornament o the city is soon expected to be removed from inside. The site chosen for it is cut—side the city near Dula Rahimansha's holy place. Government appears to have done so to gain the double object of giving the parties required to attend cutchery the benefit of the river and the opportunity of paying respects to Dula Rahimansha. Otherwise there could be found a suitable sight in the city itself. I hear attempts are being made to collect the necessary amount for the introduction of the 8th. standard in the Anglo-Marathi School.

Mr. Vyankatrao Rangrao Sub—Registrar, Ellichpoor, succeeds to the late Mr. Chintaman Rao Apte as Inspector of the Department.

Yours truly
Y.

## विजया दर्शनाचें सोनें

There be none of Beauty's daughters
 With a magic like thee;
And like music on the waters
 Is thy sweet voice to me:
 When, as if its sound were causing
The charmed ocean's pausing,
The waves lie still and gleaming:
And the lull'd winds seem dreaming:
And the midnight moon is weaving
 Her bright chain o'er the deep,
Whose breast is gently heaving
 As an infant's asleep:
So the spirit bows before thee
To listen and adore thee;
With a full but soft emotion,
Like the swell of Summer's ocean.

LORD BYRON.

सुंदरी वृत

बहुत रूपवती कमलानना । जगति देखिपल्या
 मदभंजना ॥
निरुपमा गमते तवचारुता । भुवनिं तुज
 मानव देखता ॥ १ ॥
मधुर पीकरवें तव सुंदरी । परभृता रिघताति
 वनांतरीं ॥
जल समुत्थित वीचि रवापरी । निरवितो रव
 हा तव अंतरीं ॥ २ ॥
उदधिचा लहरीचय अल्पसा । कनकवर्ण पहा!
 नटला कसा ॥
पवन निद्रित तो गिरिकंदरीं । विमल शांति
 फिरे जव भुवरी ॥
मन तयीं गमतें तव सुस्वरे । उदधि चंचलता
 क्षण विस्मरे ॥
कुठुनि एरवीं ही स्थिरता तया । भुलविशी
 जडबुद्धिस तूंच या ॥ ४ ॥

रजनिचा जणुं नाथ निशीं पहा! । पसरितो
 करजाल विशुद्ध हा ॥
उदधि वक्ष हळु स्फुरतें कसें । स्वाचित निद्रित
 डिंभक वक्षसे ॥ ५ ॥
निरखिता तुज मन्मन हें तसें । निवश भीन
 पदीं तव होतसे ॥
शशिकरें उदधि स्फुरतो तसें । भरतसे मन
 सौम्य सुधारसें ॥ ६ ॥

वऱ्हाडसमाचार

मिती मार्गशीर्ष वद्य १० शके १८१५

## नवें वर्ष

आर्या

अंधःकार निमाला, प्राची मुख फांकलें
 सतेजरुची, ।
तरुचीं पुष्पें फुललीं, दिव्यद्युति पसरली नभीं
 रविची. ॥१॥
जलधिवरी हिंडुनिया श्रांत न हा मंदवायु
 वृक्षाचा ।
झाला सुखकर केवळ, देई परितोष सर्व
 विश्वाला ॥२ ॥
प्रातःवींचि उरकुनिया ब्रह्मक्षत्रादि उद्यमीं
 मग्न; ।
भग्नमनोरथहि मनुज केवि टिके जो सदा भवीं
 लग्न. ॥ ३ ॥
ऐशापरी शतावधि वत्सर गेले निघोनि
 महिवरती ।
तरतो भवजलगतीं उद्यमबंधुव, दुजे फुका
 मरती ॥४॥
ज्ञान-तरीचा आश्रय ज्या लोकां ते कधीं न
 डगमगती !
जगतीं गति अन्य नसेः—वाढो सद् ज्ञान
 पाहिजे रीती ॥५॥
देवी 'सुधारणा' ही कुळदैवत आमुची;
 तिचे भक्त ।
सक्त सदा तच्चरणीं; वेचू तिजकारणें स्वतां
 रक्त ॥ ६ ॥
'ढकला पुढें' तियेच्या दीर्घ पताके वरी
 पहा! मोठी।
—काठी ही अंघाला—अक्षररत्नें—दुर्जी जगीं
 मोठी ॥ ७ ॥
विद्युद्वाहन विद्युन्नौका जलवायु यंत्र वा
 दुसरें ।
पसरे तत्सैनिकगण जिंकाया अज्ञवैरि
 भुवरि रे! ॥ ८ ॥
मुद्रणकला तयामाजिं मोठा सरदार शूर,
 धीट, खरा,
नखरा तया नसाहे अभिमानाचा वृथाचि फोल
 जरा ॥९॥
लक्षावधि तत्सेवक 'पत्रें' सर्वत्र ही सदा
 फिरतो ।
रतिमात्र दुर्विनीता न्यायाचरणा क्षणांत ही
 पिटिती ॥ १० ॥
देवी सुधारणेची सत्ताविस वत्सरें पहा सेवा।
हेवा टाकुनि केली— मान्य पडो सज्जनासि
 हा ठेवा ॥ ११ ॥
अद्भुत-विचित्र-दुःखद-सुखदायक- देउनी
 समाचार!
आचार द्वास भजला जन हो! सर्वांस हा
 समाचार ॥ १२ ॥
आश्रय दाते मित्रांहि हितचिंतक आमुचे
 अमित असती ।
वसती दूर तयांतिल कांहीं, सर्वांसि ही असे
 विनंती ॥ १३ ॥
इतुके दिन सर्वांहीं जसा या पसरिला
 उदारकर ।
नरवर तसेचि पुढती पसरो—याचा असो
 अपाचि भर ॥ १४ ॥

नामदार दादाभाई नवरोजी यांस मानपत्र देते वेळीं पुण्याच्या म्युनसिपालिटीनें कळविलें कीं लार्ड रिपन यांच्या कृपेनें स्थानिक स्वराज्याचा अनुभव आला पण आपल्या पराक्रमानें आपण एक राजकीय नवी पाठशाळा स्थापिली आहे. स्थानिक कारभारा पलिकडे आम्हास कांहीं शिकावयाचे आहे हें आम्ही आतां शिकलों. राजकीयधर्माचा निराळा पंथ आपण दाखविला आणि आपल्याच उपदेशानें लोकसमूहास एक नवा राजधर्म कळून येत चालला आहे. राजश्री बाळ गंगाधर टिळक यांनीं स्पष्ट करून सांगितल्या प्रमाणें शेट दादाभाई हे या नव्या राजधर्माचे आदिशिक्षक आहेत. हे उपदेशक आपल्या राजकीय धर्मपंथानें मूळतत्व हें मानतात कीं इंग्रजी राजछत्रा खालीच आम्ही सर्व प्रजाजन आपापले धर्म, ज्ञाती, भाषा वगैरेतील निराळेपणा विसरून एक राष्ट्रीय बनत चाललों आहों. आमच्यांतील निराळेपणा जाऊन आह्मी एक राष्ट्रवाले इंडियन लोक आहों असें आपल्या कृतीनें दाखवूं लागलों आहों हेंच या राजधर्माचें फळ होय. हिंदू, मुसलमान, पार्शी, वगैरे नानाविध जातीचे लोक आपापल्या रूढी मार्गी पलिकडे व ठराविक आचारसमुच्चया पलिकडे सर्व इंडियनवाले एकच आहेत, इंग्रजी प्रजा या संज्ञेनेंच आपला वर्ग दाखविला जात आहे, या प्रजाधर्मानें एकवटलेले आह्मी सर्व राजनिष्ठेनें राज्यकर्त्यां पाशीं न्याय मागूं आणि न्यायमूर्ती राज्यकर्ते आह्मांस ब्रिटिश प्रजेबरोबर सारखे लेखून राज्याचा चिरायूपणा वाढेल आणि राजा व प्रजा यांचा एक मिलाफ होईल असें आह्मी या नव्या धर्मग्रहणानें प्रत्ययास आणून देऊं.

या नव्या राजकीय धर्मांचें बीजारोपण इंग्रजी विद्येनें केलें आहे. प्रसिद्ध मेकाले साहेबांनीं भविष्य केल्या प्रमाणें इंग्रजी शिक-

लेले लोक या राजधर्माचा प्रसार करीत चालले आहेत. त्यांच्या धर्माची दीक्षा ज्यांस मिळाली ते कडक व्रताचे, राजधर्मबंधनें पाळणारे, आणि महाराणी सरकारचे निस्सीम भक्त आहेत. 'राष्ट्रीय सभा' हा त्या राजधर्मांचा ध्वज आहे. 'धर्मसंरक्षणाय संभवामि युगे युगे' हा सिद्धान्त खरा मानिला तर मि. ए. ओ. ह्युम त्या धर्मांचे मठाधिकारी शंकराचार्य खरोखर नव्हेत काय? रा. रा. काशिनाथ गोविंद नातू यांनीं पुण्यास ध्वनित केल्या प्रमाणें नामदार दादाभाई हे बर्क, आणि वुईल्बरफोर्स सारखे आपल्या वक्तृत्वानें इंडिया देश प्रजेच्या पूर्ण स्वतंत्रपणाला नेऊन पोंचवीत आहेत, आणि दास्यत्वा पासून हा देश बंधमुक्त करून 'ब्रिटिश प्रजा' या पदवीच्या थोरवीला आणित आहेत ही गोष्ट स्मरणांत ठेविली ह्मणजे त्यांच्या या नव्या धर्मांच्या उपदेशानें बहुत बहुत लोक त्यांच्या पंथाचे अनुयायी होतील आणि पार्लमेंटांत एकच नाहीं तर अनेक इंडियन गृहस्थ दादाभाईंचे शेजारी सभासदस्थान शृंगारतील असें कोणी भविष्य सांगेल तर तें खरें अक्षरशः होईल असे योग सध्यां खरोखरच नाहींत काय? नामदार दादाभाई हे एकटेच उपदेशक एवढी राजकीय धर्मक्रांती करून टाकीत आहेत असें मोठ्या आनंदभरानें सांगते समयीं नामदार फेरोजशहा मेथा ह्मणाले कीं इंडियन लोकांत राजकीय अंकुर नाहींत, त्यांस राजकीय गोष्टी कळत नाहींत असा जर कोणाचा आक्षेप असेल तर त्यांनीं हा एवढा प्रचंड जनसमूह पुरुष, स्त्रिया, व मुलें मिळून दादाभाई यांचा जो हा अपूर्व स्वागतसमारंभ करीत आहे तो अवलोकन करावा ह्मणजे त्यांच्या डोळ्याचें पारणें फिटेल आणि राजकीय बल इंडियन लोकांचें त्यांस कळून येईल. सहस्त्रावधि जमलेल्या लोकांच्या जयघोषाकडे व त्यांच्या सुप्रसन्न मुद्रेकडे पाहून ना. मेथा सद्‌गदित होऊन ह्मणाले कीं परमेश्वर कृपा करील तर हा प्रस्तुतचा हृदयंगम मानवी खेळ या देशाचें खरोखर हित करील.

## राष्ट्रीय सभा

( लाहोरास झालेली नवव्या वर्षाची बैठक. )

राष्ट्रीय सभेची बैठक पंजाबांत अमृतसर शहरीं भरवावी असें गुदस्ता सर्वानुमतें ठरलें त्या वेळां पासून यंदाच्या समारंभा विषयीं चांगलीशी खात्री येत नव्हती. या देशाच्या एका टोंकाला हें सभास्थळ नेमस्त केलें. राष्ट्रीय सभेचा नवेपणा लोकांमध्यें उरला नाहीं, आणि प्रवास फार लांबीचा व खर्चाचा पडेल ह्मणुन पुष्कळांस मोठी चिंता होती. पण लोकांस या सभेची गोडी लागली आहे, मि. ह्यूम. व दादाभाई हे उभयतां लाहोरास येणार आहेत, आणि आठ वर्षांच्या अनुभवानें लोकांना जे राजकीय शिक्षण प्राप्त झालें आहे या व अशा बहुविध कारणांच्या प्रभावामुळें लाहोरचा समारंभ फार भव्य, रमणीय, व आनंदमय झाला. एक हजारावर प्रांता प्रांतांतून प्रतिनिधी सभेस आले होते. वेशसेवेंत जनसमूह निमग्न व तल्लीन झाला ह्मणजे एका प्रकारें वीरश्री मनुष्यमात्राच्या हृदयांत खेळूं लागते. जे गृहस्थ या आनंदाच्या समयास तो मौज, व तो वर्णनीय देखावा पाहण्यास जाऊं शकले ते खरोखर कृतकृत्य व धन्य समजले पाहिजेत. नेत्रसुख सर्वांस मिळणें संभवनीय नाहीं तरी तिकडील आनंददायक वार्ता श्रवण कराव्या, व्याख्यानें पठण करावीं, निरानराळे विषय समजून घ्यावे आणि दुरस्थास जेवढा लाभ राष्ट्रीय सभेच्या शुभ वर्तमाना वरून होईल तेवढा करून घ्यावा अशी प्रत्येकास जिज्ञासा झाली व प्रत्येकजण तत्परतेनें; उल्हास वृत्तीनें व उत्सुकतेनें राष्ट्रीय सभेची हकीकत ऐकूं लागला ह्मणजे एक मोठा कार्यभाग फलद्रूप झाला व राजकीय शिक्षण लोकांमध्यें पसरलें असें होईल. यंदाच्या सभेची माहिती इत्यंभूत कळण्यास अद्याप थोडा अवधि लागेल तथापि नामदार दादाभाई नवरोजी यांचें संभाषण प्रसिद्ध झालें आहे त्यांतील कांहीं मुद्दे आज खाली देत आहो.

नामदार दादाभाई नवरोजी टाळ्यांचा गजर चालला असतां अध्यक्षस्थानीं विराजमान झाले. सन १८८६ सालीं व यंदा लोकांनीं अध्यक्षस्थानाचा बहुमान गौरवपूर्वक आपणांस दिला ह्मणून सर्वजणांचे आभार मानून नामदार दादाभाई म्हणाले कीं पंजाबाला बाह्य व अंतस्थ अशा दोन जोखिमी आहेत. रशियानें स्वारी केली तर लढाई प्रथम पंजाबाला लढावी लागेल. पंजाबी लोक राजनिष्ठ आहेत व त्यांना आपल्या देशाचा व घरदाराचा अभिमान आहे तेव्हां अखेरचा मनुष्य मरे पर्यंत शत्रूस अवसर मिळणार नाहीं. दुसरी अंतस्थ जोखीम पंजाबी व अन्य लढवय्ये लोक या सर्वांवर आहे. नामदार साहेब बोलले कीं माझ्या समजुती प्रमाणें शौर्य हा गुण न्याय दृष्टी, उदार स्वभाव, आणि विशाल बुद्धि यांच्याशीं संबद्ध व संकलित असतो. इंग्लिश लोकांच्या वर्तनांत हा गुणानुसबंध स्पष्ट कळतो आणि मानव धर्मांतला सारखेपण या देशच्या वीर मंडळांतले हे गुण लयास नेऊं शकत नाहीं. हे शूर लढवय्ये पंजाबी व इतर लोक क्षुद्र विचाराचे, अप्पलपोटे, व मंद बुद्धीचे आहेत असें म्हणून जे त्यांची, नीच प्रकारें अवहेलना करीत असतील त्यांनीं या गोष्टी लक्ष्यांत घ्याव्या कीं पंजाबी लोकांनीं आजच्या बैठकीला सर्व इंडियन लोक एकत्र केले, मला परकीय धर्मवाल्याला सहस्त्रावधि योजना वरून आगत्यानें बोलवून अध्यक्षस्थानीं आरूढ केलें, आणि इंग्लंडांत व इंडियांत सिव्हील सरव्हिसची परीक्षा एका वेळीं घेण्या बद्दल पार्लमेंटांत ठराव झाल्या बरोबर त्या ठरावाचें आपल्या संमतीनें अगोदर पुष्टीकरण केलें. वरील आक्षेपाचें उत्तम निरसन या पेक्षा जगांत अन्य कोणतें असणारें आहे?

सर्व लोकांच्या वतीनें नामदार न्यायमूर्ती तेलंग यांच्या मरणाबद्दल दुःख प्रदर्शित करून नामदार दादाभाई ह्मणाले कीं के. तेलंगाच्या मरणामुळें त्यांचें वक्तृत्व, परिणामावर दूर दृष्टी, जाडी विद्वत्ता, सर्वमान्य विचार, व त्यांचें पुढारीपण या सर्वांस राष्ट्रीय सभा व लोक मुकले. तथापि राव बहादूर रानडे यांस लार्ड हारिस यांनीं त्या जागीं नेमिलें ही परम संतोषाची गोष्ट होय. या विद्वद्रत्नाची योग्य कदर झाली. तसेंच अलहाबाद हायकोर्टांत जस्टिस महमद यांच्या जागीं ना० प्रमादचरण बानर्जी यांस नेमिलें या बद्दल लार्ड किम्बरले यांचे आभार मानले पाहिजेत. जुरीची न्यायपद्धति बंद करण्याचा हुकूम त्यांनींच रद्द केला हीं व अशीं त्यांची सत्कृत्यें आपण कृतज्ञता पूर्वक स्मरलीं पाहिजेत.

राष्ट्रीय सभा फार उपयुक्त संस्था झाली आहे असें सांगते वेळीं नामदार दादाभाई म्हणाले कीं १८८५ सालीं ८० सभासदांनिशीं पहिली बैठक झाली आणि जे ठराव झाले त्यांचा विस्तार व फलोद्गम गेल्या आठ वर्षांत झाला आहे ब्रिटिशराज्याचा महिमा व उत्कृष्टपणा दर्शविणारी 'राष्ट्रीय सभा' हीच मोठी खण होय. ब्रिटिश राज्याच्या महतीचें चित्र दाखविणारी 'राष्ट्रीय सभा' ही खरी चित्रशाळा होय. प्रतिनिधि निवडण्याचें तत्व कायदे कौंसिलांस कसें बसें तरी लागू केलें आहे पण त्या मुळें राष्ट्रीय सभेंतीलच कित्येक प्रतिनिधी कायदे कौंसिलांतून सभासद झाले आहेत. उदाहरणार्थ, नामदार मेथा, दुर्भंगाचे महाराज, डब्ल्यू. सी. बानर्जी, सुरेंद्रनाथ बानरजी, रंगय्या नायडू, शेतलवाड, चारुचंद्र मित्र हीं नांवें सांगून अध्यक्षांनीं आणखी कळविलें कीं निवडानिवडींत धर्म व जात याचा कोणी विचार न करितां योग्यता व राष्ट्रीय कल्याण या गोष्टी कडे मताधिकारी लोकांचें लक्ष्य होतें. शिकलेले सवरलेले लोकच जनसमूहाचे मुख्य पुढारी असले पाहिजेत ही गोष्ट विचारांस जुळते कशी हे दाखवितांना नामदार दादाभाईंनीं सर बार्टल फ्रोअर, लार्ड डफरीन व इंडिया सरकार यांच्या विधानांचा उल्लेख केला आणि बोलले कीं शिकलेले लोक ब्रिटिश राजपद्धतीचे उपदेशक आहेत आणि त्यांच्याच अंतःकरण पूर्वक राजनिष्ठेच्या, एकीकरणाच्या व मिलाफाच्या वर्तनानें ब्रिटिश राज्य चिरकाल राहील तेव्हां इंग्रजी विद्येनें संस्कृत झालेल्या विद्वानांच्या हातून इंग्रजी राज्य लयास पोंचेल असें म्हणणें खोटें आहे असें राज्यकर्ते जाणतात. यावरून विचाराच्या बाजूनें कोणीही सुज्ञ म्हणेल कीं सरकारनें 'राष्ट्रीय सभे' वर आपला पूर्ण विश्वास ठेऊन तिला आपलीशी करावी आणि आपल्या विरुद्ध राहू देऊं नये.

(पुढें चालेल.)

## The Berar Samachar

MONDAY JANUARY, 1, 1894

The past nine years of the Indian National Congress have made it familiar to every household. It is the most cherished and favourite institution in the land of all races alike whether Hindoo, Muhamedan, Parsi or Sikh. It has attained its present enviable and esteemed character owing to the trying ordeals it has undergone and the heavy rebuffs it has withstood. Our interest in it increases with its years. The Christmas is not now a time of festivity and rerejoicing exclusively for the Europeans but the Indians have shrewdly contrived to make it a holiday in their own way-as far-reaching and joyful as the Diwali or the Durga Puja festival; for it is in the last days of December that our eminent leaders meet in a sumptuous pla[illegible] tupous manner to cas[illegible] cal accounts and strike [illegible] for the next year; and to [illegible] what progress and profits [illegible] made and what losses a[illegible] incurred [illegible] e outset, it [illegible] oppo[illegible] [illegible]ing and formida[illegible] its [illegible] and magnit[illegible] [illegible] it [illegible] of [illegible] H[illegible] can it [illegible] phenome[illegible] [illegible] point [illegible] our v[illegible] of peoples [illegible] various ra[illegible] gions, creeds and colours [illegible] with magnificence carrying [illegible] abstruse proceedings in [illegible] foreign to them all and in a [illegible] which would do credit to [illegible] civilized assembly in the most civilized part of the world? Can there be any better monument of the political genius of the worthy sons of India—the best product of English Education? Can any body who has head to think and heart to feel deny the fitness of the Indians to the admission of the much coveted privileges? Is any more emphatic proof needed to convert a perverse mind to our cause? Numerous objections were taken to the National movement but almost all of them have been cut away easily and to the very letter. One of them viz that the martial races—particularly the Sikhs—instead of being in sympathy strongly disowned the views of the Congress and threatened that the Government by adopting its proposals would arouse new animosities—hitherto unknown and too dreadful to be easily pacified—had remained, up to now formally uncontradicted and the Session at Lahore by its success gave it a deadly blow as was already calculated. The hono'ble Mr. Dadabhai Naoroji M. P. has most eloquently referred to the internal responsibility in the memorable words we quote below:—

"The Internal responsibility which at present rests upon the Punjabis and other warrior races of India is this. I have always understood and believed that manliness was associated with love of justice, generosity and intellect. So our British tutors have always taught us and have always claimed for themselves such character. And I cannot understand how any one could or should deny to your and other manly races of India the same characteristics of human nature. But yet we are gravely told that on the contrary the manliness of these races of India is associated with meanness, unpatriotic selfishness and inferiority of intellect, and that therefore like the dog in manger, you and the other warrior races will be mean enough to oppose the resolution about simultaneous examinations, and unpatriotic and selfish enough to prevent the general progress of India. Can offence and insult to a people and that people admitted to be a manly people, go any further? Look at the number of Punjabis studying in England. Now this happy coincidence of this meeting in Punjab: you, considering every son of India as an Indian and a compatriot, have invited me—not a Punjabi, not a Mahomedan, nor a Sikh—from a distance of thousands of miles to enjoy the honour of presiding over this Congress and with this gathering from all parts of India as the guests of the Punjabis you conclusively once for all and for ever set the matter

[illegible] Punjabis with all [illegible] earnesty desire the [illegible]inations as the only [illegible] justice can be done [illegible] of India, as this [illegible]atedly resolved."

It is [illegible] to recount in a [illegible] the amount of good the [illegible] done to our country. It has [illegible] Indians how to aspire [illegible]; has infused a spirit [illegible] patriotism, brought [illegible] the value of self-sacrifice [illegible] force of unity; conveyed to [illegible] minds the real difference between the British and Indian Nations—that the success of the former [illegible] sincerity and perseverence and the degeneration of the latter is due to laxity and disorganisation, and more than all what is gratifying te note it has proved, their loyalty and capacity to enjoy higher privileges.

The previous Congresses including the last one were held on a very grand scale and entailed heavy expenditure. That was all necessary to make a lasting impression that political life and vigour were not all extinct and required to be kindled by enthusiastic speeches. We do not repent of the money so lvishly expended but we question the propriety of throwing away large sums when the necessity has passed. We must however guard ourselves from being supposed that our conduct. at the previous gatherings was indicative of anything like prosperity or surplusage. If it was significant at all, it illustrated that the Indians are too much anxious and zealous for their emancipation and regeneration. It is our earnest hope that congresses hereafter would be less pompous and showy than hitherto for we have as yet great many things to carry to successful termination. It is no use to empty our purse and waste our energies in hollow but tempting spectacles. We should like to see the next deceade employed in getting up agitation in England—as strong, prevailing and effective as that in India It is there that we are to fight our critical battles; it is there that we must lodge our final appeal, and it is there that we must seek for perfect justice and equality. We must hold similar congresses in the United kingdom of the best chosen delegates and enlighten the British public with the true state of affairs. To this end we must spare our energies and save our money. Besides we have the assuarance of our veneroble Grand Old Man the best authority in these matters—that the British nation is open to reason and conviction and the fact of the Indian affairs being so long neglected and carried with a high hand is mainly attri—butable to its being completely left in the dark. Let us strike the evil at its root and our object is brought half way near.

## वऱ्हाड

वऱ्हाडचे पोस्टल सुपरिनटेंडेंट मि. क्लिफर्ड यांची बदली ब्रह्मदेशाकडे झाल्या कारणानें त्यांच्या जागीं हद्दीचे इनस्पेक्टर रा. रा. मुकुंदराव गोविंद पावनसकर यांस बढतीवर इकडे नेमिलें. या प्रांतीं हे पहिलेच नेटिव सुपरिनटेंडेंट आहेत.

आह्मास लिहिण्यास फार दुःख वाटतें कीं, रा. रा. आनंदराव गोविंद चांदेकर, पोस्ट मास्तर इलिचपूर हे गेल्या २३ वे तारखेस स्वल्प ज्वराच्या दुखण्यानें निवर्तले. हे गृहस्थ सुस्वभावाचे, वाणीनें रसाळ व बाणीदार असत. यांच्या मरणानें लहान मुलें-बाळें उघडीं पडलीं ! ईश्वरीच्छे पुढें इलाज नाहीं !

मि. मिनास कमिशनरचे आफिसांतील ६० रु० चे क्लार्क हे रजेवर असतांना या आठवड्यांत मरण पावले. मरण कां व कसें आलें हें संदिग्ध आहे !

मे० कर्नल मेकेंझी साहेब कमिशनर यांची स्वारी ता. ८ जानेवारी सोमवार रोजीं येथें येऊन दाखल होईल.

मि. सी. शामराव अन्याची यांस पहिले वर्ग माजिस्ट्रेटचे अधिकार देण्यांत आले.

मि. रस्तुमजी फरदुनजी यांस पांच हजार रुपयांवरील रकमेचे अव्वल दिवाणी दावे आणि डेपुटी कमिशनचे तांब्यांतील कोर्टांतील दाव्या वरील आपिलें चालविण्याचे अधिकार देण्यांत आले.

दक्षिण महाराष्ट्रांत नांवाजलेली 'शाहूनगरवासी' नाटककार मंडळी येथें येऊन तिनें परवा रात्रीं 'कांतिपूरचे दोन गृहस्थ' व 'झोंपी गेलेला जागा झाला' हा हास्यकारक फार्स असे दोन प्रयोग करून दाखविले. महाकवि शेक्सपिअर यांच्या नाटकाच्या आधारानें पहिली गोष्ट रचिलेली आहे. ही प्रतिकृती मूळकाव्याच्या मानानें कितपत उतरली आहे हें आह्मी आज सांगू शकत नाहीं तरी मराठींतील संविधानक फार चित्तवेधक साधलें आहे. प्रतापराव, कमळा, सरजेराव व मित्रचंद्र या पात्रांनीं आपलीं कामें उत्कृष्ट बजावलीं. फार्सांतील गोष्ट आरबी गोष्टी पैकीं अबुलहसनच्या गोष्टी सारखी आहे ती किती उत्तम आहे हें आह्मी नव्यानें सांगणें नको. भवानरावाचें काम सर्वांस फार मौजेचें वाटलें. गद्यात्मक नाटका वरील लोकांची श्रद्धा उडाली आहे तथापि या खेळामध्यें प्रेक्षकांचीं मनें चांगलीं रंजलीं होतीं. गाण्याचे आलापला भुळणारी व पुराणांतील नाटकें पहाणारी मंडळी देखील हा खेळ पाहून फार आनंदित झाली. नाटकच मूळ तसें मौजेचें आहे आणि त्याचा प्रयोगही चांगला वठला.

### नोटीस

गुलाबराव गोविंदराम मा० सुरजमल गुरूप्रताप मारवाडी दुकान अकोले व महमद यासीन वल्द सेखचांद चुनेवाले राहणार अकोले ताज नापेठ यांसी— खाली सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें मौजे पिंगळ तालुके मुर्तिजापूर जिल्हे उमरावती ह्या जहागिरींत तालेबुल्लाखा उर्फ गुलाम हुसेन वल्द खाजे न्यामतदुल्लाखा जाहगिरदार याचा $\frac{1}{3}$ हिस्सा व नरूल्लाखा वल्द खाजे न्यामतदुल्लाखा जाहगीरदार याचा $\frac{1}{3}$ व बीजान बेगम व चाणी बेगम जाहगीरदार यांचा $\frac{1}{3}$ हिस्सा एकूण सर्व जमीन आमचे पाशी वर लिहिलेले हिस्सेदारानीं अजमासे रु. ९००० नऊ हजार यास गहाण ठेविले आहेत. पैकीं बीजान बेगम व चाणी बेगम आणि नुरुल्लाखा जाहगिरदार याजवर आह्मी गहाण मालावर हुकूम नामे मिळविले आहेत व बीजान बेगम व चाणी बेगम इचा $\frac{1}{3}$ हिशाचे जाहगीर जमीनीतील लांकडे आह्मी जप्त केले आहेत. असे असून सदर्हू जाहगीर गांवचे जमीनींतील लाकडे तुह्मी उभयतांनी अकोल्यास तुमचे घरीं आणिले आहेत व आणीत आहात व सदर्हू गांवचे जमिनीत वाकलेले लाकडाची तोडलेली गंजी अजमासे ७९ टनाची दिली होती ती ही तुह्मी अकोल्यास आणिली आहे सदर्हू जमिनींत काटवण अजमासे रुपये १००० चे उभे आहे तेंही तुह्मी तोडून आणित आहात याजकरितां ह्या नोटिशीनें तुह्मा उभयतांस कळविण्यांत येतें कीं तुह्मी उभयतांनीं जीं लाकडे अकोल्यास आणिली आहेत ती कोणास विकू नये व जे उभे काटवन आहे तें तोडूं नये. जसेचे तसेच कायम ठेवावें आणि अकोल्यास तुह्मी आणिलेले लाकडें आमचे कहेस आणून द्यावे अथवा सदर्हू लाकडावर आमचा गाहणाचा हक्क आहे सबब आमचे रुपये हिशोबानें निघतील ते तुह्मी आह्मास नोटीस पावल्या वरोबर आणून द्यावेत तसे न केल्यास आमचे गाहाण मालावर असलेले सर्व रुपाया बद्दल तुह्मास जबाबदार धरलें जाईल व रितीप्रमाणें तजवीज करण्यांत येईल कळावे. ता. २० माहे दिसेंबर सन १८९३ इसवी.

( सही मुसलमानींत )

सेख इब्राहीम वल्द महमद अमीर चुनेवाले दस्तुर खुद

### नोटीस.

रा. रा. रामचंद्र आत्माराम रंगारी वडे राहणार कसबे नांदुरा तालुके मलकापूर जिल्हा बुलढाणें यांस नोटीस देणार जयराम लालचंद रंगारी राहणार कोळंबे उर्फ रसुलपूर तालुके मलकापूर जिल्हा बुलढाणा नोटिसीनें असें कळवितो कीं तुजला मी तारीख १८ नोवेंबर सन १८९२ रोजीं मुखत्यार करून मुखत्यारपत्र दिलें होतें तें आम्ही रद्द केलें आहे. व तुम्ही आमचे मुखत्यारचे काम कोणच्याही प्रकारचें कोणचेच काही इतकें करूं नये. हें तुह्मांस कळावें.

तुम्हांस आम्ही मुखत्यार करून मुखत्यारपत्र दिलें त्या दिवसापसून मुखत्यारपत्र रद्द केलें त्या दिवसा पर्यंत जी जी कामें तुम्ही आमची मुखत्यार या नात्यानें केलीं आहेत त्या सर्वांचा हिशोब कागदपत्र देशावरी सुद्धां नोटीस पावल्या पासून चार दिवसाचें आंत आणून अमचा सर्व हिशोब रीतवार समजून द्यावा. असें केलें नाहीं तर तुम्हांवर रीतीप्रमाणें काम चालवून आमची जी नुकसान वगैरे झाली असेल ती व जी होईल ती ह्या नोटिसीचे व इतर योग्य खर्च जो होईल तो त्या सर्वांसह भरून घेतली जाईल ह्मणून दिली नोटीस सही ता० २८ माहे डिसेंबर सन १८९३ इ०

( सही. )

जयराम वा॥ लालचंद रंगारी राहणार दस्तूर खुद.

## जाहिरात.

मी खाली सही करणार जयराम लालचंद रंगारी राहणार कोळंबे उर्फ रसुलपूर तालुके मजकूर जिल्हे बुलढाणे या जाहिरातीने सर्वत्र लोकास असें जाहिर करितो कीं, रामचंद्र आत्मारामसा रंगारी राहाणार कसबे नांदुरा तालुके मलकापुर जिल्हे बुलढाणा यास मी ता० १८ माहे नोवेंबर सन १८९२ इसवी रोजी मुखत्यार करून मुखत्यारपत्र दिलें होतें. व त्या प्रमाणें मुखत्यारीचें काम रामचंद्र आत्माराम हा करीत होता परंतु त्याच्या काम करणेंत आम्हांस कांहीं दखल वाटत आहे. व आमचा हुकूम तो मानीत नाहीं याज करीतां त्याचे मुखत्यार पत्र आम्ही रद्द केलें आहे व त्याजकडून काम ही काढुन घेतले आहे तर सुदरहू इसम आमच्या करितां आमची स्थावर जंगम जिनगी व व्यापार वगैरे कोणास गाहाण, खरेदी किंवा कर्ज वगैरे काढून व इतर जेजे म्हणून व्यवहार असतील ते करून कोणास देईल अगर कागद वगैरे करील तर सदर्हू लिहिलेला कोणचा व्यवहार व इतर ही आम्हांस मान्य नाहीं. हें सर्वांस कळावे. जर कोणी इतके उपर केल्यास त्याज बद्दलचे सुद्धा सर्व प्रकारची जबाबदारी ज्याचे त्याजवर आहे. आम्हांस कोणच्याही प्रकारानें मान्य नाहीं म्हणून दिल्ही जाहिरात सही ता० २८ माहे डिसेंबर सन १८९३ इसवी.

( सही )

जयराम लालचंद रंगारी दस्तुर खुद.

## जाहिरात.

जाहिर खबर सर्व लोकांस— व तुकाराम वा॥ लक्ष्मण अमोदे राहणार रेळ तालुके आकोट—मारुती वा॥ लक्ष्मण—व महादू वा॥ लक्ष्मण—सोनाजी वा॥ लक्ष्मण राहणार रेळ तालुके आकोट यांस देणार बजाई मर्द तुकाराम राहणार कडतवाडी तालुके आकोट इजकडून देण्यांत येतें कीं, तुकाराम हा माझा लग्नाचा नवरा असून त्यांचपाशी लग्न झाल्या पासून तो मजला टाकून गेला. नंतर आठ नऊ वर्षांनीं एकवार आला. तो बाटला होता त्यास जातीने शुद्ध करून घेतला. नंतर मी त्याचे बापाचे घरी त्यानीं नेल्यावरून गेले. त्याचे पोटचा मजला गर्भ राहिला. नंतर तो सुमोर पांचचार महिने राहून मी गरोदर असतां पुन्हा जो निघून गेला त्यास सुमोरें नऊ दहा वर्षे झाली पुन्हा परत आला नाहीं व कोणते गांवी आहे त्याचा पत्ता मजला व वर लिहिलेले त्याचे भाऊ यासही नाहीं. तो गेल्या पासून मी आपले बापाचे घरी राहून कांहीं त्यानें व मी कांहीं कर्ज काढून आजपर्यंत उदरनिर्वाह केला. आता मला बाप भाऊ वगैरे खाण्यास घालीत नाहींत व कर्जही मिळत नाहीं या मुळें मी अन्नास मोताद झाली आहे. यावरून सर्वांस व त्याचे भावास कळवितें कीं ही जाहिरखबर पोंचल्या पासून पंधरा दिवसाचे आंत त्यांनीं माझे नवऱ्याचा पत्ता लावून त्याजकडे मजला पोंचवून द्यावें अगर त्यानीं मजला व माझे मुलाची अन्नवस्त्राची सोय करून द्यावी. तसें न केले तर मी निरुपायास्तव जाती धर्माप्रमाणें गंधर्व करण्याचा विचार करीन. मग तुमचे—गुन्ह्यांत न येतां एकंदरींत मजला सुमोर १८ वर्षे नवरा टाकून गेला तर बारा वर्षां वर काळ झाला त्याचा तरी शास्त्रा प्रमाणें—मजवर कांहीं हक्क राहिला नाहीं हें सर्वांस कळावें ता० २९।१२।९३ इ०

( सही )

बजी मर्द तुकाराम निशाणी नांगर.

## वर्तमानसार

निझामाच्या कारभारी मंडळांत कांहीं फेरफार होऊन एक रिविनियु बोर्ड झालें असून त्यांत एक साहेब मुख्य आहे.

हिंदुस्थानचे नवे गव्हरनर जनरल लार्ड एलजीन हे ता. २० किंवा २१ जानेवारी रोजीं मुंबईस येतील व ता. २२ रोजीं कलकत्त्यास जाण्या करतां मुंबईहून निघतील.

जपानचा खनिज कोळसा हिंदुस्थानांत येण्याची सुरुवात झाली आहे.

ईस्ट इंडिया लोन बिल ता. १८ रोजीं पार्लमेंटांत सर्वानुमतें तीनदा वाचून पास झालें.

काळ्या गोऱ्यांच्या इन्साफाचा हा पुढील मासला आहे. तीन गोरे लष्करी कामदार ता. १२ रोजीं शिकारीकरतां बाहेर गेले. चांडेडवाडी गावांतून परत येत असतां ते वाट चुकले व गांवातल्या इसपखान नावाच्या प्रसिद्ध माणसाच्या घरांत शिरले. इसपखा गातळग कोचीखान यानें तुम्हास इकडून जातां येणार नाहीं असें त्यांस हिंदुस्थानींत सांगितलें. तें त्यांस समजलें नाहीं व त्यांचें इंग्रजी बोलणें कोचीखानास कळलें नाहीं. इतक्यांत पुष्कळ लोक जमले व गावकरी व ते तिघे यांच्यांत मारामारी सुरू झाली. लोकांनीं दगडमार चालविल्या वरून एका इंग्रजानें गोळी घालून कोचीखानास ठार करून दुसऱ्या एकास घायाळ केलें. गावकऱ्यांनीं त्या तिघांस ठोकून त्यांच्या बंदुका हिसकून घेतल्या. गावकऱ्यांवर दंग्याचा आरोप असून गोऱ्या तिघांवर खुनाचा आहे, तरी ते तिघे जामिनावर खुले आहेत. इन्साफ अजून होणें आहे असें कलकत्त्याची पत्रें सांगतात.

सर डुरंड सांगतात कीं अफगाणिस्थानची राज्यव्यवस्था चांगली आहे. त्यांतील लोक चांगले संतुष्ट असून भरभराटींत आहेत. बहुतकडे सर्व शांतता आहे. देशावर अमिराची सत्ता चांगली स्थाईक झालेली आहे. अफगाणी लोक जात्याच थोडे दांडगे व हूड असल्यामुळें क्वचित कांहीं कारणानें एखादे वेळ कांहीं गडबड होईल, पण एकंदरीनें अमिरानें आपला अंमल पूर्णपणें बसविला आहे. आमचा सत्कारही फारच चांगल्या रीतीनें केला. अफगाण लोकही चांगले असून त्यांतील लोक आपलें काम करण्याविषयीं मोठे उत्सुक व तत्पर असे आहेत. अफगाणिस्थानांतील लोकांचें मन इंग्रजांच्या विरुद्ध आहे असें मानण्यासही कांहीं कारण नाहीं. त्यांचा देश घेण्याची आमची इच्छा नाहीं अशी समजूत असल्यामुळें ते आमच्याशीं चांगले मित्रत्वानें वागले. आह्मास पाहाण्याकरतां जलालाबाद व काबूल येथें आमच्या भोंवती पुष्कळ लोक जमले होते, पण त्यांच्यांत कोणत्याही प्रकारचें कांहीं विरुद्ध मत दिसलें नाहीं. अमिर हा एक फार कडक राजा आहे आणि इंग्रजांशीं दोस्त असण्याविषयीं फार उत्सुक आहे. त्याचें नाणें रुप्याचें असून तें चांगलें आहे, व पोष्टाची व्यवस्थाही आहे. त्यांचे डाक ने आण करणारे रनर सगळ्या देशभर असून रोज ४० पासून ९० कोंस पर्यंत चालणारे आहेत. हल्लींचा अमीर गादीवर बसल्यापासून देशाची चांगली सुधारणा व भरभराट होत आहे.

हिंदुस्थान व काबूल यांच्या दरम्यानचा व्यापार अमिरानें आयात व निर्गत जकात बसविल्यामुळें बराच कमी होत चालला आहे. १८९२ च्या अगष्ट पर्यंतच्या पाच महिन्यांत हा व्यापार ४२,७९,०७० रुपयांचा झाला होता त्याच्याबद्दल १८९३ च्या त्याच पांच महिन्यांत २८,४३,९८९ चा झाला असें सांगतात.

आसाम सरहद्दीवरील दंगेखोरांच्या गडबडीची कांहीं जास्त बातमी नसून सर्व शांतता आहे असें सांगतात

बलुचिस्थानच्या हायकोर्टांत एक खुनाचा खटला चालू असून त्यांत काजी जलालुदिन नावाचा माणूस आफीशियल सेटलमेंन्ट आफीसर सामील आहे. या खटल्याच्या योगानें कटा येथील नेटिवांत मोठी चळवळ सुरू आहे. या कैदीचा इन्साफ पूर्वी एकदा होऊन त्यास फाशाची शिक्षाही झाली होती पण आतां पुन्हा चवकशी सुरू झाली आहे. बलुचिस्थानच्या एजंट गव्हरनरजनरलचे भटाची अजीमुद्दीन हे प्रासिक्युटर असून एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर दिवाण गणपत राव हे आरोपी तर्फेनें वकीलीचें काम करणार आहेत. बलुचिस्थान हा लहानसा सरहद्दीवरचा इंग्रजी टापू असून तेथें हायकोर्टही आहे हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.

रशियाच्या राजधानींत रशिया व चीन यांच्या दरम्यान पामीरच्या हद्दीच्या संबंधानें बोलणें चाललें आहे. ठा० अ०

बहिणीची बंधुप्रीति— एका प्रत्यक्ष पहाणाऱ्या युरोपियनानें प्रसिद्ध केलें आहे कीं, "भोपाळच्या राज्यांत आपला बंधु कर्ज बाजारी पणामुळें कैदेंत पडला होता, त्याला सोडविण्याकरितां त्याच्या बहिणीनें सिद्याच्या लष्करांत लष्करी शिपायाची नोकरी करून द्रव्य मिळविलें. व भावाची सुटका केली. ती पुरुषवेषानें लष्करांत राहिली असतां तिचें वर्तन फारच निर्मळ होतें दोन वर्षें पर्यंत तिच्या स्त्रीत्वाविषयीं कोणासच संशय आला नव्हता. परंतु ती एकातांत स्नानास बसली असतां एका शिपायास ती गोष्ट समजून आल्यामुळें, ही बायको आहे असा परिस्फोट झाला, परंतु तशाही स्थितींत पुरुष वेषानें तिनें नोकरी केली. पुढें जेव्हां तिची सर्व हकीकत श्री. सिंदेसरकारच्या कानांवर गेली, तेव्हां त्यांनीं तिला मोठ्या सन्मानानें तिच्या इच्छे प्रमाणें रुपये देऊन, तिच्या भावाची सुटका करण्यास साह्य केलें. तोंपर्यंत या बाईनें अनेक रीतीनें कष्ट सोसले. व आपलें शुद्धाचरण राखलें, या बद्दल सर्व लोक तिची स्तुति करीत होते." हे बंधु भगिनीद्वय हिंदु होते.

सापाची शिकार करणारा एक तऱ्हेचा 'सेक्रेटरी' नांवाचा पक्षी दक्षिण आफ्रिकेंत आहे. सापापासून व तशाच विषारी किड्यापासून रक्षण करण्याकरितां तिकडचे लोक या पक्षाचा प्रतिपाळ करितात, इतकेंच नव्हे तर त्या पक्ष्यांना कोणा मनुष्यानें मारल्यास त्यास सरकारांतून शिक्षा करण्यांत येते. कसाही साप असला तरी हा पक्षी त्याच्यापाशीं हळू हळू जाऊन, एका पायानें त्यास धरून व पंख आडवे धरून, आपल्या दुसऱ्या पायाचे सपाटे मारमारून सापास ठार करितो व तात्काळ गट्ट करून टाकतो.

योगसाधन करणारा अंबाला येथें नुकताच एक बैरागी आला होता. त्यानें पुष्कळ युरोपियन लष्करी व वैद्यकीय खात्यांतल्या कामगारांपुढें योगसाधनाचा प्रयोग केला. तो बेशुद्ध पडला असतां एका डाक्टरानें त्याची चांगली परीक्षा केली, तर त्या प्रेतवत् पडलेल्या शरीरांत जीव कोठेंच दिसेना. नंतर त्याच्या चेल्यानें थोडा वेळपर्यंत त्याच्या कुशा चोळून त्यास उठविलें. पु. वै.

हैदराबाद येथील राज्यव्यवस्थेंत बराच फेर बदल होईल असा रंग दिसतो.

हिंदुस्थानांत येणाऱ्या चांदीवर कर बसविण्याचा सरकारचा विचार दिसतो.

चीनच्या मनांतून मर्थेब ब्लिड आपल्या कडे ठेवण्याची आहे.

असामच्या सरहद्दीवर दंगा होण्याची भीति आहे करितां १ गुरखा लोकांची पलटण तयार ठेविली आहे.

रंगूनमध्यें एक कंपनी विजेच्या दिव्याचें काम पत्करण्यास तयार आहे.

हेसूरच्या रेशमी कापडाला शिकागो प्रदर्शनांत बक्षीस मिळालें.

मसोवा येथें इटालियन व दरवेशी लोकांची मोठी लढाई झाली.

हैद्राबादच्या नव्या दिवाणांनीं नवा सुधारणा करण्याचें आरंभिलें आहे. लोकांच्या फिर्यादी ऐकण्याकरितां नित्य सकाळीं आपला दरबार भरीत असतात कोणीही गेला तरी भेट होते ही पाहिली सुधारणा झटली पाहिजे.

नवीन शोध अथवा लोखंडी लढाऊ शिपाई स्पेनिश सरकारला एका शोधकानें असें कळविलें आहे कीं, आपणांस दोन लक्ष पौंड दिल्यास जो मेलीला येथें मूर लोकांवर स्वारी करितो, मी आपल्या बरोबर स्वतः नवीन तयार केलेले शंभर शिपाई मात्र येईन; हीं यंत्रें लोखंडाचीं बनविलेलीं आहेत. यांमध्यें घड्याळासारखी रचना असून किल्ली दिल्याबरोबर तीं चालूं लागतात. जे दर मिनिटाला चाळीस बार सोडतात त्याच्या पोटामध्यें पुष्कळ दारूगोळा सांठविलेला असतो; हा लोखंडी शिपाई शत्रूच्या हातीं लागल्यास विजेच्या तारेनें त्याच्या डोक्यांत सांठविलेल्या डायनामाईटला आग लागून सुरुंगासारखा एकदम भडका होतो. असले अजिंक्य योद्धे समरांगणांत यावे अशी आमची फार इच्छा आहे! सु. प.

नोटीस

रा. रा. शिवलाल गुलाबचंद साहू दुकान जाशी पळसी तालुके जळगांव वऱ्हाड या दुकानचा वहिवाटदार शिवाराम यांस नोटीस देणार शामी मर्द इशराम तेलीण वस्ती पातुर्डें तालुके जळगांव जिल्हे अकोलें. नोटिशीनें असें कळवितें कीं माझी आई नवला बाई ही मय्यत झाली त्यावेळीं मी पळशी येथें मांदी होते सबब पंचमार्फत माझे दागिने व रोकड रुपये तुमचे येथें ठेविले ते येणें प्रमाणें:—

रोकड रुपये ७००, दागिने— दंडवाळ्या जोड १ वजन ३३। चांदीचे; कोपरवाळ्या जोड, १ वजन १८।।।, कडी चांदीची जोड १ वजन ३१, बाळी सोन्याची वजन मासे किंमत रुपये ११; एकूण चांदी वजन भार ८३ किं. रु. ८३ सोन्या बद्दल रुपये ११, एकूण सर्व मिळून ७९४ तुमचे येथें मिती अश्विन शुद्ध ११, तारीख २१ आक्टोबर सन १८९३ इ. रोजीं अनामत ठेविले. व मी नंतर आपले नवऱ्या बरोबर पातुर्ड्यास आली. माझी मांदगी दुरुस्त झाल्यावर मी आपले रुपये व ठेविलेले दागिने मागण्या करितां एकदोन वेळा आले असता तुम्ही पंचाची अडचण दाखवून मजला परत खाली पाठविलें. करितां नोटीशीनें कळवितें कीं नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचे आंत पातुर्ड्यास माझा सदरी लिहिलेला माल मजला देऊन माझी सहीची पावती घेऊन जावी. मी ज्या वेळीं स्वतां तुमचे कडे ठेविलेली सदर्हु अनामत मागण्यास आले त्या वेळीं तुम्ही पंचाची अडचण सांगितली. सदरील अनामत माझी आहे व पंचाची नाहीं. तुम्ही पेठेचे साहू लोक तुम्हांस सर्व कानू कायदा ठाऊक असून मजला विनाकारण त्रास दिला व ही नोटीस देणें भाग पाडिलें आतां या नोटिशीनें तुम्हांस जगजाहीर रीतीनें कळवितें कीं पंचांचें कांहीं कारण नाहीं. तर सदरील मुदती प्रमाणें सदरील माझी अनामत मजला देऊन पावती घेऊन जावी. असें न केल्यास तुम्हांवर रीती प्रमाणें फिर्याद करून अखेर निकाल होई पर्यंत जो खर्च होईल तो या नोटिशीचे खर्चासह सर्व नुकसानी तुमचे पासून भरून घेतले जाईल. म्हणून दिली नोटीस. कळावें तारीख २१।१२।९३ इसवी.

(सही.)

सहीची निशाणी बांगडी
शामी मर्द इसराम तेलीण
राहाणार पातुर्डा हिच्या हातची असें.


## जाहिरात.

हे पाक-पद्दा व शिवाय ता. २६।१२।९२ इ. चे वैदर्भांत व शुद्धवऱ्हाडी पत्रांत छापलेल्या औषधी हमेशा मिळतील.

ह्या हेमंत ऋतुंत हिवाळ्यांत खाण्याचें पौष्टिक, शक्तिस्फूर्ति व स्मरण शक्ति, मिळेल;व हस्तपाद, कंबर सांधे, ठणका आणि सर्व वातविकार खात्रीनें नाहींसे होतात. बाळंतीणीस व सर्व स्त्रियांस शक्ती देणारी सौभाग्यसुंठ व सर्व पाक विक्रीस तयार आहेत. बाटेच त्यांनीं मागविल्यास आह्मी ह्याल्यूपेबल नेंही पाठवूं. पोष्टखर्च निराळा पडेल. त्वरा करा, गेली वेळा पुन्हा येत नाहीं.

१ सालममिश्रीपाक दर शेरास (८० तोळ्यास) } किंमत ३ रु
२ बदाम पाक.......................... २॥ रु.
३ सालममिश्री व बदाम प्रत २......... २ रु.
४ सैाभाग्यसुंठ ........................ २ रु.
५ कुष्मांड पाक ........................ १ रु.
६ गोखरु पाक .......................... ७ रु.
७ प्रवाळ, वंग वगैरे भस्में व औषधी तयार आहेत.

पत्ता — शिवचरणगीर रामगीर वैद्य कुरणखेडकर दवाखाना.

आकोला — वऱ्हाड.


☞ हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साळ नंबर ... ११ १८
किरकोळ अंकास ....................८२

Single copy.................................. 4as

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसर खेपेस ....०।०१

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

Advertisement
Below 10 lines...2 Rs
per line over10... 4 as
Repetition per line 3 a

VOL XXVIII — AKOLA — MONDAY 8 JANUARY 1894 — NO 2

वर्ष २८ — आकोला सोमवार तारीख ८ माहे जानेवारी सन १८९४ इ० — अंक २

### नोटीस.

गंगा भागीरथी समान मातोश्री बायनाबाई मर्हूम नारायणसा रंगारी पिंपळे बाळापूर चिरंजीव रामकृष्णा नारायणसा रंगारी पिंपळे बाळापूर चरणारविंदी मस्तक ठेवून अनेक साष्टांग नमस्कार वि० वि. सुमारें ६ महिन्यांनीं मला सोडून टाकली येथें बापाचे घरी गेलीस आणि इकडील कामावर दुर्लक्ष केलेस. सावकारचें व्याज भरणें लागतें सबब केळीवेचें शेत ५२५ पांचशे पंचवीस रुपयास अवधुत पुंजाजी यांस विकलें तें त्यांचे नांवें करून देणें आहे तर तुला आलें पाहिजे. सावकारचें खातें चुकतें करून दस्तऐवज काढून घेऊ. कृपा करून नोटीस पावल्या तारखेपासून ७ दिवसांत यावें न येशील तर सरकार मार्फत काम करून घेऊ ह्मणून दिली नोटीस. ता० २९।१२।९३ इ० मार्गशिर्ष वा। ६ गुरुवार १९५०

(सही)
रामकृष्णा नारायणसा रंगारी
पिंपळे बाळापूर दस्तु
खुद.

वऱ्हाडसमाचार

मिती पौष शुद्ध १ शके १८१५

राष्ट्रीय सभेच्या स्वागत कमिटीचे अध्यक्ष सरदार दयालसिंग हे आयवस्थ व बिछान्यावर निजून होते तरी ते तसेच मोठ्या परिश्रमानें व अंग वापूनें ठणकत असतांही सभेच्या मंडपांत आले तेव्हां सर्वत्र टाळ्यांचा गजर झाला आणि सरदार साहेबांनीं मोठ्या प्रेमार्द्र अंतःकरणानें जमलेल्या मंडळींचें स्वागत केलें. त्यांच्या हातून नीट बोलवेना ह्मणून त्यांचें भाषण वाचण्यांत आलें तें सारांशानें येणें प्रमाणें:–

पंजाबाच्या राजधानींत या जमलेल्या प्रतिनिधी मंडळीचें स्वागत करण्याचें काम मजकडे आलें आहे याचा मला अत्यानंद व अभिमान वाटतो. ही आनंदसुखाची परमावधि माझ्या सर्व आयुष्यामध्यें पहिलीच होय. सरकारनें विद्येचा मोठा प्रसार केला आणि दूरदूरचे मुलूख नजीक असे केले त्या मुळें या प्रचंड राष्ट्रांतील आपण प्रजाजन प्रतिवर्षी ठिकठिकाणीं एकत्र जमतो आणि जन्मभूमीच्या उत्कर्षार्थ उपाय योजीत असतो. पूर्व वैभवावरच आपली मदार नाहीं तर या कृपाळू राज्यछत्राखालीं आपला अभ्युदय होईल आणि आपल्यास सोन्यासारखे दिवस लवकरच प्राप्त होतील. एका शतकापूर्वीं लार्ड कार्नवालिस यांनीं राज्याचा पाया घातला तेव्हां बहुतेक धामधूम व झोटिंगशाईच होती, दोन पिढ्या लोटल्या. नंतर लार्ड बुलियम बेंटिंक व लार्ड हालिफाक्स यांनीं विश्वविद्यालयें स्थापून जें उत्तम बीजारोपण केलें, त्याचाच वृक्ष पुढें वाढत चालला. मध्यंतरी १८५७ त प्रचंड विघ्न आलें पण तें तत्काळ टळलें. राज्य क्रांतीच्या वेळीं लार्ड क्यानिंग यांनीं राज्यनौका मोठ्या शिताफीनें वल्हविली आणि ह्मणूनच सर्व मार्गांनीं देशसुधारणेचा गाडा सुरळीत व सुयंत्र चालू राहिला. त्या मागून एका पिढीनें लार्ड रिपन हे मोठे विचारवान, उदारशील व हितकर्ते असे झाले. त्यांनीं राष्ट्रीय कल्पना व विचार यांची प्रेरणा लोकांच्या मनांत केली आणि तिचाच प्रादुर्भाव ही 'राष्ट्रीय सभा' होय. ब्रिटिश राज्याचें खरें वैभव म्हणजे राष्ट्रीय सभा होय. सभेच्या बैठकी सुधारलेल्या व मुख्य मुख्य शहरांतून इतके दिवस भरल्या होत्या. आणि पंजाबांत हीच पहिली वेळ आहे. पंजाबच्या लोकांनीं दोनदां प्रयत्न केला होता. पहिल्या खेपेस १८८८ सालीं या भागांत राजकीय अडथळे व व्यत्यय येतील अशा भितीनें आमची पहिली विनती अमान्य झाली. सर डेनिस फिट्झप्याट्रीक यांनीं डायरेक्टरच्या निघालेल्या गर्हणीय सरक्युलरांत अंग घातलें होतें तरी आमच्या खटपटीस त्यांच्याच सौजन्यानें, कर्तृत्वानें, व उदार चित्तवृत्तीनें चांगलें यश आलें ह्मणून आपण त्यांचे गौरव पूर्वक आभार मानले पाहिजेत. १८८८ सालीं के० पंडित अयोध्यानाथ हे स्वागत कमिटीचे मुख्य होते त्यावेळीं प्रांतिक सरकार मार्फत त्यांच्या कामास बहुत विघ्नें आलीं आणि आमचा प्रांत सरहद्दीवर असतांना व इकडे इंग्रजी अंमल कडक व जोरदारीचा असतांनाही चार वर्षें नंतरच्या या बैठकीस किती यश आलें हें लक्ष्यांत घेतलें ह्मणजे आमच्या प्रांतिक सरकारची खरी थोरवी व योग्यता कळून येईल. राष्ट्रीय सभा ही बाबू लोकांची चळवळ आहे आणि इंडियांतील लढाऊ लोक तिच्यामध्यें सामील नाहींत असा कित्येक विघ्नसंतोषी लोकांचा आरोप आहे पण तिचें निराकरण हा विजयोत्सवाचा समारंभ स्पष्टपणें करीत आहे. अलहाबादेच्या दोन्ही बैठकींस त्या प्रांतांतील व औध कडील लोकांनीं देशकार्यांत मोठाच एक विचार व उत्तम कर्तृत्व दाखविलें हीच गोष्ट चांगली साक्ष देते. लोकांचीं मनें या सभेस अनुकूल व तिजमध्यें सर्वस्वी तल्लीन नव्हती ह्मणून इतकीं वर्षें सभा पंजाबांत भरली नाहीं असें नाहीं तर सरकारी विघ्नें उपस्थित होतील ह्मणून मोठी भिती वाटत होती. सर्व राष्ट्रभर जें राष्ट्रीय शिक्षण पसरलें आहे त्याला आह्मी पंजाबी व्यापक नाहीं असें तिळमात्र नाहीं. पूर्वेकडून प्रकाश पश्चिमेकडे पसरला पण जेव्हां तोच प्रकाश पश्चिमेकडून परतला तेव्हां हिमालया पासून कन्याकुमारी पर्यंत त्याचें तेज सर्वत्र फांकलें. ज्या लोकांमध्यें विलक्षण तेज आहे तेच पाणीदार लोक राष्ट्रीय उन्नतीच्या समयीं अधःपतनानें लोळत पडतील असें संभवतें तरी कसें?

ज्ञानाची भारलेली अंजन शलाका आमच्या डोळ्यांत फिरली आणि इंग्रजी इतिहासशास्त्र व तत्वज्ञान आमच्या मनांत उत्तम ठसलें, व आमच्या पाश्चिमात्य आर्य बंधूंच्या विद्या संपत्तींत आह्मी वांटेकरी झालों. आमच्या सार्वभौम राज्यकर्त्यांचा मूळ मंत्र ह्मणजे स्वतंत्रता आणि त्याचा आधारस्तंभ ह्मणजे सामविचाराचा समतोलपणा होय. आमच्या इतिहासांत आह्मी नांवाजलेले आहों. तेव्हां सांप्रतच्या राष्ट्रीय अभ्युदयाच्या रंगांत आह्मी मंद व जड कसें राहूं? जी कल्याणकारी कारणमाला इतरत्र प्रवाहित आहे तीच या प्रांतीं आहे. फक्त इकडे त्याचा उगम कालावधीनें झाला तथापि आह्मी इतिहासप्रसिद्ध लोक राष्ट्र उन्नत होऊन पुढें चाललें असतां इतरा समवेत टिकाव धरून अग्रस्थानीं मिळणार नाहींत अशी कालत्रयीं शंका नको.

राष्ट्रीय सभा राजद्रोही आहे आणि ती प्रजेचीं मनें राजकर्त्यां विषयीं दूषित व कलुषित करिते हे आक्षेप व आरोप जुने, मिथ्या, व राजद्रोहाचे आहेत असें पक्केपणीं सिद्ध झालें आहे. आतां त्या विषयीं वादच राहिला नाहीं. खुद्द हिंदुस्थान सरकारानें म्हटलें आहे कीं राष्ट्रीय सभेची चळवळ कायदेशीर आहे आणि तिचे चालक हे समाजांतील सामान्य मनुष्या पेक्षां पुढें सरसावलेले व उदार विचारांचे पुरस्कर्ते आहेत. दीर्घद्वेषी शत्रूंच्या आक्षेपांतून आम्ही निष्कलंक व सोज्वळ बाहेर पडलों इतकेंच नाहीं तर आमच्या सभे विरुद्ध निराळी सभा काढण्याचा प्रयत्न या शहरच्या नजिक कित्येकांनीं चालविला तेव्हां तेथील डेपुटी कमिशनरांनीं तसें न करण्याविषयीं ताकीद दिली. राष्ट्रीय सभा तहकूब ठेवणें या पुढें शक्य नाहीं. इंग्रजी एका छत्राखालीं हा देश आपल्यानें सुधारत चालला आहे. सर्व जगाच्या नियंत्या परमेश्वरानें आह्मा लोकांस ब्रिटिश अमला खालीं ठेविलें तें कांहीं निष्कारण व वृथा नसलें पाहिजे. हा देश म्हणजे विद्येचें मूळपीठ, कलांचें आदिस्थान, धर्मांचें गुह्यस्थान आणि तत्वज्ञानाचें आद्य मंदीर होय; आपसांतील यादवी आणि जुलमी पातशाहांचा बळजोरी अंमल यांच्या मुळें या देशाची दाणादाण उडाली पण त्या अंधेरनगरींतून आमचा उद्धार व तरणोपाय करण्यासाठीं ईश्वरानें कांहीं अविख्यात व्यापाऱ्यांची मंडळी इकडे पाठविली! ईश्वरी नेमानेम खरा करण्यासाठीं एक निमित्त कारणें होतीं. यांनीं केवढें अफाट व भव्य राज्य स्थापिलें हें इतिहासांत विदित आहे. विजयश्रीची माळ गळ्यांत पडली ह्मणजे मनुष्य अहंपणानें सर्व गोष्टी स्वकृतीच्या व स्वकीय पराक्रमाच्या समजतो पण खरोखर सर्वांचा आदिकारण जो ईश्वर तो त्या मनुष्याचा पाठीराखा नसला तर त्या त्या गोष्टी खऱ्या घडतील असें स्वप्न देखील पडणार नाहीं! कर्ता करविता परमेश्वर आहे. आणि त्याच नियंत्यानें या व्यापारी मंडळींत नव्या प्रेरणा केल्या, व्यापार टाकून त्यांच्या करवीं देश जिंकविला, सदसद्विवेक, समदृष्टी व योजनाशक्ति हीं त्यांच्यांत प्रज्वलित केलीं आणि इंडियांतील ब्रिटिश राज्यस्थापना हें सर्व जगांत एक अद्भुत व अदृष्टपूर्व नवल करून ठेविलें आहे. या दुःखमय व विपन्न देशांतल्या असंख्यात लोकांच्या जिवावर थोड्या थोडक्या इंग्लिश लोकांनीं मौजा माराव्या आणि धनाढ्य व्हावें एवढाच परमेश्वरी संकेत असावा असें वाटत नाहीं. पण खरा संकेत असा दिसतो कीं, इंग्लिशांनीं हा देश घोर दारिद्र्या पासून मुक्त करून पूर्व वैभवास आणावा आणि नैतिक, आधिभौतिक, व राजकीय प्रकरणांत या देशाचा उत्कर्ष वृद्धिंगत करावा, आणि तसें करण्यास ते चुकले तर ईश्वरही त्यांच्याकडे पाठमोरा होईल!

हाच ईश्वरी संकेत खरा करून दाखविण्यास राष्ट्रीय सभा इंग्लंड देशास बोलावित आहे. उभय देशाच्या भाग्यानें इंग्रज हा संकेत खरा करण्या सारखे बुद्धिवान व सामर्थ्यवान आहेत. त्यांचीं मतें आणि विचार हीं उदारपणाचीं आहेत आणि तसाच त्यांचा राज्यविस्तारही जगभर आहे ह्मणजे त्यांच्या राज्यांत सूर्य कधींच मावळत नाहीं. ईश्वरी योजना अशी असते कीं कारण व कार्य यांचा जंग जोड अगदीं जुळून येतो. पृथ्वीवरील राष्ट्रांत अग्रस्थानीं इंग्लंड देश आहे याचें तरी कारण अशा अत्युच्च पदवीला तो देश पात्र आहे हेंच होय. आणि जोंपर्यंत इंग्लंड आपली नीतिमत्ता न सोडतां आपल्या अंमलाखालील प्रजाजनांचें कल्याणावरच दृष्टी देऊन राज्य चालवील तों पर्यंत त्यांचें बादशाही सिंहासन बहाल राहील.

आम्ही इंडियन लोक स्वतां राजकर्त्यांच्या अनंत उपकार श्रेणी बद्दल कृतज्ञ व राजनिष्ठ आहों. पृथ्वीपति हा विष्णूचाच अवतार आणि तद्दर्शन म्हणजे देवदर्शनाइतकें पुण्य आहे असें आमचे लोक मानितात. या हाडीं खिळलेल्या विचारसरणी मुळें आमच्या इकडे नै[illegible]कच राजनिष्ठ व राजधर्म पाळणारे दुसरे लोक विरळा आढळतील. इंग्रजांच्या हातचा राज्यकार काढून घ्यावा असें राष्ट्रीय सभा प्रतिपादित नाहीं कारण तसें म्हणणें म्हणजे आमच्या पायावर धोंडा आम्हीं टाकीत आहों असें होईल. पण आमचा अर्थ एवढाच कीं राजा व प्रजा या उभयतांच्या हिताहिताकडे नजर देऊन दूरवर

विचाराच्या आणि उदार तत्वाच्या राजनीतीनें आमचा प्रतिपाळ राज्यकर्त्यांनीं करावा. सर्व सुधारलेल्या राष्ट्रांतून ज्या राज्यसंस्था आढळतात त्या या देशांत आहेतच. पण राज्य कारभाराच्या पद्धती विषयीं मोठी ओरड आमची असेत ती ही कीं हिंदुस्थान सरकारावर निराळा स्वतंत्र शास्ता कोणी नाहीं. त्यांच्या कारभाराचे परीक्षण होण्या साठीं आम्हांस ब्रिटिश लोक समूहा पुढें व त्यांच्या पार्लमेंटा पुढें दाद मागितली पाहिजे. आमचे हाय कोर्ट या बाबदींत विलायतचें पार्लमेंट होय आणि या आमच्या हायकोर्टा समोर आमचा खटला नीट मांडता येण्यासाठीं आम्ही राष्ट्रीय सभावाले प्रजेच्या कल्याणाच्या बाबींचा उल्लेख करून त्यांचें योग्य परिशीलन करीत असतों. आह्मी असें केलें नाहीं तर आमचा पक्ष व आमची गाऱ्हाणीं विलायतेंत जाहीर होण्यास दुसरा मार्गच राहिला नाहीं. या आमच्या पद्धतींत वावगें तें काय आणि, राजद्रोह तो कोणता?

अर्थ शास्त्रांत कोणत्याही पदार्थाची गरज आणि त्याचा पुरवठा या विषयीं एक सिद्धान्त आहे. गरजे प्रमाणें पुरवठ्याचा कमज्यास्तपणा होतो. मनुष्य हा उपजतच गरजूं प्राणी आहे. आपल्या धर्माप्रमाणें देखील ईश्वराची आराधना केली ह्मणजे हेतु प्रमाणें गरजा भागतात. ईश्वराच्या ठायीं जसा ज्याचा गरजू भाव असतो तशी त्याला सिद्धी मिळते. लौकिकी व्यवहारांतही असा प्रकार आढळतो. इंग्रज लोकांचा पूज्य येशू ख्रिस्त तरी असाच उपदेश करितो. आकाशांतल्या बापाला शरण जा ह्मणजे तो आश्रिताची कींव करील. दुसरी अशी एक ह्मण आहे कीं मूल रडल्या खेरीज आई दूध पाजीत नाहीं. इंग्लंड देश आमच्या मातोश्री; तेव्हां आह्मी लेकरांनीं दुधा करितां नव्हे तर निव्वळ पाण्या करितां ओरड केली आणि तिनें आह्मास एक वेळ पाजलें तर त्यांत अपराध अगर गैर गोष्ट ती कोणती? आह्मास शब्द फुटण्या पूर्वींच आमच्यावर इंग्लंडनें मातृप्रेमदर्शक मौल्यवान देणग्यांचा वर्षाव केला आहे ह्मणून चार शब्द बरे वाईट बोलूं लागलों ह्मणून आह्मी ज्यास्त हितकर गोष्टी मागूं नयेत असें नाहीं. राष्ट्रीय सभेला आज आठ वर्षें झालीं. हा काल राष्ट्राच्या आयुर्मांना प्रमाणें फारच अल्प आहे. पण एवढ्या मुदतींत आह्मास ज्या थोड्या बहुत गोष्टी लाभल्या आहेत त्यांच्या जोरावर आमच्या आशा दुणावल्या आहेत आणि देशोन्नती साठीं झटण्याची आमच्या अंगीं वीरश्री चढली आहे. आणि सुदैवानें राज्यकर्ते आमची दाद घेतील, आमच्या मागण्यांचा उदार मनानें विचार करितील आणि आणि आपलें राज्य चिरस्थायी व भक्कम बनवितील असा ही आह्मांस भरंवसा आला आहे.

गतवर्षीं बाबू उमेशचंद्र बानर्जी यांनीं ह्मटल्या प्रमाणें राष्ट्रीय सभेचें दुसरें सप्तक सुरूं झालें. आणि योग चमत्कारिक असा कीं पहिल्या सप्तकांतील दुसऱ्या वर्षीचे अध्यक्ष दादाभाई नवरोजी हेच दुसऱ्या सप्तकांतील दुसऱ्या वर्षीचे अध्यक्ष आहेत. आणि अखेर दादाभाई व ह्यूम या नरश्रेष्ठांच्या सद्गुणांचा कित्ता घेण्यास सांगून सरदार दयालसिंग यांनीं आपल्या वाचलेल्या भाषणांत पुन्हा एकवार जमलेल्या मंडळीचे अत्यंत आभार मानिले.

---

नामदार दादाभाई नवरोजी यांच्या भाषणांतील मुद्दे गेल्या अंकावरून पुढें चालविले असतां ते असे आहेत:—

सिव्हील सर्व्हीस परीक्षा विलायतेंतल्या प्रमाणें या देशांत एकाच वेळीं होत जावी असा जो कामन्स सभेनें गेल्या जूनच्या २ रे तारखेस ठराव केला आहे त्याजविषयीं नामदार दादाभाई ह्मणाले कीं खुद्द मि. रसेल अंडर सेक्रेटरी हे त्या ठरावाला विरुद्ध होते तरी तो ठराव निष्फळ अथवा कुचकामाचा होईल असा काडीमात्र प्रयत्न केला जाणार नाहीं असें अभिवचन दिलें आहे. सिव्हील मेडिकल व इंजिनिअरींग कडील मुख्य मुख्य व भारी पगाराच्या जागा लष्करी खात्यांतील लोकांस दिल्या जातात तें बरोबर नाहीं. दोन्ही देशांत परीक्षा घेऊन त्यांतील निकाला प्रमाणें या मेडिकल व इंजिनिअरींगच्या जाग्यांची वाट लाविली पाहिजे.

राष्ट्रीय सभेच्या चळवळीनें इंडियांतल्या गोष्टी विलायतेस कळूं लागल्या त्या सरशीं तिकडील लोकांची न्यायबुद्धि आमच्या विषयीं चांगली जागृत झाली आहे. धान्याचा कायदा, गुलामाचा कायदा वगैरे कायदे बंद करण्या विषयीं किती वर्षें व किती वाग्युद्धें झालीं हें पाहिलें ह्मणजे आपल्या सभेचे ठरावावर सर्वत्र खानेजंगीचे वाद होतात या विषयीं कांहीं नवल वाटणार नाहीं. उलटें सभेचे ठरावांचे अनुकरण क्रमाक्रमानें होत आहे हें मोठें सुचिन्ह होय.

राष्ट्रीय सभेनें विलायतचे लोक आपलेसे केले तें इतकें कीं त्यांनीं बाबूलाल मोहन घोस यांस आपलें पाठबळ दिलें आणि तें नीटसें सफळ झालें नाहीं तरी मला इंडियाचा सभासद नेमिलें तेव्हां मि. ग्लाडस्टन फार आनंदित झाले व आणखी इंडियन सभासद असावेत अशी त्यांनीं इच्छा दर्शविली. होम रूल बिलाचे मंडनकर्ते आयरिश लोक आपल्या देशाचे वतीनें आहेत. त्यांच्या शिवाय मेसर्स केन, स्वान, पॉल, म्याकलारेन, हंटर, वेडरबर्न इत्यादि लोकांची मिळून पार्लमेंटांत एक कमिटी बनविली आहे कांकीं अशा कमिटीच्या मार्फतीनें इंडिया विषयीं प्रश्नांचा चांगला निकाल लागेल. अद्याप राष्ट्रीय सभेस पुष्कळ गोष्टी करावयाच्या आहेत. धीम्मेपणानें, टिकावानें, आणि व्यवस्थशीरपणानें आपलें काम चालवें पाहिजे. ब्रिटिश प्रजेचे सर्व अधिकार आपणास मिळण्यासाठीं इंग्लिश सारखी झीज सोसली पाहिजे आणि नंतर दुसऱ्या लोकाचे दुराग्रह, गैरसमज, व ठराविक मतें यांचे निरसन केलें पाहिजे.

कायदे कौंसिला विषयीं नामदार दादाभाई म्हणाले कीं ग्लाडस्टन साहेबानीं १८९२ च्या कौंसिल आक्टा वरील वादविवादांत खरें प्रतिनिधितत्व इंडियाला लागूं करावें असें म्हटलें होतें. पण हल्लीचे नियम इतके मर्यादित व अपवाद युक्त आहेत कीं कौंसिल आक्टांतील सुधारणा केवळ आडनांवाच्या आहेत. लष्करी व आरमाराच्या खर्चाविषयीच्या बाबींत कोणी सभासदानें प्रश्न काढू नये असें १८६१ चा कायदा सांगतो. नव्या विषयावर कौंसिलांत बिल सभासदांस आणिता येत नाहीं. कोणत्या ही खात्यांत काम कसें चालतें हें तपासण्याचा कोणास अधिकार पोचत नाहीं. सेक्रेटरी आफ स्टेट यांनीं कांहीं केलें तरी त्या बद्दल विचारपूस कायदेकौंसिलानें करिता कामा नये. येणें प्रमाणें सरकारच्या हातीं १८६१ कायद्या अन्वयें मोठा अधिकार ठेविला आहे. १८९२ च्या कायद्यानें जमाखर्चाच्या गोष्टींत वादविवाद करण्याचा व तत्संबंधानें प्रश्न विचारण्याचा अधिकार दिला आहे तरी त्या बद्दल निराळा कांहीं ठराव करणें किंवा मत विचारणें या गोष्टी सरकारला मजूर नाहींत. १८९२ च्या कायद्या खालीं हिंदुस्थान सरकारनें केलेले नियमांस कायदे कौंसिलदारानें अपवाद घेऊं नये किंवा त्यांवर चर्चा करूं नये. स्टेट सेक्रेटरीनें कायदे कौंसिलास न विचारतां नवीन कर्जें पार्लमेंटाच्या मंजुरीनें काढावीं आणि त्यांचा बोजा इंडियावर लादावा. सारांश, सरकारचा अधिकार नियंत्रित आहे आणि ते ह्मणतील ती पूर्व दिशा! सध्यां कोठें आपला प्रवेश कायदे कौंसिलाच्या उंबऱ्या पर्यंत झाला आहे. वार्षिक जमाखर्चाच्या बजेटावर भवति न भवति चालविण्याचा हक्क विलायते प्रमाणें दिला आहे पण तो वास्तविक न दिल्या सारखाच आहे कांकीं त्या संबंधानें निव्वळ बोलण्याकडे कांहींच करितां येत नाहीं.

एक अत्यंत महत्वाची व नवी गोष्ट ना० दादाभाईंनीं सांगितली कीं इंडियांतूनच कांहीं प्रतिनिधी पार्लमेंटांत पाठविले जावेत. ग्रेट ब्रिटनचा हा देश एक पोट विभाग समजला पाहिजे आणि या देशानें निवडून नेमस्त केलेले कांहीं तरी प्रतिनिधी पार्लमेंटानें स्विकारले पाहिजेत. सेंट्रल फिन्सबरीच्या मतवाल्या लोकांचा महदुपकार खरा पण त्यांच्या सारखे दिलदार लोक भेटणें मुष्कील होय. शिवाय आपल्या पायावर आपण उभे राहिलें पाहिजे आणि हा आमचा हक्काचा मान इंग्लिश लोक आह्मास खात्रीनें देतील.

या नंतर ना० दादाभाई हे या देशाच्या दारिद्र्यावस्थे विषयीं बोलले. या विषयांत त्यांनीं आपला विचार स प्रमाण सिद्ध करून पुस्तकरूपानें कळविला आहे. इंग्लंड व इंडिया या उभय देशाला हा प्रश्न मोठ्या चिंतेचा व फिकिरीचा आहे. राज्यपद्धति चुकली आहे आणि आंग्लो-इंडियन कामगार खऱ्या गोष्टी बाजूस करून नीट विचार करीत नाहींत. या कारणामुळें दारिद्र्याचें खरें स्वरूप व त्याचा विस्तार यांचा अटकळ बहुतजणांस बरोबर होत नाहीं. सर बारबर यानीं एक टिप्पण केलें आहे पण तें उजेडांतच आणित नाहींत. हिशेबाचे आंकडे बरोबर कोणास मिळूं देत नाहींत. सरासरी माणशी २७ रु० वार्षिक उत्पन्न पडतें असें लार्ड क्रोमर ह्मणतात; पण त्यांत कोट्याधीश भांडवलवाले आंग्लो-इंडियन लोकांची मिळकत जमेला धरितां कामा नये निव्वळ मजूरी पाल्लेकडे सर्व असल फायदा विलायतेस जातो तेव्हां अशा लोकांचें मनस्वी उत्पन्न या देशाची खोटी श्रीमंती चांगली भासविते. अध्यक्षांच्या मतें सध्यांच्या माहिती वरून हरएक माणसाचें वार्षिक उत्पन्न २० रुपये पडत असतें. परकी राष्ट्राच्या अंमला पासून जेवढा फायदा तेवढा तोटा असतो आणि असेंच भाकीत सर जान शोअर यांनीं केलेलें शंभर वर्षांनीं निदर्शनास आलें. या देशावरील करांचा बोजा आणि वार्षिक जमा या संबंधानें आंकडे खरे मिळत नाहींत आणि एकंदरीनें सर्व प्रजेची मोठीच दैना आहे व ती केव्हां संपेल हें तर कांहींच सांगता येणार नाहीं. निदान सध्यांची पद्धति बंद करून नवीन सुधारलेली व्यवस्था चालूं केली तर उभय देशाचें हित आहे. आणि इंडियाचे सर्व हक्क इंग्लंडानें पाळले तर अप्रतिबंध व्यापाराच्याच तत्वानें इंग्लंडास इंडियाहून आपल्या जिनसा साठीं निराळ्या देशाचा बाजार पहावा लागणार नाहीं. रानटी लोकांस दास बनविण्या पेक्षां सुधारलेल्या मनुष्याशीं बरोबरीनें व्यापार केला तरी मेकाले साहेब ह्मणतात कीं तें फार बरें. मूर्खांचा होऊं नये धनी पण शहाण्याचें व्हावें चाकर अशी ह्मण आहे ती तरी अशीच साक्ष देते.

गोरे अंमलदार इंडियांत भारी पगारावर असतात हें या देशा साठीं नाहीं तर राज्यकर्त्यांच्या वैभवा साठीं व त्यांच्या इतमामीचैनबाजी साठीं आहे हें निर्विवाद आहे तर या अवाढव्य खर्चाचा बोजा इंडियावर सर्वस्वी लादण्या पेक्षां कांहीं इंग्लंडच्या माथीं लादल्यास न्याय होईल असें अध्यक्षांनी विवेचनानें सिद्ध केलें. लष्करी अतोनात खर्च, व ब्रिटनवर त्याचा योग्य भार असावा कितपत, होम चार्जेस इंडियावर पडूं नये, स्टाट्यूटरी नोकरी, कर्जांच्या बोजाची वृद्धि, फारेस्ट खात्यांतील युरोपियनांची फाजील भरती, हुडणावळीचा प्रश्न, वगैरे विषयावर त्यांचें भाषण संक्षिप्त पण अतिव्यापक अशा विचारांचें झालें. त्यांतील गोष्टी यथाक्रमें मागाहून निरनिराळ्या देण्याचा विचार आम्हीं केला आहे. प्रत्येक बाब अती महत्वाची आहे. कोणतीच वगळतां येत नाहीं व संक्षेपही बरोबर करितां येत नाहीं ह्मणून स्थलसंकोचास्तव आमचा नाइलाज आहे. नामदार दादाभाईंनीं आपल्या देशबांधवांस मोठ्या कळकळीनें व आस्थेनें उपदेश केला कीं स्वार्थपरित्याग करण्यास शिका, आणि हीच गोष्ट इंग्रजी इतिहासा वरून शिकली पाहिजे.

---

नामदार दादाभाई नवरोजी यांस आग्रा मुक्कामीं गेल्या ४ थे तारखेस मानपत्र देण्यांत आलें. तेथील समारंभ फार विलक्षण व आनंदमय झाला. लोकसेवेचें चीज असें अद्भुत आहे कीं नागरिक व विद्यार्थी यांनीं त्यांच्या रथाचे घोडे सोडले आणि आपणच त्या रथाचे अश्व बनून मोठ्या प्रेमार्द्र व सद्गदित अंतःकरणानें त्यांनीं त्यांस स्वस्थानीं पोंचविलें.

---

## सरकारास सूचना

(अफूच्या हरासा विषयीं)

अफकारीच्या वार्षिक हरासाच्या तारखा जाहीर झाल्या पासून मक्तेवाल्या लोकांमध्यें चळवळ उडाली आहे. सध्यां जे मक्तेदार आहेत ते आपली मुदत संपली ह्मणून नफ्या नुकसानीच्या दृष्टीनें मोठ्या फिकीरींत आहेत. हरासाची पद्धत चांगली किंवा वाईट आहे हें कळविण्याचा आज मुद्दा नाहीं. सांप्रत जी हरासाची रीत चालू आहे तिजपासून अफूच्या मक्त्यामध्यें सरकारचें नुकसान होतें तें सरकारनें बुडवूं नये ह्मणून आह्मी एक महत्वाची गोष्ट सूचवीत आहों.

अफूचे जे मक्तेदार सध्यां आहेत ते साल अखेरीच्या सुमारास रुपयास चार चार तोळ्यां-प्रमाणें देखील ती विकतात. जरूरचा माल कसा तरी मुद्दला बरोबर खपला तरी ते नाखुष नसतात. मक्त्याच्या वर्षाच्या शेवटील महिन्यांत अफू फार खपली जाते हें सरकारी तक्त्यांवरूनही समजेल. नेहमीचा भाव रुपयास २–२॥ तोळे असतो. तेव्हां सस्ता भाव झाला ह्मणजे अफू सेवन करणारा आपल्या शक्ती इतकी एकदम अफू घेऊं शकतो. कायद्या अन्वयें दर माणशीं पांच तोळे अफू मिळते. आणि अफू खाणारा मनुष्य आपल्या घरांतील माणसाच्या पांचपट्टी इतके तोळे अफू विकत घेऊं शकतो. अशा प्रकारें अफूची विक्री झाल्या नंतर नवीन हरासांत मक्तेदार होऊं इच्छिणारा गृहस्थ अफूचा मक्ता वाढवूं शकत नाहीं कांकीं त्यानें मक्ता घेतला तरी लोकांच्या जवळ मुबलक अफू शिल्लक असते. आणि त्यामुळें नव्या मक्तेदाराचा व्यापार ठार बुडतो. येणें वरून सरकारचें नुकसान होऊन नवीन मक्तेदार पुढें सरसावत नाहींत. ही हकीकत खरी आहे असें सरकारच्या प्रत्ययास आलें तर ही दुर्व्यवस्था व अंतस्थ भानगड मोडली जाईल असें उपाय लवकर योजिले तर फार बरें?

## The Berar Samachar

**MONDAY JANUARY, 8, 1894**

It augurs well that the glowing success of the last National Congress is but a stepping stone to further progress and development in the politics of this nation. The last year's session of the Congress had a grand and unique aspect. The meeting was held in the central hold of the warlike Punjabis of whom Ranjitsing the Lion of the Punjab was the typical hero. It is now a patent fact that the martial races of India are not less worthy of a political field. Human nature narrates the self-same tale that manliness is never a stranger to love of justice, generosity and intellect. The unparalleled and towering excellence of the Congress at Lahore has eclipsed all its predecessors. In the scale of national life we have gained a high and proud position to stand upon; and the political history of India will henceforth enter upon a new erra of an outward march of progress and reform. The long and weary days of trial and opposition are almost over. A Congress-walla is no longer a disloyal and seditious libeller. To style him so will amount to defamation pure and simple and we shall not be surprised if an experimental prosecution be advanced to silence such a sedition-monger for ever. In the critical retrospect of the honorable Mr. Dadabhoy Naoroji, the Congress has fully justified its existence. It is no more an insignificant assembly. It is an institution wherein are found the members of the British Parliament and the members of the Imperial and provinial Legislative Councils in India. As an august and representative corporation of the best men of the land the Congress is the glory of the British rule. It is the growth of British education and civilization; and the high and powerful influences that are at work will soon make it imperative upon the Government to take the Congress in full confidence and to listen to its best counsels.

The National Congress has a literature of its own and no student of politics can safely neglect it. The recent proceedings add a new volume to the achievements of the Congress in the past. They are replete with a well-balanced forecast of the future work of the Congress. In their pages we have got a specimen of sound statesmanship and stirring eloquence. Scholarly acumen, mature counsel and a broad-minded political wisdom characterize the National deliberations from year to year. Look at the Congress from any stand-point you please, you will have to admire the political genius, undying energy, and above all the marked self-sacrifize of a rising people. There are as a rule two alternate courses open to a ruling nation. Reduce the subjects of the conquered nation to serfdom and they will either accept the new condition of life or fight out till they become extinct. The other course is the generous treatment of the conquered people. The British rule having adopted the second alternative as their guide cannot now overthrow the golden fruit of that policy. There is at play an emulation in the heart of an Indian to raise himself to the rights and privileges of a British people. The moral of these continued sessons of the Congress is to extinguish all distinctions of caste, creed and color. The geographical divisions no human effort can annihilate but the political differences between an Indian and an Englishman will no longer maintain their warring elements. India will, in short, form a part and parcel of the United Kingdom.

The Resolutions of the Congress indicate the ways in which urgent and speedy reforms can be effected. The Honorable Mr. Dadabhai warns the rulers of the grand duty lying before them in his eloquent and truthful words:—"The Congress represents the Aristocracy of Intellect and the new Political Life, created by themselves, which is at present deeply greatful to its Creator. Common sense tells you—have it with you, instead of against you". His speech is plain, straightforward and direct. There is no flash of rhetoric nor the least tinge of egoism though the crowning satisfaction of his life is that he is the chosen instrument in the hand of Providence. To arouse the English nation to a sense of their duty. Mr. Dadabhai suggests the mode of having a direct representation in the Imperial Parliament. The para quoted below will at once indicate his grateful rejoicings in the elevation of an Indian to the degree of M P. and his original thought of mending matters at the very fountain.

"There is however another important matter—I mean the direct representation from India in the Imperial Parliament. As all our Imperial questions and relations between India and the United Kingdom, all amendments of Parliamentary Acts already passed and existing or all important Acts that may be and can be only passed hereafter in Parliament, and all our ultimate appeals can be settled in Parliament alone, it is of extreme importance that there should be some reasonable direct representation from India in the House of Commons, and the representatives may be Indians or Europeans as long as they are the choice directly of Indian Constituencies, just as you have delegates to this Congress of Indians or Europeans. Central Finsbury has been generous to us; other contituencies may also extend to us such generous consideration and help, but it is not fair that we should be left to depend upon the generosity of English Constituencies. Under present circumstances we have no right to have direct representation. I hope the time is not very distant when we may successfully appeal to Parliament to grant us the true status of British political citizenship. I do not overlook that several matters will be considered, and I am not at present placing before you a cut-and-dry scheme. My only object is to draw your attention to this vital subject."

Mr. Dadabhai and the other speakers at the Congress have formulated a number of subjects for the critical attention and guidance of the Government. We cannot recount them all. But they will let us into the dark side of the British rule. they will let us into the dark side of There are the evils at which the Congress desires to strike. The key note to a major portion of them is in the expenditure of the European services. However necessary they may for the greatness and glory of the ruling nation "essentially depending on the Eastern Empire, and indissolubly bound up with it, is it reasonable, is it just and fair is it British that *all* the cost of such greatness, glory, prosperity of the United Kingdom should be entirely, to the last farthing, thrown upon the wretched Indians, as if the only relations existing between the United Kingdonm and India were not of mutual benefit but of mere masters and slaves as Macauly pointed out to be deprecated."

## वऱ्हाड.

हवामान— गेल्या दहाबारा दिवसा पासुन ढगें फार येतात त्या मुळें थंडी कमी आहे. पाऊस पडण्याचीं चिन्हें दिसतात व थोडा पाऊसही पडला. पीकांना सध्यां मोठी भिती आहे व त्यांच्या वाढीला ही हवा खोटी आहे. परमेश्वर निभवील तेव्हां खरें! लोकांचें आरोग्य साधारणपणें बरें आहे

अलिशान रेसिडेन्ट मि. टी. सी. क्लौडन के. सी. एस. आय. यांची स्वारी वऱ्हाडांत १२ वीला येणार होती परंतु त्यांचा बेत तूर्त १७ वे तारखे पर्यंत तहकूब झाला आहे.

कर्नल मेकंझी कामशिनर साहेब यांचा तळ सध्या येथें आहे. त्यांची तबेत थोडी नादुरुस्त आहे.

मि. हेअर डे० क० हे काल रोजीं कांहीं कामाकरितां मुंबईस गेले आहत.

राव बहादुर श्रीराम भिकाजी जठार बी. ए. डायरेक्टर हे उमरावतीस, व रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी एम. ए. इन्स्पेक्टर हे जळगांव तालुक्यांत स्वारींत आहत.

'शाहू नगरवासी नाटककार' मंडळीनें गेल्या बुधवारीं 'मंजू घोषा' आणि शनिवारी 'त्राटिका' असे दोन खेळ करून दाखविले. ही मंडळी चांगली गुणी आहे. त्यांचे प्रयोग उत्कृष्ट वठतात. संगीताचा लवलेश नाहीं अशा गद्यात्मक नाटकांची गोडी लोकांना या मंडळीच्या खेळांनीं लागली हें त्यांस भूषणास्पद होय.

पांचजण चोरांनीं गेल्या बुधवारीं येथील शेट रामुलाल यांची भींत फोडण्याचा प्रयत्न चालविला होता इतक्यांत नाटक पाहून मंडळी परतली ह्मणून ते अंधारांत आड जागेस दबा धरून बसले. चीफ मि. विश्वेश्वरसिंग त्यांच्याच बाजूनें एकटे चालले होते त्यांनीं एकास बळकट पकडलें व बाकी चारही चोरांच्या मारहाणीनें घायाळ असतांही चिकाटी सोडली नाहीं. ते स्वतः निःशस्त्र होते, बाहेरून मदत मिळेना, व जीवावरच येऊन अखेर बेतली तेव्हां त्यांनीं चोरांस सोडलें.

### नोटीस

रा. रा. सदाशिव वल्लद झांजी पाटील राहणार मौजे सवंदन तालुके जळगांव, व गणपती वल्लद बजी तेली राहणार आडोळ खुर्द तालुक जळगांव, व दुलाजी वल्लद सावंजी माळी मानकर राहणार वडासिंगी तालुके जळगांव, व जयकिसन बालमुकुंद कायत राहणार जळगांव या चवघेजणांस व इतर लोकांस खालीं सही करणार सोनाजी गणेश देशपांडे राहणार जळगांव यांज कडून कळविण्यांत येते कीं, आमचे आज नामें रामकृष्ण गंगाराम देशपांडे हे मयत होऊन पांच महिने झाले व त्यांच्या मागें त्यांचें कर्ज वसूल करणें बद्दल सर्टिफिकीटाचें काम सरकारांत चालूं आहे तर त्यांचा निकाल होणेचे अगोदर सदहू रामकृष्ण गंगाराम देशपांडे ह्यांचे पैसे आमच्या शिवाय दुसरे कोणास देऊं नये. दिल्यास त्याज बद्दलची सर्व प्रकारची जबाबदारी ज्यची त्याच्यावर आहे ह्मणून दिली नोटीस सही तारीख ७ माहे जानुआरी सन १८९४ इ.

(सही)

सोनाजी गणेश देशपांडे

रहाणार जळगांव

दस्तर खुद.

### नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करिता येण्या साठी सरटफिकीट मिळावें म्हणुन त्यांनें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा आक्ट ७

कलम ६ प्रमाणें.

दि. कि. क्ला. १९ मि. नंबर $\frac{१२}{१८९३}$

विद्यमान सिव्हील जडज्य साहेब जिल्हा आकोला यांचे कोर्टांत.

नांव— यशवंतराव

बापाचें नांव— गोविंदराव देशमुख

राहणार हातें ता० बाळापूर

जिल्हा आकोला यांस मयत

गोविंदराव बापाचें नांव लक्ष्मणदास राहणार हातें ता. बाळापूर जि. आकोला याचें कर्ज वसूल करितां येण्या साठीं सरटीफिकीट मिळावें म्हणून सदहू अर्जदार याणें अर्ज केला आहे त्याज करितां सदहू मयत मनुष्याचे माल मिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक आहे म्हणुन ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्याणी तारीख १३ माहे जानेवारी सन १८९४ इ० रोजी सदहू अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपआपले हका विषयीं लेखी हकीकत दाखल करावी. तारीख ५ माहे जानेवारि सन १८९४ इ०

V. N. Dandekar.

सिव्हील जज्ज.

## विजया दशमीचें सोनें

LINES TO AN INDIAN AIR

I arise from dreams of Thee
In the first sweet sleep of night,
When the winds are breathing low
And the stars are shining bright:
I arise from dreams of thee,
And a spirit in my feet
Has led me—who knows how ?
To thy chamber—window, Sweet !
The wandering airs they faint
On the dark, the silent stream—
The champak odours fail
Like sweet thoughts in a dream
The nightingale's complaint
It dies upon her heart,
As I must die on thine
O beloved as thou art !
O lift me from the grass !
I die, I faint, I fail !
Let thy love in kisses rain
On my lips and eyelids pale.
My cheek is cold and white, alas !
My heart beats loud and fast;
O / press it close to thine again
Where it will break at last.

P. B. Shelley

साकी

निशामुखीं मी स्वस्थ मानसें निद्रा गोड सुखानें ।
सेवित असतां त्वाद्विषयक या उठलों आभासानें ॥ १ ॥
मंद मंदसा वाहे मारुत झुळुक पहा या वेळीं ।
तारक मंडळ निकडे तिकडे सतेज शुभ्र झळाळी ॥ २ ॥
उठलों सखये! त्वाद्विषयक या स्वप्नें एकाएकीं ।
भूत पिशाच प्रेरित पदगति आलों मी अवलोकीं ॥ ३ ॥
वरांगने! मी कसा पातलों मजला ठाउक नाहीं ।
वातायन सान्निध या तुझिया; कृपा दृष्टिनें पाहीं ॥ ४ ॥
भ्रमती वारे जहीं दिसेला परि ते येथें शांत ।
सरित्सुस स्वर ऐकु न येइ; तमाचा न कळे अंत ॥ ५ ॥
जाई जुई मोगरा फुलांचा गंध वसे या वेळीं ।
स्वप्नामध्यें सुविचारावळि जेवि लोपत सगळी ॥ ६ ॥
बुलबुल् मंजुळ शद्ब निगाला हळके हळके पाहीं ।
वाटे ज्या हृदयांतुनि आला तेथें पुनरपि जाई ॥ ७ ॥
मत्प्रेमाचा झरा पाझरे त्वद्हृदयांतुनि वनिते ।
तेथें जाउनि फुटे हृदय मम इच्छा मोठी दयिते ॥ ८ ॥
धैर्य गळालें; मोह पावला आत्मा, यम सदनाची ।
वाट धरितसे उचला मजला शय्या न मृदु तृणाची ॥ ९ ॥
धांव झडकरी प्रेम चंद्रिके चुंबन सुधारसानें ।
ओष्ट लोचना सिंचन करुनी जीवावे या तोषानें ॥ १० ॥
शांत जाहलें गंडस्थळ मम विरली कांती सकळा ।
चित्त क्षोभे हृदय धडधडे धांव विलंब कशाला ॥ ११ ॥
त्वद्हृदयीचा उष्मा सखये देया मद्हृदयाला ।

फुटो फुटो हें शेवटि तथें पावो तेथ लयाला ॥ १२ ॥

## जाहिरात.

### क्रिमिनल प्रोसिजर कोड.

( आक्ट नंबर १० सन १८९२. )

सटीक. आवृत्ती ३ री.

सदर्हू आक्ट सन १८८२ पासून सन १८९३ अखेर १२ आक्टांवरून दुरुस्त झाला आहे, त्याप्रमाणें या आवृत्तींत दुरुस्ती केली आहे. सन १८९३ अखेरपर्यंत कलकत्ता मुंबई, मद्रास, व अलहाबाद हायकोर्टांनीं केलेले सर्व निवाडे ज्या त्या कलमाखालीं घातले आहेत. मुंबई हायकोर्टानें केलेले वऱ्हाडकूम ज्या त्या कलमावर घातले आहेत व इतर जरूर लागणार फौजदारी आक्ट सुमारें १४, यावरील निवाडे व दुरुस्त्या सुद्धां छापून वेगळे जोडले आहेत; सदर्हू ग्रंथ माहे फेब्रुवारी सन १८९४ मध्यें तयार होऊन लोकांस मिळेल. याची अगाऊ किंमत माहे जानेवारी सन १८९४ अखेर घेणारांस रुपये ४ व टपाल खर्च ८८ आणे टेविली आहे व मागाहून घेणारांस किंमत रुपये ६ व टपाल खर्च ८८ आणे पडेल.

| | |
|---|---|
| पुणें "न्यायश्रय" आफीस ता० ३० नो व्हेंबर सन १८९३. | नरहरराव त्रिंबक राजमाचीकर. बी. ए. शिवराम हरी साठे. न्यायाश्रयकर्ते पुणें. |

### नोटीस.

नोटीस नेशनी पांडुला वा॥ दावला जात कलाल राहणार मौजे निंबळ प्रगणें धुंगांव ता० उमरावती यासीः—

खाली सही करणार भजनसा वा॥ नारायणसा जात कलाल राहणार मौजे घानोरी हल्लीं मुकाम कसबे धुंगांव ता० उमरावती हा नोटिसीनें असें कळविलें जातें कीं, तुमची साक्षांत बहीण व आमची साक्षांत भावजई इजला तुह्मी आपल्या घरी नेत आणित असता. ही वहीवाट सुद्धा आहे. परंतु माझा वडील बंधु नामे सुंदरसा हा मेत झाल्यामुळें तुमचे आणणें नेणें बरोबर नाहीं, तरी तुमच्या नेण्यास आह्मी अडथळा करीत नाहीं. परंतु ज्या वेळेस तुह्मी नेण्यास येत जाल त्या वेळेस मात्र आमची भेट घेऊन नेत असावें. परस्परें नेऊ नये व ठेऊ नये. कदाचित परस्परें न्याल आमच्या घरांत कोणी वस्तु कमी झाल्यास त्याबद्दल तुह्मांस दोषी ठरवून सरकारी काम तुमच्या डोक्यावर चालेल. यांत बिलकुल संशय नाहीं, तुमच्या समजुती करितां ही नोटीस दिली आहे. ह्या थोड्या लिहिण्यांत ज्यास्त समजावे. कळावें ता० ३०।१२।९३ इ०

( सही )

दस्तूर भजनसा वा॥ नारायणसा कलाल राहणार घानोरी हाल्लीं मुक्काम धुंगांव दस्तूर खुद्द.

### नोटीस.

रा. रा. मनसूकदास चुनीलाल मारवाडी दुकान खामगांव यांत खाली सही करणार यांज कडून नोटीस देण्यात येते कीं, आम्हीं तुम्हां पासून रामजी वलद धरमाजी येनोळे राहणार नानोरी याच्या खात्याचे शेत सरकार सारा रुपये ( १५।८६ ) चे हें शेत रामजी यानें अमृतराव येकोबा देशमुख नानोरीकर यांस खरेदी दिले व अमृतराव येकोबा पासून तुम्ही घेतले व तेंच खरेदी घेतलें. शेत आमच्या नावानीं तुम्हो करून द्यावें. व त्याज बदल तुम्हांस रुपये (२००) दोनशें द्यावे. अशा करारानें सदर्हू शेताचा सवदा तुम्हां आम्हां मध्यें होऊन आज अदमासे पाच वर्षे झाली व रुपये २०० दोनशें आम्ही त्यावेळी रोखदेणेचे, परंतु आम्हा पाशी नव्हते म्हणून खाते खरेदी करून घेतले मिती रोजी आमच्या खात्यावर सदर्हू रुपये ( २०० ) त्याचा दर शेंकडा १ प्रमाणें मांडून बेऊन हे रुपये लगाईत तारखे पासून व्याजा सुद्धा दिले. त्यांस अदमासे नऊ दाहा महिने होत आले. शेताचा तुमचा आमचा सदरी लिहीले प्रमाणें सवदा झाल्यावर आज पावेतो तुम्ही सदर्हू शेत आमच्या नावें करून दिलें नाहीं व तुमच्या बोलण्यांत हा शेताचे सवदात गेश्वावर्षी फरक दिसला व तुम्ही फरक बोलला. यांज करितां आम्हांस ही नोटीस देणे भाग पडलें तर नोटीस पावल्या पासुन १ महिन्यात खाते सदर्हू शेताचे आमच्या नावे करून द्यावे. असे न झाले नाहीं तर रिती प्रमाणें तुम्हांवर काम चालवून ह्या नोटिशीच्या व इतर जे जे म्हणून खर्च निकाल होई पर्यंत होतील ते सर्व नुकसानी सह भरून घेतले जातील.

तुम्ही आमचे सावकार व तुम्हा पाशी आम्हीं नेहमी कर्ज वगैरे घेत असतो परंतु सदर्हू शेताच्या सवद्यात तुमच्या बोलण्यांत फरक आल्या मुळें आम्हांस तुमच्या दुकानांत कोणच्या ही प्रकारचा व्यवहार ठेवणे नाहीं; तर तुम्हांस नोटीसिनें कळवितो कीं आमच्या खातेवर तुमचे जे जे रुपये वगैरे निघत असतील ते तुम्ही रंगीलदास छबीलदास साहु दुकान खामगाव यांत आमचा रितीवार हीशेब दाखवून घेऊन नावे व चुकती पावती आमच्या नावची त्याजपाशी द्यावी. तुम्हांस ही नोटीस दिले पासून आमच्या कडे बाकी जी असेल त्याचें व्याज पुढे तुम्हांस मिळणार नाहीं म्हणून लिहिली नोटीस सही ता २ ज्यानेवारी सन १८९४ इसवी.

( सही )

सहीची निशाणी वाणा तेलाचा गोविंदा वलद नारायण तेली याच्या हातची असे. राहणार ज्यानोरी निपाणी तालुके खामगांव.

## जाहिरात.

मुलुक अमानी हैद्राबाद यांतील अबकारी ( दारू, ताडी ( शिंदी ), आफु आणि गांजा ) विक्रीच्या तारखा सन १८९४—९५ साला करितां खालीं लिहिल्या प्रमाणें मुकरर करण्यांत आल्या आहेत. एलिचपूर जिल्हा आणि उमरावती जिल्हा पैकीं उमरावती तालुका शिवाय करून सर्व जिल्ह्यांत दारू, ताडी ( शिंदी ), आफू व गांजा यांजबद्दल मक्ते हरास होतील.

२. एलिचपूर जिल्ह्यांत व उमरावती जिल्ह्या पैकीं उमरावती तालुक्यांत सदर भट्टीत सरकारी देखरेखीखालीं दारू उतरून ठरीव दरानें मक्त्यानें विक्रण्याबद्दल नवीन ( Still head duty, central Distillery and guaranteed minimum revenue system ) व्यवस्था चालू झाली आहे करितां तेथें फक्त ताडी ( शिंदी ), आफू व गांजा यांजबद्दल मक्ते हरास होतील.

३. आफू व तिच्या बनविलेल्या जिनसा याचा मक्ता आणि गांजा व त्याच्या बनविलेल्या जिनसा याचा मक्ता वेगळा वेगळा हरास केला जाईल.

४. प्रत्येक हरास डिपुटी कमिशनर साहेबांचे कचेरींत दिवसां १५ वाजतां होईल.

बुलडाणा—सोमवार तारीख १२ जानेवारी १८९४.

आकोला—सोमवार तारीख २९ जानेवारी १८९४.

वाशीम—सोमवार तारीख ५ फेब्रुवारी १८९४.

वणी—सोमवार तारीख १२ फेब्रुवारी १८९४.

उमरावती—सोमवार तारीख १९ फेब्रुवारी १८९४

एलिचपूर—सोमवार तारीख २६ फेब्रुवारी १८९४.

५. मक्त्याच्या व हरासाच्या शर्तीचे संबंधाची माहिती जिल्ह्याचे कचेरींत मिळू शकेल.

के. जे. एल्. मेकंजी,
कमिशनर.
मुलुक अमानी हैद्राबाद.

## जाहिरात.

हे पाक-पद्य व शिवाय ता. २६।१२।९२ इ. चे वैदर्भीत व शुद्धवऱ्हाडी पत्रांत छापलेल्या औषधी हमेशा मिळतील.

ह्या हेमंत ऋतुंत हिवाळ्यांत खाण्यानें पौष्टिक, शक्तिस्फूर्ति व स्मरण शक्ति, मिळेल; व हस्तपाद, कंबर सांधे, ठणका आणि सर्व वातविकार खात्रीनें नाहींसे होतात. बाळंतीणीस व सर्व स्त्रियांस शक्ती देणारी सौभाग्यसुंठ व सर्व पाक विक्रीस तयार आहेत. बाहेर त्यांनीं मागविल्यास आह्मी व्हाल्युपेबलनेंही पाठवूं. पोष्टखर्च निराळा पडेल. त्वरा करा, गेली वेळा पुन्हा येत नाहीं.

| | |
|---|---|
| १ सालमखिश्रीपाक दर तोलास ( ८० तोळयास ) | किंमत ३ रु |
| २ बदाम पाक | २॥ रु. |
| ३ सालमखिश्री व बदाम प्रत २ | २ रु. |
| ४ सौभाग्यसुंठ | २ रु. |
| ५ कुष्मांड पाक | १ रु. |
| ६ गोखरू पाक | ७ रु. |

७ च्यवनप्राश, वंग वगैरे भस्में व औषधी तयार आहेत.

पत्ता — शिवशरणगीर रामगीर वैद्य कुरणखेडकर दवाखाना.

आकोला — वऱ्हाड.

☞ हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सालअखेर ,, ६ ,, १८
किरकोळ अंकास ..................४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० ३
पुढें दर ओळीस ०-१-६
दुसर खेपेस ......०-१

Single copy ........................ 1as

Advertisement
Below 10 lines...2 Rs
per line over10... 4 as
Repetition per line 3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL XXVIII AKOLA MONDAY 15 JANUARY 1894 NO 3

वर्ष २८ आकोला सोमवार तारीख १५ माहे जानेवारी सन १८९४ इ० अंक ३

### सर्व नजरबंदीच्या माकडचेष्टांस हाणून पाडतां येतें.

मी रस्त्यांत जेव्हां झोकांडी खात चालत असें तेव्हां लोकांनीं माझ्याकडे बोट दाखवून हिणवावें कीं पहा काय बेटा झिंगून गेलेला आहे आणि प्रथम दर्शनीं तुह्मासही खास त्यांच्या सारखेंच वाटलें असतें. परंतु तें सर्व चुकत होतें. भर रस्त्यांत मला चालतांना झोकांड्या येतात म्हणून आपण मला विचाराल तर त्याचें समर्पक उत्तर देण्यास माझ्या आयुष्यक्रमाचें पूर्व मार्गावर थोडेसें गेलें पाहिजे.

आज तागाईत एखाद्या आनंदी व रंगेल मनुष्याप्रमाणें मी सुखी प्राणी होतों परंतु चार पांच वर्षांपूर्वी मला वाटूं लागलें कीं माझ्यांत कांहीं कांहीं तरी कमी जास्त होत आहे. जेवतांना पूर्वीसारखी माझी क्षुधा राहिली नव्हती. मला भूक लागे व खाण्याची ईच्छा होई परंतु तोंडांत घास नेला कीं लागलीच पक्काशय उमळून येई व जसें कांहीं बंडावा करून माझ्या हेतूस हाणून पाडी. हें मला अरिष्ट नवीनच व त्याचें मला मोठें आश्चर्य वाटे. मी जेव्हां ह्मणून खाण्याचा आव घाली तेव्हां तेव्हां मला फारच तिटकारा येई कदाचित पोटांत कांहीं अन्न गेलें तर तें अन्न किंवा मांस न वाटतां एखाद्या शिशासारखें जड वाटे त्यामुळें निजायला जातांना आपल्यास जशी सुस्ती चढून थकवा येतो त्या प्रमाणें मला होत असे. ह्यामुळें रात्रीं झोंपेचा कल अगदीं बदलला झोंप थोडी पण चांगली येई. कधीं कधीं बरोबर येत नसे, व धुंद झाल्यासारखें मला वाटे त्यामुळें मी केव्हां केव्हां आफू किंवा इतर अमली पदार्थ घेत असें. मी जीभ पाहातां तो तिच्यावर थर जमलेला आणि काम करण्याची हौस बिलकूल नाहींशी झालेली असे.

माझ्या बरगड्यांत आणि पाठींत सपाटून दुखत असे व कधीं कधीं ह्या वेदना खांद्यात भाला टोंचल्यासारख्या वाटत. मी आरशांत पाहिलें तों माझे डोळे पिवळे दिसूं लागले. आणि माझ्या दांता व हिरड्यां सभोंवतीं कीट जमलेला दिसे व मुखमार्जन करण्यास पाणी न मिळाल्यामुळें किंवा इतर साधनें दातांजवळ नसल्यामुळें माझ्या तोंडाची घाण फारच येई माझा कोठा फारच जड झाला आणि पक्काशयांत घाणेरडा वायु उत्पन्न होऊन तोंडावाटे ढेंकर देतांना निघून जाई. ह्या वेळेस मला किती वाईट वाटत होतें हें मी कधीं विसरणार नाहीं. ह्या वेळीं रस्त्यांत चालत असतां एकदम घेरी यावी, हृदक बाटावें. आणि गरगर फिरल्यासारखें वाटून लोकांच्या देत चालावें व जमिनीवर सवशेल पडून नमस्कार घालावा लागत असे. माझ्यानें हें विघ्न जितकें टाळतां येईल तेवढें टाळून घेई व आतां तें गेलें असें समजून तो दिवस घालवीत असे.

माझ्या मित्रमंडळींनीं व वैद्यानें जीं जीं औषधें घेण्यास सांगितलीं तीं घेतलीं त्यापासून गुण न येतां मी अगदीं सुदाम देव झाला. व आतां ह्या वस्तीस रामराम ठोकून परलोकचा रस्ता धरावा असें मला वाटूं लागलें ह्या प्रमाणें माझा क्रम चालला होता.

आतां मी तुह्मांस थोडक्यांत निवेदन करतों कीं बरा कसा झालों ह्याचें कारण आपणास कळवावें हें अगदीं रास्त आहे. लंडनांत माझा एक स्नेही होता त्याच्या कानावर माझी गोष्ट पडल्याबरोबर त्यानें सांगितलें कीं मदर सिजेलचा क्युरेटिव सिरप (म्हणजे माता सिजेलचा रोगहारक पाक) तुम्हांस फारच गुणकारी होईल.

माझा कांहीं ह्याच्या म्हणण्यावर भरंवसा बसेना. परंतु एक बाटली तर थोडे दिवस घेऊन पहावी ह्मणून विचार केला. मला ह्या औषधापासून इतका जलद गुण आला कीं मला खातांना बरें वाटावें व झोंप चांगली यावी. मला हें पथ्यावर पडल्यामुळें इतकें बरें वाटलें कीं मी ह्या औषधाच्या आणखी चार बाटल्या पार केल्या.

मी बरा झालों. हें औषध दैविका सारखें वाटलें. मला खचीत वाटलें कीं हें औषध ईश्वराच्या प्रेरणेनेंच मला मिळालें.

मी आतां पुन्हां ताजा तवाना झालों व त्यामुळें ज्या मला आनंदाच्या उकळ्या फुटल्या त्या सांगता पूर्वत नाहींत. आतां केव्हां तरी थोडेसें अपचन झालें कीं जे सर्वांस होत असते, त्या वेळेस मी ह्या औषधाचा लहान घोट घेतो व लागलीच मला त्यापासून आराम वाटतो.

ह्याचा तात्काळ गुण आल्यामुळें मला नजरबंदीच्या खेळाची आठवण होते परंतु खरोखर माता सिजेलचा क्युरेटिव सिरपांत डोळ्यांत माती टाकण्यासारखा कांहीं प्रकार नाहीं. मला अनुभवावरून खात्रीनें सांगतां येतें कीं कितीही जुनाट अग्निमांद्य व अजीर्ण अगदीं वाईट स्थितीपासून असो तरी ह्या औषधा पासून हटकून गुण यावयाचाच.

मी तुमचा उपकार मानणारा
(सही) जे. सी. सिमसन
२१ ह्यानोवरचा रस्ता, न्यूकास्टल अंडर लाईन, स्टाफर्ड शियर ईंग्लन्ड.

B. T.

### विजया दशमीचें सोनें

ALL FOR LOVE

O talk not to me of a name great in story;
The days of our youth are the days of our glory,
And the myrtle and ivy of sweet two—and—twenty
Are worth all your laurels, though ever so plenty.
What are garlands and crowns to the brow that is wrinkled?
'Tis but as a dead flower with May-dew besprinkled:
Then away with all such from the Lead that is hoary!
What care I for the wreaths that can only give glory?
O Fame! if I e'er took delight in thy praises,
'Twas less for the sake of thy high-sounding phrases,
Than to see the bright eyes of the dear one discover
She thought that I was not unworthy to love her.
There chiefly I sought thee, there only I found thee;
Her glance was the best of the rays that surround thee;
When it sparkled o'er aught that was bright in my story,
I knew it was love, and I felt it was glory.

Lord Byron

सवाई

सांगु नको मज पोकळ थोरवि 'बुद्धिबळें यश संचित केलें'
यौवन काळ सुखें क्रमिती नर ते नर; अन्य अहा! जागें हेले।
विंशति आणिक दोन जयीं वय चारुमुखी—वच संचित जोडी,
हास्य सुधारस सेवि यथेप्सित— अन्य यशा नसते अशि गोडी ॥ १ ॥
काय गळा नव पुष्प विनिर्मित हार अहा! जरठा सुख देतो
वाळुनि कोळ सुर्यी दंवमौक्तिक बिंदु कधीं तकवा रचितो?।
काश फुलासम मौळि, जया जरठा बत्र ढंग असा नच साजे
देति अहः! यश केवळ वस्तु; तया मग काय युवे वद कोजे ॥ २ ॥
हृष्ट असे कधिं मानस हें मम त्वद्गुण वर्णिनि कां जर कीर्ते
सत्य कधीं नहि लोलुप मन्मन ढोबळ नीरस त्वत्पदवीते।
'स्नेहभरा मम पात्र असे नर हा' इति सूचक चारु मुखीचे
नेत्र कटाक्ष—लसदू—द्युतिवीक्षण त्वद्गुण वर्णिनि हेतु मनीचे ॥ ३ ॥
प्राणसखी हार्दे शोधियले तुज;— शोध मला बहुतोखद झाला
प्राणसखी हृदयांतुन लोल रुची माणिहार गळा तव ल्याला।
प्राणसखी मुखिं जी चमके द्युति— ऐकुनि रम्य मदीय कथा तीं—
ती तंव 'स्नेह तिचा' मज ठाउक होंच गमे मज उत्तम कीर्ति ॥ ४ ॥

वऱ्हाडसमाचार

मिती पौष शुद्ध ८ शके १८१५

रा. रा. बाळकृष्ण मोरेश्वर साठे सेक्रेटरी, जिल्हा बोर्ड, आकोला यांज कडून सर्व लो-कांस कळविण्यांत येतें कीं वायव्य प्रांतांतील हापूर शहरा पासून ४ मैलावर व मिरत पासून २४ मैलावर "बाबूगड" नांवाचें गांव आहे तेथें हिंदुस्थान सरकारनें शेतकी करितां घोडे तयार करण्याची व त्याचे कडून शेतकीचीं कामें करविण्याची एक संस्था काढिली आहे. तेथें शेतकामें म्हणजे नांगरणें, मोटा ओढणें वगैरे घोड्या कडून केलीं जातात व हीं कामें बैलांच्या प्रमाणें चांगलीं होऊन अधीक जलदीनें होतात. या संस्थेंत तबेल्याची व्यवस्था, घोड्यांची जोगवणूक, त्यांचा शेतींत उपयोग करण्याची तऱ्हा, घोड्यांस चरण्या करितां चांगलें गवत लावून तयार करण्याची रीत, घोड्या कडून पाटाच्या पाण्याचीं शेत कामें करविण्याची पद्धत इत्यादि विषय वरील संस्थेंत शिकविले जातात. आणि ते शिकवितांना चालू शेतीचे प्रकार व नवीन प्रयोग हे ही दाखविले जातात. तेथें व्याख्यानें तारीख ८ पासून १६ आगष्ट पर्यंत झालीं आणि गेल्या ८६ वे तारखेस सुरू झालेलीं व्याख्यानें गेल्या २ तारखेस संपलीं. मिरत पासून एक रुपया भाडें बाबूगडाला पडतें. हापुर येथें राहावें किंवा बाबूगडास तंबू ठोकावे म्हणजे सर्व बाजारच्या सोयी तेथें मिळण्या सारख्या आहेत. ज्यांना वरील शेतकामें, व खत घालणें, पाणी उंचीवर चढविणें, पेरणी करणें वगैरे कामें स्वतां शिकण्याची इच्छा असेल ते बाबूगडास गेले असतां त्यांस ते ते विषय सप्रयोग शिकविले जातील आणि त्यांची परीक्षा घेऊन योग्यते प्रमाणें त्यांस सरटी फिकीटें ही दिलीं जातील. जे गृहस्थ हा उद्योग करूं इच्छितात त्यांनीं आपापलीं नांवें जिल्हा बोर्डा मार्फत डेपुटी कमिशनरास कळविली असतां त्या प्रमाणें पुढें व्यवस्था प्रांतिक सरकारा कडून केली जाईल.

तारीख ३० डिसेंबर रोजीं राष्ट्रीय सभेमध्यें १९ वा ठराव असा पसार झाला कीं युरोपियन आणि युरेशिअन लोकांचें हुंडणावळीचा भाव उतरल्या मुळें होणारें नुकसान भरून काढण्या साठीं पगारा शिवाय निराळी जास्त पगाराची नेमणूक करून दिली आहे तिच्या मुळें सालिना एक कोटीवर खर्च वाढला आहे आणि त्या खेरीज १३८००० पौंड पर्यंतच्या फक्त व्यांकेचेंच नुकसान भरून दिलें जात आहे या उभय गोष्टींस राष्ट्रीय सभा अत्यंत प्रतिकूळ आहे. आणि ही खर्चाची वाढ अशा वेळीं झाली आहे कीं ज्या वेळीं जमाखर्चाचीं दोन्ही तोंडें मिळतीं नाहींत इतकेंच नाहीं तर देसावर निराळ्या कराचा बोजा बसण्याची मोठीच भिती आहे.

~~ह्या~~ १५व्या ठरावावर भाषण करिते समयीं बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी बोलले; त्या वेळचें

त्यांचें बोलणें फार आवेशयुक्त, मुद्देसूत व अंतःकरण हालवून सोडणारें असें झालें. त्यांचें अनुपम, चित्तवेधक व अमृतमय भाषण ऐकिलें किंवा वाचलें म्हणजे आपल्या अंतःकरणाला कोणी विचारस्पर्शीनें बांधून टाकिलेलें आहे असें वाटतें. खरोखरच त्या भारतीय वक्त्याच्या जिव्हाग्रीं सरस्वती वसत असावी. नाहीं तर असलें अद्वितीय वादकौशल्य आणि रसभरित शद्बरचना कोठून असणार! त्यांचें भाषण संक्षेपानें प्रसिद्ध झालें आहे त्याचा मराठींत अर्थ केला तर तो येणें प्रमाणें होईलः—

लार्ड लान्सडाऊन नाण्याचा कायदा व हुंडणावळीचा अलावन्स या विषयीं बोलतांना ह्मणाले कीं हा कायदा ह्मणजे 'तारीख २६ जून रोजीं केलेला गुन्हा' होय. हे त्यांचे यथार्थ व गोड शद्ब मला पक्के आठवतात. खरोखर त्या वेळच्या कित्येकांच्या मनानें असाच स्पष्ट निर्णय केला. आणि मला वाटतें त्यांनीं त्या गोष्टीचें भावी स्वरूप लक्षांत आणिलें तर ते ह्मणतील कीं इतिहासांत याला गुन्हा हेंच नांव निःसंशय मिळेल. गुन्ह्याहूनही हा नीच प्रकार झाला. ही राजकीय ढोबळ चूकच आणि ही एवढी भयंकर आहे कीं तिचा परिणाम किती वाईट याची कशानेंही कल्पना होणार नाहीं. हुंडणावळीच्या अलावन्सा संबंधानें मी खरोखर आंग्लो-इंडियन आफिसरांस विचारतो कीं हल्लीं रुपयाचा भाव पौंडाला पंधरा अगर सोळा रुपये किंमत येण्या इतका उतरला आहे त्या ऐवजीं तो भाव पौंडाला पांच अगर सहा रुपयेच पडण्या इतका चढला असतां तर त्यांचा पगार कमी अथवा उणा त्यांनीं पडूं दिला असता काय? आणि तो कमी पगार त्यांनीं निमूटपणें पतकरला असतां काय? सर्वत्र एकच गहजब उडला नसतां काय? आणि प्रत्येक इसम त्यांत सामील झाला नसतां काय? कारण कीं इमानदार आफिसरांच्या इमानी वर्गावर अन्यायाचा अनर्थ व डोंगर कोसळला असतां! आफिसरांचें हित पाहणें होतें तर लोकांचेंही हित पाहिलें पाहिजे होतें. खरोखर आफिसरांच्या कल्याणा पेक्षां लोकांच्या कल्पाणाची अगोदर पर्वा केली पाहिजे. सरकारनें हो कबूल केलें आहे कीं या अलावन्साला आफिसरांचा कायदेशीर हक्क कांहीं पोंचत नाहीं परंतु तो त्यांना देणें आमच्या सात्विकपणावर अवलंबून आहे. नीतिमंदिराच्या उंच शिखरावर हिंदुस्थान सरकार चढलें आहे ही मोठी आनंदाची गोष्ट मला वाटतें पण सरकारला मी सांगतो कीं त्यांनीं सिव्हील सर्व्हीस परीक्षेच्या प्रश्नावर भवतिनभवति केली तेव्हां या न्यायाच्या व नीतीच्या विचाराला तिलांजली दिली नव्हती काय? हा प्रश्न ह्मणजे नेटिवांस त्यांच्याच देशांतील राज्यकारभारांत हात घालण्याचा अधिकार देण्या विषयीं होता आणि हा हक्क कोणी हिराऊन घेऊं शकत नाहीं. परंतु सरहद्दीवरील लढाईचा, एक आर्लिक्य चौफेर कोट बांधण्याचा, अमीराला वर्षासन करून देण्याचा किंवा आफिसरांस अलावन्स देण्याचा असले प्रश्न निघाले तेव्हां नीतीची व सात्विकपणाची धर्मशास्त्रें लोकासमोर मांडलीं. त्याच नीतिमत्तेच्या पायरीवर मी चढतो आणि सरकाराशीं त्यांच्याच मुद्यावर मी लढाई करूं इच्छितो. मी सरकारची बाळंबाळ खातरी करून देतो कीं सरकारला अलावन्स देण्यास कोणतीच योग्य सबब नव्हती आणि सरकारचें जें गृहीत तत्व त्या वरूनच मी असें प्रतिपादितो. मी विचारतो कीं हा देश मुळ कोणासाठीं? कोणाच्या सुखासाठीं हे आफिसर लोक ठेविले आहेत! इंडियन लोकांच्या साठीं हें असल कीं नाहीं? आणि तें तसेंच असेल (व सरकार ही असेंच ह्मणतें) तर लोकांचें हित अगोदर पाहिलें पाहिजे आणि आफिसरांच्या साठीं तें हित बाजूस सारतां कामा नये. परंतु मला तर वाटतें कीं लोकांच्या हिताची बुद्धिपुरस्सर आहुती दिली आहे. आणि फंड नाहीं ह्मणून ओरड चालविली व लोककल्याणाच्या नित्याच्या गोष्टी देखील नीट केल्या नाहींत; परंतु जेव्हां अलावन्स देण्या विषयींचा प्रश्न निघाला तेव्हां जगामध्यें दुसरें धनाढ्य सरकारच नाहीं एवढी श्रीमंती वाढली. नुकतेच आतां एक गृहस्थ बोलले कीं, अलिकडील थोड्याच वर्षांत दोन कोटी लोक उपासमाऱ्यानें मरण पावले आणि चार कोटी लोक दिवसांतून एक वेळच्या भाकरीवर जगले आहेत. हा असा उपासमार काढीत असलेल्या लोकांवर आणखी करांचा बोजा लादावयाचा आहे तो अशा कारितां कीं, भारी पगारवाल्या आफिसरांची ब्रांडी, मांस, व चांपेन हे पदार्थ त्यांस पुरविले पाहिजेत. (लाजिरवाणी गोष्ट ह्मणून टाळ्यांचा सिंहनाद) अशा गोष्टी सांगूं लागलें ह्मणजे किती संताप येतो ह्मणून सांगावें! सरकार स्वतांस नाणवीत असतें कीं, तें सुधारलेलें, ख्रिश्चियन, व पुण्यशील असें आहे. आणि त्यांच्या धर्मपुस्तकांत असें लिहिलें आहे कीं, पुण्यवान् वृत्ति हीच राष्ट्राचें वैभव आहे. वरील सरकारचें कृत्य हीच ना सुधारणा व ख्रिस्ती धर्म? व पुण्यशील वर्तनाशीं तें जुळतें नव्हे काय? सरकारचें हें मी अत्यंत खलपणाचें अपकृत्य समजतों आणि त्याचें वर्णन करण्यास मला शद्ब देखील आठवत नाहींत. मी सर्व लोकांची विनवणी करितों कीं, अन्यायाची ही मर्यादा लोटली आहे तर आपण स्वस्थ बसूं नका आणि बुद्धिपूर्वक सरकारनें जो लोकमताचा अपमान केला त्याचें उटें काढलें पाहिजे. हा देश गोऱ्या आफिसरां साठीं आहे किंवा येथील लोकांच्या साठीं आहे? मी पंजाबच्या लोकांना, बंगालच्या लोकांना, मुंबईच्या लोकांना व मद्रासच्या लोकांना निक्षून सांगतों कीं, त्यांनीं गुपचीप बसूं नये व त्यांनीं एकत्र होऊन झटलें पाहिजे. या आफिसररूपी देवांना पदभ्रष्ट करून त्यांच्या सिंहासना वरून त्यांना खालीं ओढा. हा देश त्यांचा आहे आणि एतद्देशीय लोकांचा नाहीं असा भ्रम त्यांना आहे तर त्या भ्रमाचा भोपळा आपण फोडला पाहिजे. आपला हा देश आहे. इंडिया देश इंडियन लोकांसाठीं प्रथम आहे. आणि नंतर इंग्लंडवाल्यासाठीं आहे. आफिसरांस हें कळलें पाहिजे. आणि ते जर आमच्या लोकांचें कल्याण व त्यांचें कल्याण हीं दोन्हीं एकसारखीं करितील आणि ब्रिटिश राज्याचा पाया ज्यांनीं आरंभीं घातला त्यांच्या सारखें या देशाच्या लोकांवर ते अद्भुत प्रेम ठेवतील आणि अंतःकरणांत कळवळ्याची अनुभूति जागृत ठेवतील तरच आम्ही शांत व स्वस्थ राहू असें या आफिसरांनीं लक्ष्यांत बागविलें पाहिजे. इंडियाच्या राज्य कारभारांतील बेंटिक, क्यानिंग, व रिपन या सारखे महात्मे कोणी कडे अस्तास गेले आहेत. बरें! त्यांचे तेच होऊन गेले! मेहरबानी करून माझ्या स्वताच्या विचारा विषयीं व राष्ट्रीय सभे विषयीं चुकीचा ग्रह लोकांनीं होऊं देऊं नये. आफिसर लोकाशीं आमचें कांहीं वैमनस्य नाहीं. किंबहुना त्यांच्या कंपूमध्यें ह्यूम साहेब आम्हास मिळाले. ह्यूम साहेबांनीं आफिसर व इतर लोक—मग ते युरोपियन असोत अगर इंडियन असोत-या उभयता मध्यें स्नेहभाव प्रेरित केला आणि हें काम दुसऱ्याच्या कोणाच्या हातून असें अजून झालें नाहीं. इंडियन लोक या वाईट अभागी वेळेवर निपजले आहेत आणि म्हणूनच ते अशा बाळगतात व प्रार्थना करितात कीं सर्व सुखाचा दाता तो परमेश्वर या भाग्यहीन देशाचा उद्धार करो!

वरील आशयाचे नामदार बानर्जी यांचें भाषण झाल्यावर मि. चेम्बर्स मुंबईचे प्रसिद्ध शिल्पकार हे अनुमोदन देतानां मोठ्या कळकळ्यानें व आस्थेनें म्हणाले कीं: या सभेत मी एक इंग्लिशमन आहे 'आणि आज तीनचार दिवस मी ज्या अनेक गोष्टी ऐकिल्या आहेत त्या वरून माझी मला मी इंग्लिशमन आहे याची लाज वाटते" हे त्यांचे उद्गार प्रत्येक आंग्लो इंडियनानें ध्यानांत धरावे आणि आपल्या नांवावरील काळिमा पुढील वर्तनानें नाहींसा करावा.

---

मुंबईस जो भयंकर दंगा हिंदमुसलमाना मध्यें झाला त्या संबंधानें मुंबई सरकारचा ठराव बाहेर आला आहे. हा ठराव वाईट व खोटा नाटा होईल अशी भिती पडली होती परंतु एकंदरीनें हा चांगला समाधानकारक आहे. १८७४ सालीं मुंबईस असला दंगा झाला होता खरा पण त्याचें स्वरूप सौम्य असून तो लवकर शांतपणें मिटला. अशा दंग्यांस एकच कारण असें बहुधा नसतें. अनेक कारणें एकत्र जुळतात तेव्हां एखादा ठिणगीनेंस वेज्वालाग्राही एकदम पेटतात आणि एकच आगीचा लोळ दृष्टीस पडतो. तसाच प्रकार या दंग्यात झाला. गोरक्षण सभा निघाल्या आणि त्याच्या मुळेंच दंगा उसळला असें मुसलमान व हिंदुद्वेष्टे आंग्लो इंडियन लोक ह्मणतात पण तें योग्य कारण नाहीं असें सरकारचेंच मत आहे. हिंदू लोक ह्मणतात कीं गोरक्षणानें गोमांस भक्षण करणाऱ्यांचें मन बियरलें असावें तथापि प्रभास पट्टणच्या मुसलमान हेरांनीं मुंबईतल्या जातभाईस भडकाव्यास प्रवृत्त केलें आणि जुम्मामशिदींतून मुसलमान साटे व हत्यारें या सहित दीन दीन करीत बाहेर पडले या वरून त्यांचा पूर्व संकेत दिसून पडला. गुन्हे करून उपजीविका करणाऱ्या मुसलमान लोकांचे दुष्ट कळ व बेकायदा वर्तन हीं दंग्यास कारणें नाहींत तरी दंगा माजण्यास अशा लोकांचा मोठाच जोर मिळाला ही गोष्ट सरकारनें लक्ष्यांत घेतली नाहीं. सरकारचें मत असें आहे कीं दंगे इतरत्र चालले होते तीच धुमाकूळ मुंबईंत पसरली आणि शिवाय हिंदू लोकांवर सरकारची विशेष मेहेरबानी आहे असाही मुसलमानांचा ग्रह आहे या मुळें त्यांचीं मनें थोडक्या कारणानें बावरलीं आणि त्या योगें फार भयंकर अनर्थ कोसळला. या पेक्षां निराळीं अतस्थ करणें घडलीं असलीं तरी त्याचा तपास लागावयाचा [illegible] आणि कोळसा उगाळावा तितका काळा निघणार ह्मणून सरकार विशेष चौकशा चालविण्यास नाखुष आहे! हा ठराव नीट झाला तथापि जातिमत्सर व धर्मवैर हीं प्रचलित न होतील अशा विषयीं सरकारनें कांहीच तजविज केली नाहीं हें गैर झालें. जुन्या परंपरेनें चालत आलेल्या हक्का संबंधानें तंटे पडून हिंदुमुसलमानांत भांडणें व दंगे उद्भवतात त्यांचा बीमोड करण्यास निराळीच योजना झाली पाहिजे.

---

सालाबाद प्रमाणें इंग्रजी वर्ष प्रतिपदेस लहान मोठ्या मानाचे किताब सरकारांतून दिले गेले. त्यापैकीं एकही किताब वऱ्हाडांतील कोणा गृहस्थास मिळाला नाहीं ही गोष्ट आह्मास चांगली वाटली नाहीं. किताबांच्या तिजोरी देखील सरकार आमच्या प्रांता साठीं बंद ठेवितें ह्मणून नवल वाटतें. किताबांचा मान पोकळ आहे व असले मान मिळविण्याचे मार्गही निराळे आहेत ते बहुतेक किताबवाल्या पासूनच शिकले पाहिजेत.

---

नामदार फेरोजशहा मेथा यांस सी. आय. इ. हा किताब यंदा दिला हें ठीक झालें. सरकारला कित्येक वेळीं आपल्या किताबांचा मान आपल्याच हातानें राखावा लागतो आणि तो प्रकार नामदार मेथा संबंधानें झाला. जे गृहस्थ आपल्या करामतीवर, लोकमताच्या जोरावर व आफिशिअल लोकांच्या हवेलंडी मुळें कायदे कौंसिलदार होऊन सर्वमान्य झाले आहेत त्याच्या नांवा पुढें सरकारी किताब नसला तर त्यांत सरकारालाच कमीपणा येतो! व अशा पूज्य व लौकिकसंपन्न लोकांचा नाममहिमाच किताबाहून फार मोठा असतो.

---

नामदार फेरोजशहा मेथा यांच्या जोडीला दुसरे राष्ट्रीय सभेचे पुरस्कर्ते मि. अर्डले नार्टन यांचा निवड मद्रास इलाख्यातर्फे व्हाइसरायच्या राष्ट्रीय कायदे कौंसिलदाराचे जागीं झाली हें कळविण्यास परम आनंद वाटतो. लोकमताचा विजय व थोर पुरुषाचा धन्यवाद परिणामीं होतच असतो!

---

The Berar Samachar

MONDAY JANUARY, 15, 1894

## AN ENGINE OF OPPRESSION

### (सरबराई.)

The move of the officers from one place to another brings with it a train of 'forced labour' and 'forced contributions of supplies' The *Burra Sahib* has under his lock and key an automatic machine of intelligent men. So the story runs. There is an electric communication between the Sahib's soul and the souls in the artificial machinery-A thought in the Sahib's mind passes its electric current in that of his subordinate and the message runs down with heavenly speed to the lowest Jaglia in the rank. All subordinates spring up to their toes of their own accord and bring into play all powers of backdoor influences, injustice, and

oppression. Their only work is to administer to the wishes of him who stands next in rank to him and this process goes on till it reaches the wishes of the kingly Sahib. From the Resident down to the Jaglia peon all officers either in Civil, Revenue or police department, excluding of course some honorable exceptions, get their travelling supplies through forced labour and forced contributions. We do not say that the Sahib Logas have intentionally recourse to such faulty ways of doing. But we are sure that most of them don't care to know whence and how their things reach their hands. Their fault may not be of commission but it is certainly of omission. The self-moving subordinates go with a deep-rooted idea that they are paid their salaries because they serve their premier officers so diligently in Serbarai matters. At least a conceit works in their minds that their salaries and remunerations for official work are not less essentially dependent upon the good will and the good grace of the Sahib Logas while on tour. Good Sarabarai threatens to become the passport to service and promotion; and many persons are, we are told, not ignorant of this way of admission.

This Sarabarai is not the curse of this province only but it is the rampant evil in other sister provinces also. The Imperial Legislative Council is not free from its contamination Yet the direct remedies to put a stop to the evil are sussessfully evaded. The curse multiplies and augments in its extent and direful effect when it is discussed without any effect. Woe be to the benign rule which tolerates through its admistrators such a system of compulsory Serbarai! In Berar the system is of the worst type because the ryot is mild, submissive and ignorant.

In old days, the people welcomed an officer of Government with due decorum. The hospitality of India is proverbial and in the early times of plenty—the ryot cared little for the provisions of a Sahib. Besides there were not so many ways of communications and there were scarcely markets available in petty villages, and minor suburbs. Only the headquarters of districts provided a market for all sorts of things. When officers on tour in the interior and in beggarly places felt much the want of due provisions government servants in charge of the Taluka or village used to keep up all arrangements for the reception of the official visitors; and since then it has been the ruling custom to expect as a matter of right wood and grass, eggs and beef, vegetables and butter, and grain and drink, free of all costs from the people of the locality and it was deemed the honored duty of Tahasildars, Patels, and Jaglias to exact it from the ryots under their control. Who will pitch the tents of big officers? Catch poor passers-by, get them to work and get rid of them with a kick in return if they happen to complain. Who will carry their bag and baggage? The cartsmen who live on hire must work *gratis* if they mean to ply their business in that locality. Head-loads of fire wood and grass, sugar, milk, butter, vegetables, and all sorts of provisions for food and drink must be ready at the beck of the Sahib's Jamadar and Butler. The last two *personages* play an important part. They must certify as to the fulness and quality of the Serbarai. Otherwise at their frowning signal down goes the Tahasildar with his huge train of Sarbarai ministers. Poor helpless and voiceless creatures of the Oifficial Gods! But we learn that these hard times have laid down a procedure which is followed with the regularity of day and night. The Patel for example passes receipts for having received money for the Serbarai expenses in *toto*. The Sahib pockets them though sometimes some goodlier officers pay off the bills but know little as to where the money goes. The stricter the forms the greater is the tact and invention in vogue to avoid payments for the Sarabarai. The above mentioned creatures also have turned out worldly wise men. They trade in the Sarabarai to make hay while the sun shines. It is indiscreet to be wise where ignorance is bliss. If the poor *kunabi.* is screwed to a high pressure on account of the reception of the official why should he be grudged the honor of giving Sarbarai. tothose exacting it for superiors. When all ups and downs thus become the same in their eyes the kunabi is drained to his very blood.

Look now how the matter stands. It is for the ryot to volunteer their hospitality to the visiting official. But this voluntary offer is now changed into an imperative demand. None of the Government servants pay a *cowari* as his quota. Even if it be granted that the services and provisions of the ryots are paid off the rates are *horribly cheap*. Nothing can be cheaper like that. Half-paid or partly paid or paid nominally, as the people are for the sake of mere legal formality villagers have a nice way of arguing their luck. They philosophise upon the matter and pride themselves upon the fact that they have fed the Sahib-Logas including of course (Rao Khan, Shet Dada Appa Anna &) sahibs among the natives. The latter receive per month piles of Rupees and receive extra Bhatta for touring. But a strange destiny has taught them to look upon it as a portion of their salaries. Instead of being a little liberal in their accounts of the Sarabarai—they turn traitors to the goodness of God. Because He gave them ample riches in comparison with the wretched persons that serve them they play false with Him and treat a fellow creature in cold-blooded indifference. The Government ought to legislate and give a moral tonic to these officials who are habituated to the Sarabarai.

We are sorry we have no men in the Imperial Legislative Council to move in this matter in behalf of this province. But whatever powers of interpellation can effect is little in comparison with what we ourselves can effect through our direct access to the heads of the Berar Government. In Mr. Plowden and Colonel Mackenzie we have got first-class chastisers of the oppressors. We earnestly pray to them to sift the matters so as to give a lie to the current reports or to redress the grievances of the wronged people with no loss of time. In their elevations to the Residentship and Commissionership people have rejoiced because they have securely committed their best and dearest trusts to their care. In their high sense of justice, liberal and broad-minded views, and sympathising and winning manners the people have great confidence and we shall make bold to assure them that they will sooner or later realize the goodness of their long and varied powers of administration as well in the Serbarai affair as in other departments. Before we conclude we shall adventure two proposals for favourable consideration:—

There shall be no more Sarabarai through the Taluka and village officers 2ndly Let the touring officers manage their own things even with an increment in the Bhatta or let Contractors tender in their services to supply them with men and provisions. We think either of the two ways will do the desirable work.

## THE GRAND OLD MAN OF INDIA

(Communicated)

Saturday the 6 th. current is a red letter day in the history of Manmar. The station presented a unique spectacle. Men poured in from Nassik, Yeola, Sinner and other places in the vicinity. Mr. Bapusahib the Chief of Vinchur led the joyous band of not less than 600 persons. A 'short address and a shorter picnic' was all that time could permit. It was but one scene of gladsome acclamations and heartfelt rejoicings. The Chief read his eloquent address and others were assumed to be read. Then Mr. Dadabhai Naoroji rose to address the people amidst the cheers of the persons assembled. He began by thanking the people for the honour given to him. He alluded to the circumstances of the entrance of an Indian in the House of Commons and remarked that that was a memorable event in the annals of the History of India. He expressed that he himself rejoiced with the people for that event. That Englishmen should elect an Indian to speak for them, was in his opinion a fresh proof that British people wish to deal impartially and fairly with them. He said that his election was hailed with joy in England as in India as the British people felt sure that the Indian side of every question relating to India would be properly put before the House. From the same point of view the election was pleasing to the members of Parliament. The greater attention, paid by the House to Indian questions and the support he received from the Honorable Members as well as from the Government was in his opinion due to the fairness with which Englishmen deal with all; and he remarked that this is one of the proofs, if required, of the fairness of the English people. Then he alluded to the resolution of the 2nd June 1893 regarding the Simultaneous Examinations. He told the people that that was due to their efforts as well as to the desire created by their efforts in the hearts of English—men to interest themselves in Indian questions. He remarked that the question would never have been brought to its present practical phase but for their efforts and added that that was another instance of the fairness of the English people. Here he assured that the Government promised to give effect to the resolution, referred to. From all these facts he concluded that the future for India was bright but at the same time he pointed out that it lay in their hands. He asserted that if they would be true to themselves and their country and make all the necessary sacrifices he had not the shadow of a doubt that in dealing with such justice—loving people as the British people, they would not work in vain. Here he asked the people to imitate the British people and to look to their efforts towards political emancipation. He advised the people to go on united and earnestly in concord and harmony. He then expressed his wish that if people were to act in harmony and concord, English rule would come to be felt a blessing and a gift of the Almighty on India. He brought his speech to a close by a repetition of thanks for the honour given to him. The speech was followed by loud cheers. Amidst cheers Mr. Dadabhoy Navroji left the place and went to his carriage. After some minutes the train left the station amidst loud acclamations "Dadabhoy Ki Jai" and left all the people to reflect and to wonder.

We are glad to congratulate Mr. Vishnu Moreshwar Mahajani M. A. upon the brilliant success of his son Mr. Rambhau in the late Final B. A. Examination. Mr. Rambhau has won the Bhau Daji Prize in Sanskrit. He is now appointed a Daxina Fellow in the Deccan Collage He intends to prosecute his studies first for the degree of M. A. and then for the degree in Law We wish him great success in his future career and hope to see him prosper and occupy, as a worthy son of his father, an enviable position in society.

## वऱ्हाड.

अलिशान रेसिडेंट मि. प्लौडन साहेब यांची स्वारी काल दोन प्रहरीं आकोल्यास येऊन दाखल झाली.

लेफटेनट डब्ल्यू. हेरा असि० कमिशनर, वणी जिल्हा, व लेफटेनट एफ. आर. माडिट असि. कमिशनर, उमरावती जिल्हा, आणि मि. सी. इ. ब्रिडल्फ असि. कमिशनर या तिघेजणांस माजिस्ट्रेट वर्ग १ चे अधिकार दिले.

रा. रा. कृष्णराव हरी कोल्हटकर एक्स्ट्रा असि. कमिशनर, बुलढाणा यांस असिस्टंट कमिशनरचे संपूर्ण मुलकी अधिकार देण्यांत आले.

राव साहेब देवराव विनायक वकील यांस अफू कमिशन समोर मुंबई मुक्कामीं येत्या फेब्रुवारी महिन्यांत साक्ष देण्या साठीं हजर राहण्या करितां सरकारांतून विनंती करण्यांत आली आहे.

रा. रा. रामचंद्र विष्णु महाजनी हे गेल्या बी. ए. च्या परिक्षेंत दुसऱ्या वर्गांत पसार झाले व त्यांसच भाऊदाजींचें संस्कृत बक्षीस मिळालें ह्मणून त्यांस डेकन कालेज मध्यें फेलो नेमण्यांत आलें हें कळविण्यास संतोष वाटतो. आतां ते एम. ए. परिक्षेचा अभ्यास करित आहेत.

गेल्या १ ले तारखेस कारंज्यांस मोठा उत्सव झाला. मे. निकोलेट डेपुटी कमिशनर व दुसरे अधिकारी त्या समयास आनंदानें नेटावांत मिसळल्यामुळें मोठी मौज झाली.

## नोटीस.

विद्यमान डेप्युटि कमिशनर साहेब बहादूर जिल्हा अकोले यांचे कचेरीतुन

सर्व लोकांस प्रसिद्ध करण्यांत येतें कीं अकोले जिल्ह्यांतील बाजाराचे लिलाव खालीं लिहिल्या तारखेस दिवसा बारा वाजता त्या त्या तालुक्यांतील तहसिलदारांचे समोर केले जातील त्या तारखा.

| | |
|---|---|
| अकोले तारीख | ५–२–९४ |
| अकोट तारीख | १२–२–९४ |
| बाळापूर तारीख | १९–२–९४ |
| खामगांव तारीख | २६–२–९४ |
| जळगांव तारीख | ३–३–९४ |

बाजार लिलावाच्या शर्ती संबधाचे नियम जे हल्लीं अमलांत आहेत त्या संबंधाची माहिती तहसिल कचेरींत मिळूं शकेल.

कळावें तारीख १२ माहे जानेवारी सन १८९४ इसवी.

R. P. Colomb
For
Deputy Commissioner.

## वर्तमानसार

अनिवार करांचा परिणाम— इटलीच्या ताब्यांतील सिसिली बेटांत राहणाऱ्या लोकांवर बादशाही आणि स्थानिक करांचें ओझें इतकें असह्य झालें कीं त्यामुळें वैतागून लोकांनीं मोठमोठे दंगे केले, टाउनहाल, पोस्ट आफिसें, आणि फौजेच्या बराकी मोडून तोडून उध्वस्त केल्या. लरकारा येथें लोक व लष्कर यांच्या मध्यें मोठी मारामारी होऊन पुष्कळ लोक मेले असें रोमच्या तारेवरून समजतें. रयतेच्या शक्ती पेक्षां जास्त कर बसविणाऱ्या राजांनीं हें पाहून सावध व्हावें.

बंगाल कोल कंपनी ह्मणून बंगाल्यांत एक मंडळी आहे. तीस ता० ३० एप्रिल सन १८९३ मध्यें संपणाऱ्या सहा माहींत २१२००० रु० निवळ नफा झाला. ह्या कंपनीचें भांडवल २४ लक्ष रुपये आहे. हीं उदाहरणें पाहून ही आमच्या व्यापाऱ्यांस ह्या कामांत भांडवल घालण्यास धैर्य होत नाहीं हा खरोखर चमत्कार आहे.

स्तुत्य देणगी—संस्कृतास उत्तेजन—बाबू भुदेव मुकर्जी ह्या देशाभिमानी आणि उदार बंगाली गृहस्थानें १॥ लक्ष रुपये रोख, आणि एज्युकेशन ग्याझीटचें उत्पन्न बंगाल्यांतील ब्राह्मणांत संस्कृत भाषेचा अभ्यास वाढावा ह्मणून दिलें आहे.

स्टेट सेक्रेटरीवर हुकूमनामा— मोऱ्यांच्या संबंधानें कर घेणें योग्य नसतां हुगळी येथील कलेक्टरानें आपल्या पासून ५०० रुपये घेतले आहेत ते परत द्यावे असा दावा सरतेंद्र मोहन टागोर यांणीं हुगळी येथील सबजज्ज कोर्टांत स्टेट सेक्रेटरीवर लाविला होता. किती रकम गैरशिस्त घेतली या बद्दल कमिशन नेमिलें होतें. त्यांनीं अभिप्राय दिल्या प्रमाणें ३१०९ रुपये, सगळा खर्च, आणि सन १८७७ च्या जुलै पासून वादीच्या पदरीं रुपये पडे पर्यंत दरसाल शेंकडा ६ टक्के प्रमाणें व्याज स्टेट सेक्रेटरी यांणीं वादीस द्यावें असा हुकूमनामा सबार्डिनेट जज्जानीं दिला आहे.

विक्रीचा जाहीरनामा— पंजाब चीफ कोर्टाचा ठराव—कोर्ट मार्फत ज्या मालमत्तेची विक्री होते तिची वर्तमान पत्रांतून जाहिरात देण्यासाठीं प्रोसेस फी घेण्याची जी वहिवाट आहे ती गैर कायदा आहे जाहीरनामा करणें ही प्रोसेस नव्हे असा सिव्हिल प्रोसिज्युअर कोडचा किंवा कोर्ट फी कायद्याचा मतलब आहे ह्मणून जाहीरनाम्याबद्दल प्रोसेस फी घेण्याची वहिवाट बंद करावी. जाहीर नाम्याचा खर्च मालमत्तेच्या विक्रीच्या पैशांतून घ्यावा असें पंजाबच्या चीफ कोर्टानें ठरविलें आहे.

लढाऊ यंत्र—स्पेन देशांत बार्सीलोना येथें ग्लोबो नांवाचें एक वर्तमानपत्र प्रसिद्ध होत असतें. स्पेन देशांत एका कुशल कारागिरानें एक लढणारें यंत्र तयार केल्याची बातमी त्या पत्रानें दिली आहे. हें यंत्र म्हणजे मनुष्याच्या आकृतीचा एक लोखंडी पुतळा तयार केला असून त्याच्या पोटांत काडतुसें वगैरे भरलीं असून त्याच्या हातांत एक बंदुक दिलेली आहे. घड्याळा प्रमाणें त्याच्या पोटांत रचना केलेली आहे. त्यास किली दिली कीं तो पुतळा एका मिनिटांत ४० बार काढतो त्याच्या डोक्यांत पुष्कळ डायनामाईट भरून ठेवलेले असतात अशासाठीं कीं कदाचित तो पुतळा शत्रूच्या हातीं लागला तर ज्यानें ते डायनामाईट पेटविले म्हणजे त्या पुतळ्याचा शंकडे होऊन शत्रूचे शेंकडो लोक मरावे. कित्येक लढवय्या परीक्षकांच्या समोर ह्या यंत्राची परीक्षा घेऊन तें उत्तम ठरलेलें आहे. हल्लीं स्पेनसरकार व मेलिला येथील मूर लोक ह्यांच्या मध्यें लढाई चालू आहे तेव्हां तुम्ही मला २००००० पौंड द्याल तर असलीं शंभर लढाऊ यंत्रें घेऊन मी लढाईच्या ठिकाणीं जातों असें ह्या कारागिरानें स्पेन सरकाराशीं बोलणें लाविलें होतें पण तें त्या सरकारानें कबूल केलें नाहीं असें सदर पत्रांत लिहिलें आहे. ह्या हकीकती वरून ह्या एकोणिसाव्या शतकास सुधारलेला कीं राक्षसी काल म्हणावा ह्याचीच पंचाईत पडते. शु० सू०

येणाऱ्या गव्हरनर जनरलांस मुंबई म्युनिसिपालिटीनें मानपत्र देण्याचें ठरविलें आहे.

सेविंग ब्यांकेंत आज पर्यंत पावणे चार टक्के व्याज देण्यांत येतें, पण येत्या एप्रिल पासून साडे तीन टक्के देण्यांत येईल असें सरकारानें ठरविलें आहे.

युरोपांत लंडन व त्याच्या आसपास पारीस, रोम व इतर ठिकाणीं बर्फ व थंडी यांनीं कहर करून दिला आहे.

मद्रासचे मि. नार्टन यांस गव्हरनर जनरलांच्या कायदे कौंसिलचे मेंबर नेमलें.

मद्रास इलाख्यांत कालरा फार सुरू असून बंगलोर जिल्ह्यांत दोन हजार माणसें मेलीं.

राणीपेठ येथें पटकीचा वाखा सुरू झाला आहे व त्या करितां तेथें भरणाऱ्या आठवड्याच्या जत्रा बंद करण्यांत आल्या आहेत.

गव्हरनर जनरल लार्ड लानसडौन यांस कलकत्त्याचे लोक ता. २२ रोजीं शेवटचा बाल देणार आहेत.

मध्य हिंदुस्थानसरकारच्या ताब्यांतल्या १४६ इस्टेटी हल्लीं सरकारच्या ताब्यांत आहेत, व त्या सर्वांचें उत्पन्न सालिना ६०,००,००० रुपयांहून जास्त आहे. या पैकीं ६८ मिळकती मालक अज्ञान असल्यामुळें सरकारच्या ताब्यांत आहेत; तिघे आपल्या इस्टेटीची व्यवस्था करण्यास लायक नाहींत ह्मणून आहेत; दुसऱ्या कांहीं कारणानें कारभार करण्यास लायक नाहींत अशा लोकांच्या १३ आहेत व ४३ मिळकती आमच्या मिळकतीची तुह्मी व्यवस्था करा असें मालकांनीं अर्ज केल्यावरून सरकारच्या ताब्यांत आहेत.

येणार गव्हरनरजनरल लार्ड एलजिन यांच्याबरोबर त्यांची पत्नी व मोठाल्या तीन मुली ही हिंदुस्थानांत येत आहेत.

पेन्शनर झालेले अलहाबाद हायकोर्टाचे जज्ज मि. महमुद यांस सालिना ६०० पौंड पेन्शन देण्याचें ठरलें आहे.

चित्रळ व बदकशान यांच्या दरम्यानचा रस्ता बर्फातिशयानें बंद झाला आहे.

कामरूनच्या नेटिव फौजेनें बंड केलें असून त्यांणीं तेथील जर्मन लोकांस राजबाड्यांतून घालवून दिलें. पण मागाहून जर्मन कामदार येऊन त्याणें त्या बंडवाल्यास हाकून लावलें.

माटाबल लढाईच्या प्रकरणांत क्या उइलसनच्या टोळीची कत्तल झाली असावी असें कुनेतिकडच्या लोकांचें अनुमान आहे.

मांचेस्टरचा कालवा तयार होऊन व्यापाराचीं गलबतें जाऊ येऊं लागलीं.

ता. ४ रोजीं गव्हरनरजनरलांच्या कायदे कौंसलची सभा होऊन स्मालकाज कोर्टाच्या अधिकाराबद्दलचें व जमीन खालसा करण्याबद्दलचें हीं दोन्ही बिलें सिलेक्ट कमेटीकडे दिलीं आहेत. ठा० अ०

पृथ्वींत एकंदर दरसाल साडे एकतीस कोट रुपयाच्या काड्यांच्या पेट्या खपतात.

पुण्यांतील प्रसिद्ध माजी मु० सेक्रेटरी रा० रा० नरसोपंत गडबोले मरण पावले.

बंगाल इलाख्याचे गव्हरनर गोरक्षण सभेस उत्तेजन देत आहेत.

विलायतेंत यंदा धान्य कमी पिकलें सबब हिंदुस्थानचे व्यापारी तिकडे धान्य रवाना करण्याच्या तरतुदींत आहेत.

लंके मधील अनधीपूर शहर जमिनींत पुरून गेलें तें उकरून काढण्याची खटपट चालली आहे.

पारीसामध्यें एक जागा लवकरच लढाई साठीं तयार होईल. या संग्रामांत आपलें सरकार बिगूल वाजवून फौजेची सलामी अर्पी घेईल ह्मणतात. म० मि०

समुद्रांतून चालण्या सारखें एक विमान पारीस शहरांत तयार केलें असून त्याचा नुकताच अनुभव घेण्यांत आला. हें वाटेल त्या दिशेस नेतां येतें व त्यास सोडल्या वांचून समुद्रावरही आणता येते.

विलायतच्या गेल्या महिन्यांत जमाखर्चांत रकम कमी जमा झाल्याचें कळतें.

मह येथें चालू हिवाळ्याच्या अखेर मोठी लष्करी पहाणी होणार आहे.

सुपें तालुक्यांत जुलाब उलटीचें एक झाड आहे त्याचे बुडाची साल उगाळून घेतल्यास उलटी होते, व शेंड्या वरील साल घेतल्यास जुलाब होतात. तसेंच ह्या झाडाचीं फळें उगाळून घेतल्यास कफाचा नाश होतो असें म्हणतात.

दक्षिण राशियांत उंटांनां शेतें नांगरावयास हल्लीं लावण्यांत आले. घोड्यापेक्षां उंटांनां खर्च कमी लागतो.

सिसिलीमध्यें दंगा जास्त होऊं लागल्यामुळें ४०,००० फौज ठेवण्यांत आली आहे.

अवघ्या जगांत अतिशय सुप्रकाशित एक दीपगृह हावे ( फ्रान्स, सीन प्रांत ) भागांत क्यापडीला हेवी नांवाच्या बंदर किनाऱ्यावरील ठिकाणीं बांधण्यांत आलें आहे. ह्या दीपगृहांतील दीप १३० मैलावरून गलबतांतल्या लोकांस दिसेल इतका उंच व झगझगीत ठेवण्यांत येणार आहे.

अमेरिकन प्रासीवर कर बसविण्याचा विचार चालला आहे.

शिकागो येथें सुमारें १ लक्ष लोक रिकामे आहेत. सु० प०

दारूंत भिजविलेले गहूं चिमण्यांनीं खाल्ले तर त्या गुंग होऊन पडतात. मग त्यांस खुशाल धरतां येतें हा उपाय शेतकरी लोकांस फारच उपयोगाचा आहे.

नामदार मि. फीरोजशा मेथा यांस सरकारानें सी. आय. इ. पदवी दिली. फारच योग्य!

हिंदुस्थानांत एकंदर १०१३९ पोष्ट आफिसें, १६,००० पत्रें टाकण्याच्या पेट्या व ९,००० खेडे गांवांतील पत्रें वाटण्यास शिपाई आहेत. सु. प.


## जाहिरात.

हे पाक-पहा वाशिवाय ता. २६।१२।९२ इ. चे वैदर्भांत व शुद्धवऱ्हाडी पत्रांत छापलेल्या औषधी हमेशा मिळतील.

ह्या हेमंत ऋतूंत हिवाळ्यांत खाण्याचें पौष्टिक, शक्तिस्फूर्ति व स्मरण शक्ति, मिळेल; व हस्तपाद, कंबर सांधे, ठणका आणि सर्व वातविकार खात्रीनें नाहींसे होतात. बाळंतीणीस व सर्व स्त्रियांस शक्ति देणारी सौभाग्यसुंठ व सर्व पाक विक्रीस तयार आहेत. बाहेर त्यांनीं मागविल्यास आह्मी ह्याल्युपेबलनेंही पाठवूं. पोष्टखर्च निराळा पडेल. त्वरा करा, गेली वेळा पुन्हा येत नाहीं.

१ सालममिश्रीपाक दर शेरास ( ८० तोळ्यास ) } किंमत ३
२ बदाम पाक .................. २॥ रु.
३ सालममिश्री व बदाम प्रत २ ........ २ रु.
४ सौभाग्यसुंठ .................. २ रु.
५ कुष्मांड पाक .................. १ रु.
६ गोखरु पाक .................. ७ रु.
७ प्रवाळ, वंग वगैरे भस्में व औषधी तयार आहेत.

पत्ता — शिवचरणगीर रामगीर वैद्य कुरणखेडकर दवाखाना.

आकोला — वऱ्हाड.

## जाहिरात.

क्रिमिनल प्रोसिजर कोड.
( आक्ट नंबर १० सन १८९२. )
सटीक. आवृत्ती ३ री.

सदर्हू आक्ट सन १८८२ पासून सन १८९३ अखेर १२ आक्टांवरून दुरुस्त झाला आहे, त्याप्रमाणें या आवृत्तींत दुरुस्ती केली आहे. सन १८९३ अखेरपर्यंत कलकत्ता मुंबई, मद्रास, व अलहाबाद हायकोर्टांनीं केलेले सर्व निवाडे ज्या त्या कलमाखालीं घातले आहेत. मुंबई हायकोर्टानें केलेले वटहुकूम ज्या त्या कलमावर घातले आहेत व इतर जरूर लागणारे फौजदारी आक्ट सुमारें १४, याजवरील निवाडे व दुरुस्त्या सुद्धां छापून वेगळे काढले आहेत; सदर्हू ग्रंथ माहे फेब्रुवारी सन १८९४ मध्यें तयार होऊन लोकांस मिळेल. याची अगाऊ किंमत माहे जानेवारी सन १८९४ अखेर घेणारांस रुपये ४ व टपाल खर्च ८ आणे ठेविली आहे, व मागाहून घेणारांस किंमत रुपये ६ व टपाल खर्च ८ आणे पडेल.

पुणें "न्यायाश्रय" आफीस ता० ३० नोव्हेंबर सन १८९३. | नरहरराव त्रिंबक राजमाचीकर. बी. ए. शिवराम हरी साठे. न्यायाश्रयकर्ते पुणें.


☞ हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सालअखेर ॥ ७ ॥ १८
किरकोळ अंकास ............४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ८१८६
दुसर खेपेस ......८१

Six monthly............3 " 8 as.
Single copy.............. 1as

Advertisement
Below 10 lines...2 Rs
per line over10... 4 as
Repetition per line 3 as

# वऱ्हाडसमाचार.

# THE BERAR SAMACHAR.

VOL XXVIII AKOLA MONDAY 22 JANUARY 1894 NO 4

वर्ष २८ आकोला सोमवार तारीख २२ माहे जानेवारी सन १८९४ इ० अंक ४

## सर्व नजरबंदीच्या माकडचेष्टांस हाणून पाडतां येतें.

मी रस्त्यांत जेव्हां झोकांडी खात चालत असें तेव्हां लोकांनीं माझ्याकडे बोट दाखवून हिणवावें कीं पहा काय बेटा झिंगून गेलेला आहे आणि प्रथम दर्शनीं तुह्मासही खास त्यांच्या सारखेंच वाटलें असतें. परंतु तें सर्व चुकत होतें. भर रस्त्यांत मला चालतांना झोकांड्या येतात म्हणून आपण मला विचाराल तर त्याचें समर्पक उत्तर देण्यास माझ्या आयुष्यक्रमाचें पूर्व मार्गावर थोडेसें गेलें पाहिजे.

आज तागाईत एखाद्या आनंदी व रंगेल मनुष्याप्रमाणें मी सुखी प्राणी होतों परंतु चार पांच वर्षांपूर्वी मला वाटूं लागलें कीं माझ्यांत कांहीं कांहीं तरी कमी जास्त होत आहे जेवतांना पूर्वीसारखी माझी क्षुधा राहिली नव्हती. मला भूक लागे व खाण्याची ईच्छा होई परंतु तोंडांत घास गेला कीं लागलीच पक्वाशय उमळून येई व जसें कांहीं बंडावा करून माझ्या हेतूस हाणून पाडी. हें मला अरिष्ट नवीनच व त्याचें मला मोठें आश्चर्य वाटे. मी जेव्हां ह्मणून खाण्याचा आव घाली तेव्हां तेव्हां मला फारच तिटकारा येई. कदाचित पोटांत कांहीं अन्न गेलें तर तें अन्न किंवा मांस न वाटतां एखाद्या शिशासारखें जड वाटे त्यामुळें निजायला जातांना आपल्यास जशी सुस्ती चढून थकवा येतो त्या प्रमाणें मला होत असे. ह्यामुळें रात्री झोंपेचा कल अगदीं बदलला झोंप थोडी पण चांगली येई. कधीं कधीं बरोबर येत नसे, व धुंद झाल्यासारखें मला वाटे त्यामुळें मी केव्हां केव्हां आफू किंवा इतर अमली पदार्थ घेत असें. मी जीभ पाहातों तों तिच्यावर थर जमलेला आणि काम करण्याची हौस बिलकूल नाहींशी झालेली असे.

माझ्या बरगड्यांत आणि पाठींत सपाटून दुखत असे व कधीं कधीं ह्या वेदना खांद्यात भाला टोंचल्यासारख्या वाटत. मी आरशांत पाहिलें तों माझे डोळे पिवळे दिसूं लागले. आणि माझ्या दांता व हिरड्यां सभोंवतीं कीट जमलेलें दिसे व मुखमार्जन करण्यास पाणी न मिळाल्यामुळें किंवा इतर साधनें दाताजवळ नसल्यामुळें माझ्या तोंडाची घाण फारच येई माझा कोठा फारच जड झाला आणि पक्वाशयांत घाणेरडा वायु उत्पन्न होऊन तोंडावाटे ढेंकर देतांना निघून जाई. ह्या वेळेस मला किती वाईट वाटत होतें हें मी कधीं विसरणार नाहीं. ह्या वेळीं रस्त्यांत चालत असता एकदम घेरी यावी, हलके वाटावें. आणि गरगर फिरल्यासारखें वाटून झोकांड्या देत चालावें व जमिनीवर सवशेल पडून नमस्कार घालावा लागत असे. माझ्यानें हें विघ्न जितकें टाळता येईल तेवढें टाळून घेई व आता तें गेलें असें समजून तो दिवस घालवीत असें.

माझ्या मित्रमंडळीनें व वैद्यानें जीं जीं औषधें घेण्यास सांगितलीं तीं घेतलीं त्यापासून गुण न येता मी अगदीं सुद्दाम देव झालो. व आतां ह्या वत्तीस रामराम ठोकून परलोकचा रस्ता धरावा असें मला वाटूं लागलें ह्या प्रमाणें माझा क्रम चालला होता.

आतां मी तुह्मांस थोडक्यांत निवेदन करतों कीं बरा कसा झालो ह्याचें कारण आपणास कळवावें हें अगदीं रास्त आहे. लंडनांत माझा एक स्नेही होता. त्याच्या कानावर माझी गोष्ट पडल्याबरोबर त्यानें सांगितलें कीं मदर सिजेलचा क्युरेटिव सिरप (म्हणजे माता सिजेलचा रोगहारक पाक) तुम्हांस फारच गुणकारी होईल.

माझा कांहीं ह्याच्या म्हणण्यावर भरंवसा बसेना. परंतु एक बाटली तर थोडे दिवस घेऊन पहावी ह्मणून विचार केला. मला ह्या औषधापासून इतका जलद गुण आला कीं मला खातांना बरें वाटावें व झोंप चांगली यावी. मला हें पथ्यावर पडल्यामुळें इतकें बरें वाटलें कीं मी ह्या औषधाच्या आणखी चार बाटल्या पार केल्या.

मी बरा झालों. हें औषध दैविका सारखें वाटलें. मला खचीत वाटलें कीं हें औषध ईश्वराच्या प्रेरणेनेंच मला मिळालें.

मी आतां पुन्हां ताजा तवाना झालों व त्यांमुळें ज्या मला आनंदाच्या उकळ्या फुटल्या त्या सांगता पुरवत नाहींत. आतां केव्हां तरी थोडेसें अपचन झालें कीं जें सर्वांस होत असतें, त्या वेळेस मी ह्या औषधाचा लहान घोट घेतो व लागलीच मला त्यापासून आराम वाटतो.

ह्याचा तात्काळ गुण आल्यामुळें मला नजरबंदीच्या खेळाची आठवण होते परंतु खरोखर माता सिजेलचा क्युरेटिव सिरपांत डोळ्यांत माती टाकण्यासारखा कांहीं प्रकार नाहीं. मला अनुभवावरून खात्रीनें सांगतां येतें कीं कितीही जुनाट अग्निमांद्य व अजीर्ण अगदीं वाईट स्थितीपासून असो तरी ह्या औषधा पासून हटकून गुण यावयाचाच.

मी तुमचा उपकार मानणारा
(सही) जे. सी. सिमसन
२१ ह्यानोवरचा रस्ता, न्यूकासल अंडर लाईन, स्टाफर्डशिअर

B. T.

वऱ्हाडसमाचार

मिती पौष वद्य १ शक १८१५

## राजा प्रजा आणि तिचें शिक्षण.

(सन १८९३ सालच्या ४९ संख्या अंकावरून समाप्त.)

तेव्हां त्यांना अशी परवानगी कशी द्यावी! "बेभरंवसा! बेभरंवसा!" रास्तच आहे! आपल्या वरून जग ओळखावें म्हणून म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं पण अशी परवानगी दिली तर किती फायदा होईल बरें! सरकारचा खर्च कमी होईल. व त्यांतलान कांहीं भाग प्रजेच्या म्हणजे आमच्याच शिक्षणाकडे सरकारला लावण्याची सवड सांपडेल व प्रजा ही शहाणी होईल! सशक्त होईल आणि संतुष्ट व सुखी राहील! खरोखर यांत उभयतांचा फायदा होणार आहे सर्व खरें! पण हें सर्व उमजणारावर आहे. पण या आमच्या म्हणण्यांत कांहीं तात्पर्य नाहीं. कारण आमचें सरकार स्वदेशाचे व स्वदेशबांधवाचें कल्याण अगोदर करावयाचें योजील. आमचें कल्याण प्रथम करण्याचें फळ घेण्याचें त्यांच्या मनाला पसंत वाटत नाहीं. कारण हें सर्व " Charity begins at home " या न्यायालाच धरून चाललें आहे. त्याची बरोबर बजावणी झाली ह्मणजे मग "Charity begins abroad" या तत्वाचा प्रयोग आमचे हितैषि सरकार करतील, तों पर्यंत आह्मास दम धरला पाहिजे. असो, आतां आमच्या देशांतच जे इंग्रज अधिकारी आहेत त्यांच्या ही पगारांचे मान जबरेंच आहे. कोणाला दरमाहा पंचवीस हजाराची थैली पाठविली जाते, कोणाला वीस हजारची, कोणाला दहा हजाराची, असे हजारों हजाराचा फन्ना उडत आहे. त्याचा तक्ता येथें करून दाखविण्याची कांहीं जरूर नाहीं. असा कितीक गोष्टी आहेत, पण त्या सर्व सांगण्याची कांहीं अवश्यकता नाहीं. पण या सर्वांवरून सरकारला कर्ज होण्याचा संभव पुष्कळच आहे. व तसें कर्ज सरकारला झालें असलहीं! सरकार उगीचच्या उगीच खोटें काय ह्मणून सांगेल. असें खोटें जर तें सांगावयाला लागलें तर त्याचा दुर्लौकिक होणार नाहीं काय? हें कर्ज आमच्या खावींद सरकारानें मागचा पुढचा पोंच न पाहतां करून ठेविलें ही मोठी चूकच केली. असो, अशी चूक होतेच. झाल्या गोष्टीला कांहीं इलाज नाहीं, पण या पढें तरी सरकारानें खबरदारी घ्यावी, व वेळेवरच सावध व्हावें. वायफळ खर्चाचा हात आटपता घ्यावा, चैन बाजीचें मान होईल तितकें कमी करावें. तुमच्याच करितां आह्मी ब्रह्मदेश काबीज केला व ह्मणून त्या बद्दलचा खर्च तुह्मीच द्यावा व ब्रह्मदेशाचें उत्पन्न आह्मीच घेण्याचा हक्क—आह्मीं श्रम केले ह्मणून—आह्माला पोंचतो! असला इसापनीतींतल्या वानरानें केलेल्या न्यायाचा मासला आह्माला नको!

व आमच्या करितां इतर देश काबीज करण्याचें कांहीं कारण नाहीं. हें मोठ्या नम्र भावानें आह्मी आमच्या मायबाप सरकाराला सांगतो. व आमच्या शारिरिक, मानासिक व सांपत्तिक उन्नतिची कळकळ सरकारनें बाळगली पाहिजे! हिंदुस्थान ही केवळ "सोन्याची खाण" आहे असें सरकारला वाटत आहे! खरें आहे पण आतां त्या खाणींत खडका शिवाय कांहीं राहिलें नाहीं. तरी पण ती खाण हवी तशी खणावी व सांपडेल तें ती मधून नेण्याची सरकारला आह्मी मुभा दिली आहे! हिंदुस्थान ह्मणजे एक कामधेनु अशी सरकारची समजूत झालेली आहे. ती बरोबर आहे. पण त्या कामधेनूच्या आचळांत आतां कांहीं राहिलें नाहीं! व आह्मी जे गवळी तेही तिचें दूध काढतां काढतां अगदीं थकून गेलो आहोत! तरी ते आपली सर्व शक्ती एकवटून तिचें निघेल तितकें दूध सरकारला काढून देतच आहेत! पण त्या योगानें सरकार मात्र पुष्ट झालें पण त्या कामधेनूची जोगवण नीट रहात नाहीं व ते गवळीही सर्व प्रकारें अनाथ झाले आहेत त्याकडे सरकारनें लक्ष पुरविणें हें सरकारचें कर्तव्य कर्म आहे. नाहीं तर ती कामधेनु व ते गोपाळ एकदम यमनगरीस प्रयाण करितील याचा सरकारनें पूर्ण विचार करावा! हिंदुस्थान ह्मणजे एक विस्तीर्ण कुबेरपुरी आहे असा सरकारचा समज झालेला दिसतो! पण हिंदुस्थान हा कुबेरपुरीचें रूप सोडून "लोखंडपुरी" किंवा "मडकेपुरीचें" रूप धारण करीत आहे! याच्याकडे सरकारनें नजर फेंकावी. "Charity begins at home." या तत्वा प्रमाणें सरकारचें वर्तन असल्यास आम्ही कांहीं परके नाहीं! आम्ही सरकारचीं लेंकरेंच आहोत हें लक्ष्यांत आणावें! अथवा आम्ही परके आहो असें जर असेल तरी "परोपकाराचें" पुण्य फारच मोठें आहे. तर तें आर्धीं साधण्याचें श्रेय सरकारानें घ्यावें अशी आमची प्रार्थना आहे! जितकें लिहावें तितकें थोडेंच आहे. परंतु आमचें बरें वाईट करणें सरकारच्याच हातीं आहे हें म्हणजे आमच्या दक्ष, शहाण्या, दयाशील, खर्चिक सरकारला आम्ही सांगावें असें कांहीं नाहीं. तरी पण आम्ही आतां पर्यंत काय म्हटलें त्याचा पूर्ण व उदार बुद्धीनें विचार करून आमच्या "आक्रोशा" कडे लक्ष्य पोंचवावें, आमच्या कल्याणासाठीं सर्व प्रकारें झटावें व त्या योगानें सूर्या प्रमाणें प्रखर व चंद्रा प्रमाणें शुभ्र अशा कीर्तीचा इहलोकीं व परलोकीं झेंडा लावावा एवढेंच आमचें हात जोडून सरकारपाशीं मागणें आहे. निदान त्या सर्वसाक्षी परमेश्वरा पुढें "Judgment day" च्या वेळेस केलेल्या सर्व कृत्यांचा जबाब द्यावा लागेल हें आमच्या दयार्द्र व पुण्यशील सरकारचें पूर्ण लक्षांत ठेवावें एवढीच विनंती करून हा लेख पुरा करतो.

सिव्हील सर्व्हिस परीक्षा इंग्लंडांतल्या प्रमाणें इंडियांतही एकाच वेळीं होत जावी म्हणून हाऊस आफ कामन्सचा ठराव गेल्या जूनच्या २ रे तारखेस झाला. त्या ठरावाची अंमलबारी करण्या विषयीं काय योजना करावी म्हणून हिंदुस्थान सरकारास विचारिलें होतें. पुष्कळ महिने खोलच खोल व पाताळयंत्री विचार सरकारचे होत होते आणि शेवटी निर्णयात्मक असा स्टेट सेक्रेटरी कडेस अभिप्राय लिहून गेला आहे. हा अभिप्राय फार गुप्त होता. इंडियांतली गोष्ट विलायतच्या तारेनें इंडियांत जाहीर व्हावी असाच विलक्षण कालमहिमा आहे! त्या प्रमाणें रूटरच्या तारेवरून कळतें कीं हिंदुस्थान सरकाराला अशी परीक्षा इंडियांत सुरू करणें अत्यंत संकटमय वाटतें. आणि परीक्षा सुरू करिता आली तथापि तो सुरूं करणें सरकारला योग्य वाटत नाहीं कांकीं तशा करण्या पासून मोठीच विघ्नपरंपरा उपस्थित होईल. कामन्स सभेचा ठराव एकंदरीनें अंमलांत आणण्या सारखा नाहीं. आणि सरकारचा जबाबदारीचा कारभार, त्यांचें अधिकारवैभव आणि त्यांची जोरदार व्यवस्था यांस त्या ठरावा पासून हरताळ लागण्या सारखा आहे

---

मुंबईच्या मुनसिपल कारपोरेशन कडून नामदार दादाभाई नवरोजी यांस मानपत्र देण्यांत आलें. त्या संस्थेनें स्वतंत्र सुखवस्तु नागरिकाचा असा बहुमान प्रथमच केला. या मानास शेट दादाभाई खरोखर एकटेच पात्र आहेत हें निराळें सांगणें नको.

पण याच सुमाराला एक उलट गोष्ट ध्यानांत धरण्या सारखी कलकत्ता म्युनसिपाल कारपोरेशन मध्यें झाली. मोठमोठ्या हुद्देवाल्या अधिकाऱ्यांस आगमनाचे व प्रयाणाचे वेळीं मानपत्र देण्याचा मुनसिपालिट्यांतून चालूं वहिवाट आहे. लार्ड लान्सडाऊन आपली गादी रिकामी करून विलायतेस जात आहे ह्मणून मानपत्र देण्या विषयीं कारपोरेशन मध्यें सूचना आली. त्या सूचनेला बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी प्रतिकूळ होते. त्यांनीं आपल्या वक्तृत्वानें सभासदांची खात्री केली कीं या मानपत्राला लार्ड लान्सडाऊन पात्र नाहींत. केवढें हें धारिष्ट व विचारस्वातंत्र्य! अखेरीस बहुमत बाबू बानरजी सारखेंच पडलें आणि सूचना नापसंत ठरली. मुंबई कारपोरेशन दादाभाईस मानपत्र देतें आणि कलकत्ता कारपोरेशन लान्सडाऊनला तेंच मानपत्र नाकारितें! लोकमताचा विजय व गुणाची पारख खरी!

---

## The Berar Samachar

MONDAY JANUAY,

22, 1894

---

Every one will be gratified to learn that the Right Hon. Lord Kimberly is convalescent. Had indifferent health forced his Lordship to go on a short leave for recruiting his health, it would have fared very ill with us. The questions of Simultaneous Examinations of candidates for Civil Service in India and England; of the final action on the report of the present Opium Commission; and of levying of the proposed duty on the import of Silver and of the means for recouping the Finances further made deticient by the unjust and most unpopular compensation grant to European pensioners and officers in the Service are to be decided in a few months. A new Viceroy and a new Secretary of State for India would have materially and deplorably affected Indian interest. Not that we can hope much for the best but at least a double change here and abroad would have furnished a ready and extenuating defence. Fortunately the catastrophe has been avoided and let us hope for the best.

---

### THE GRAND OLD MAN OF INDIA

( A picture from a welcome address )

The speaker calling upon the audience to remember that in welcoming the Honorable Mr. Dadabhoy Naoroji they are beholding the 'wonder of all wonders.' He asked the peole not to mind redundancy because it obtains the force of novelty and brightens the virtues of the honorable gentleman upon whom the mind lingers and fondly seeks to have a longer sight. He further exultingly continues his speech which we are printing in *extenso* for the edification of our readers.

"When men attain to greatness, nations fight over their nationality, for great men are the glory of a nation. Pedigress are ransacked and though the man is not an Englishman by the father's side, he is precisely that by his mother's side. So the two nations tug and pull him, each in its own way and the man is now a Frenchman now an English man. But thank God, in the case of our revered guest to night, we need not trouble ourselves in this kind of anatomy. We claim him as ours, entirely ours an Indian and India is the country in which he was born. He is a citizen of the Island of Bombay. No Englishman can gainsay this assertion and especially since the great Tory politician has styled him a Black man. We are really proud of such a man and I wish we had a few more of this descpription.

My friends, the English are a nation far advanced in point of civilization almost in every respect. Their laws their politics, their conquests, their valor, their learning, have raised them to a stupendous height in the scale of nations. They are again the richest nation on the surface of the globe. Looked at from that great height, we Indians, appear as Luliputians, treading the miry path at the foot of the hill. Some with a loud voice calling out to the men on the hill, but often times their cries are unheard, being wrapt up the mist of misrepresentation and ignorance. Uunder these circumstances if one of us were to say, that though a small man he would be a mountain man, that he would scale the steep rocks, cross the ravines and take a lift where the topmost nation sits. That he would go in their midst, that he would rank as one of them, that he would compete for a sit where the flower of their nation sits and that he would so govern their minds as to become their trustee in regard to their best interests and even in preference to the people of their own race, their own caste, their own creed. I ask you, would not such a man as this be considered a fit subject for one of the lunatic asylums? Who would have listened in his sober mood to such ravings even for a moment? Why! You might just as well lift up the Himalaya or force the ocean into a tin pot! But in spite of these improbabilities, if you actually saw a man, doing all that was considered next to impossible, would you not consider such a man as one of the wonders of mankind and I say *the* wonder, because you may ransack the whole of modern history and I challenge any best historian to show me a single instance, in which, an Indian of ordinary birth, with no pretensions to riches, occupied a seat, in any of the national assemblies of Europe or China or Japan. The Honorable gentleman, by his dint of perseverance and unflinching zeal, has through the kindness and liberality of the liberal electors of Finsbury, thanks be to them, secured a seat in that most august assembly where Burke and Wilber force England's true glory and honor at one time thundered their eloquence. How can he be therefore less than a wonder? My heart almost borders upon adoration but I certainly can't help admiring him. And I am sure my countrymen, do I not utter *your* feelings when I say so?

Every P. and O. steame sailing from Plymouth to Bombay brings a number of passengers of all sorts and denominations. But who ever cares to read who they are and much less are they waited for at landing. But the "Siam" was the steamer anxiously looked for by every section of the Indian community, because she was charged with a load so precious to India. Every Indian heart had its treasures stored up there and naturally where your treasures are, there your heart must fix itself. Sailing over the waters of the deep, the "Siam" carried in her the glory of India. Thousands of people assembled at the Appollo Bunder to welcome him who had' won a great Battle and was, as it were returning home with trophies of Parliamentary honors, men from distant parts of the country came to offer their greetings. The Greek and Barbarian, as well as the Jew and the gentile joined hearts in admiration and with one voice hailed with loud acclamation, the arrival of the first Indian M. P. There was a crush of men and carriages and some feeble bodied like myself escaped with difficulty when they found themselves jammed between two strong bodied buffers.

(To be continued.)

---

## वऱ्हाड.

हवामान—हवा समशीतोष्ण असून आकाश मधून मधून मेघाच्छादित असतें. त्या मुळें ज्वराच्या साथीचा बराच फैलाव झाला आहे. व रब्बीचे पिकावर गेरवा पडून लाख, हरबरा व जवस या पिकावर आळ्या पडू लागल्या आहेत. खरीपाचे पिकानें यंदा बराच दगा दिल्यामुळें शेतकऱ्यांचे डोळे रब्बीचे पिकाकडेस लागले आहेत. परंतु सदहू पिक निर्विघ्नपणें हातांत पडेल तेव्हां खरें!

आम्ही पूर्वीचे अंकीं कळविल्या प्रमाणें आलिशान रेसिडेंट साहेब बहादूर यांची स्वारी गेल्या रविवारचे दिवसाचे गाडीनें येथें आली आणि मंगळवारीं ता० १६ रोजीं रात्रौ साहेब बहादूर बंगाल नागपूर रेल्वे मार्गानें कलकत्त्याकडेस रवाना झाले साहेब बहादूर यांचे सन्मानार्थ या प्रसगीं, कांहीं एक समारंभ व उत्सव करण्यांत आले नाहींत. सरकारी आफिसर व दोन चार नेटिव गृहस्थांच्या मात्र भेटी होऊन फक्त कुशल प्रश्नाशिवाय कांहीं एक भाषण झालें नाहीं. बड्या साहेबांचें आगमन झालें म्हणजे गरीब रयतेस फार आनंद होऊन आपल्या सुख दुःखा बद्दल विचार होईल अशा तिला आशा असते. परंतु साहेब बहादूर यांस कलकत्या कडेस फार निकडीचें काम असल्यामुळें त्यांचें प्रयाण झालें त्यामुळें रयतेच्या आशा नष्ट झाल्या!

मे० मेकनझी साहेब कमिशर यांची स्वारीही मे० रेसिडेंट साहेब बहादूर यांजबरोबर कलकत्या कडेस रवाना झाली. तिकडेस काय घबाड आहे समजत नाहीं. कमिशनर साहेब बहादूर यांची स्वारी फेब्रुवारीचे पहिले आठवड्यांत पुन्हा येथें दाखल होईल.

मे० हेअर साहेब दिपुटी कमिशनर यांची स्वारी हल्लीं येथेंच आहे. चालू महिना अखेर दवऱ्यावर जाण्याचा त्यांचा बेत नाहीं.

मे० कपटन वारन हेस्टिंग्स दि० क० इलिचपूर हे या महिन्याच्या अखेरीस दहा महिन्याचे रजेवर जाणार आहेत.

मे० कपटन मॉरिस साहेब हे लवकरच आपली शिल्लक राहिलेली रजा रद करून येथें येतील अशी वदंता आहे.

'शाहू नगरवासी नाटककार' मंडळीनें गेल्या बुधवारीं व शनिवारीं 'विक्रम शशिकला' व 'विकार विलसित' हे दोन प्रयोग करून दाखविले. शेवटला खेळ फार चांगला झाला. चंद्रसेन, वेडी मल्लिका, व शालेय यांची कामें उत्कृष्ट वठलीं. ही मंडळी गुणी व सुशील आहे आणि तिच्या गुणा प्रमाणें लोकाश्रयही चांगला मिळत आहे.

'दर्यापूर' हून एक गृहस्थ कळवितात कीं तेथील लोकांनीं राव बहादूर श्रीराम भिकाजी जठार यांस गेल्या १२ वे तारखेस पानसुपारी दिली. आनररी माजिस्ट्रेट राजश्री भगवंतराव देशमुख यांनीं पुढारीपण घेतलें होतें. मंडळीचें आगत्य राव बहादुरांचा उपदेश व एकंदर उत्सव पाहून मोठा आनंद वाटला. दुसरी हकीकत पुढील अंकीं येईल.

'बातमीपत्र' —उमरावती—पुढील खेपेस पाहूं.

येथील पोलीस इनस्पेक्टर मि. घोंडजी कोंडजी यांनीं मोठ्या शिताफीनें पांचजण चोरांस पकडलें आहे. अक्कल एक बडी चीज आहे!

आम्हास लिहिण्यास दुःख वाटतें कीं येथील नायब तहशिलदार रा. रा. माधव रामचंद्र हे गेल्या सोमवारीं निवर्तले राजश्री गिरराव अण्णा यांच्यावर हा प्रसंग खरा आणि पुढें त्यांच्या कडेच आपल्या गरीब स्वभावाच्या बंधूंच्या मुला मुलींचा पोषिदेपणा आहे!

दुसरा मृत्यु रा. रा. तात्या पुणेकर सराफ यांचा होय. स्वल्प ज्वरानें अंत झाला दुकानदारीचा धंदा चालविण्या सारखे त्यांचे चिरंजीव अनंतराव आहेत हें दुःखांत सुख आहे.

---

### TOWN FUND TAX.

Notice is hereby given that at a special meeting of the Akola Municipal Committee held at Akola the 19 th. day of

January 1894, a resolution was passed to propose the imposition throughout the area within the Municipal limits of a tax under section 41 of the Municipal Law as follows:—

Class of persons to be taxed—

The tax shall be assessable on every person dwelling or personally working for gain or carrying on any business or calling within the limits of the Municipality the whole or any part of whose income derived from any source other than agriculture is not less than Rs. 100 per annum.

Explanation—The word "person" shall include a corporate or incorporate company.

Amount or rate of tax.

The tax shall be assessed at the rate of one per cent on the taxable portion of the estimated income of the assessee derived from any other source than agriculture.

Proviso I. Provided that no person or firm shall be assessable to the tax at a sum exceeding Rs. 500 or less than annas 8 per annum.

Proviso II That in the computation of the income to be assessed there shall only be made the following deductions from the annual income of the assessee;

(*a*) The sum of Rs. 99 (the minimum non-taxable income).

(*b*) Subject to any conditions and restrictions which the Resident may prescribe in this behalf, such portion, if any, not exceeding one sixth of the full annual income (irrespective of the cost of establishment maintenance &) as is paid by the assessee in respect of life-assurance, pension, or provident Fund and

(*c*) Income tax (Imperial)

Proviso III That when one per cent on the assessable portion of the income involves a fractional part of a rupee which is less than 8 annas then 8 annas shall be the amount of the fractional part to be collected; and when one per cent on such part of the income involves a fractional part of a rupee which is greater than 8 annas then one rupee shall be the amount to be collected in respect of the fractional part.

Proviso IV—Provided that any person who draws his income by means of a monthly salary for the performance of certain duties and who is merely a servant of Government or other private employer shall be entitled to a refund of any amounts which he has paid in respect of a period when he is absent from the Municipal Limits on leave of any kind exceeding 3 months or when owing to transfer, he is relieved of his duties.

System of assessment to be adopted:—

The assessment shall be made by a sub-Committee specially appointed by the Municipal Committee and shall be submitted for confirmation to a general meeting of the Municipal Committee.

List of assessment shall be conspicuously posted in the Town and shall be open to view at the Municipal office. Notice of the assessment shall be issued to each person assessed to the tax.

Objections to assessments shall be received and considered by the Municipal Committee if presented in writing within one month of the receipt of the notice. Provided that if any person or manager of a firm, be absent and unrepresented by duly empowered agent so that the notice cannot be served, the period of filing of objections shall be extended to one month from the date of the return of such person or manager or the duly empowered agent of the same.

Any inhabitant of Akola objecting to the proposed tax many within 30 days from the publication of this notice submit his objection in writing to the Committee and his objection will be taken into consideration at a special meeting of the Committee.

Date Akola 19th January 1894 — B. M. Sathe Secretary Municipal Committee Akola

---

NOTICE.

It is hereby published for the information of the public of Akola that the lists of voters prepared by the Secretary for the year 1894—95 under rule 6 of the Municipal election rules are posted as required by rule 7 at the following places.

The persons entitled to vote under rule 3 are requested to see their names included in the lists posted and make complaints if these are under rule 8 and also to choose ward in which they wish to vote in case they are entitled to vote in two wards under section 5 before the 8 th. February 1894.

Names of places where lists are posted

The Deputy Commissioner's office.
Small Cause Court
Tahsili
Chawaries
Police Station
Cotton market
Weekly market
Near the Morna Bridge
Town Hall

Akola 17—1—94.

B. M. Sathe.
Secretary
M. C. Akola.

---

नमुना नंबर १४३.

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्य विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा अक्ट ७

कलम ६ प्रमाणें.

दि. कि. क्लास १९ मिसल. नंबर १/१८८८

विद्यमान सिव्हील जडज्य साहेब जिल्हा अकोला यांचे कोर्टांत.

नांव सुकदेव
बापाचें नांव दर्याजी
राहणार पळसखेडे ता० जळगांव
जिल्हा अकोला यांस मयत.

दर्याजी बापाचे नांव परशराम राहणार पळसखेड तालुके जळगांव जिल्हा अकोला यांचें कर्ज वसूल करितां येण्या साठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून सदरहू अर्जदार यानें अर्ज केला आहे त्यास करितां सदरहू मयत मनुष्याचे माल मिळकतींवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्याणी तारीख १० माहे फेब्रुवारी सन १८९४ इ० रोजीं सदरहू अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपआपले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

ता० १६ माहे जानेवारी सन १८९४ इ०

V. N. Dandeker.
सिव्हील जडज्य.

---

## नोटीस.

ह्या नोटीसीनें अकोले येथील सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं म्युनिसीपाल सेक्रेटरीनीं निवडणुकीचे ६ नियमाप्रमाणें मत देणाऱ्या लोकांची यादी १८९४।१८९५ सालाकरितां तयार करवून नियम सात प्रमाणें खालीं लिहिलेल्या ठिकाणीं त्याच्या नकला लाविल्या आहेत. नियम ३ प्रमाणें ज्यांना मत देण्याचा अधिकार आहे अशा लोकांना विनंती करण्यांत येतें कीं त्यांनीं आपली नांवें सदरहू याद्यांत दाखल केलेलीं आहेत किंवा नाहींत हें पहावें आणि नियम ८ प्रमाणें त्यांची एखादी तक्रार असल्यास ती, व ज्याना दोन वार्डांत मत देण्याचा अधिकार असेल त्याना आपण कोणत्या वार्डांत मत देणार हें तारीख ८ फेब्रुवारी सन १८९४ चें आंत कळवावें कळावें ता० १७।१।९४

मे. दिपुटी कमिशनर साहेब यांचे कचेरींत
स्मालकॉज कोर्ट.
तहसिल कचेरी.
काटन मार्केट.
धान्य आठवडे बाजार.
चावड्या.
पोलिस स्टेशन.
मोर्णेवरील पूल.
टाऊन हाल.

B. M. Sathe.
सेक्रेटरी म्युनिसिपालिटी
अकोलें

---

## टाऊन फंड कर.

जाहिरात देण्यांत येते कीं, अकोलें म्युनिसिपाल कमिटीनें तारीख १९ माहे जानेवारी सन १८९४ इसवी रोजीं भरलेल्या स्पेशल जनरल कामिटींत म्युनिसिपल हद्दींमध्यें वऱ्हाड म्युनिसिपल कायदा कलम ४१ अन्वयें खालील प्रमाणें कर बसविण्याचें ठरविलें आहे.

**कर बसविण्यास योग्य लोक**— अकोलें म्युनिसिपालिटीचे हद्दींत राहणारा एखादा धंदा, कलेचें काम, उद्योग किंवा उद्योग करणारा प्रत्येक इसम ज्याचें शेतकी खेरिज करून इतर सालिना सर्व किंवा कांहीं उत्पन्न १०० रुपया पेक्षां कमी नाहीं अशा प्रत्येक इसमावर हा कर बसविला जाईल.

खुलासा— 'इसम' यांत कारपोरेट अथवा इनकारपोरेट कंपनीचा समावेश होतो.

**कराची रकम अथवा दर**—शेतकीचें उत्पन्न खेरीज करून इतर (सालिना) अंदाज उत्पन्नापैकी हा कर बसविण्यास योग्य अशा उत्पन्नावर शेकडा १ रुपया प्रमाणें हा कर बसविला जाईल.

प्रोव्हिजो १. कोणताही इसम किंवा दुकान यांजवर हा कर ५०० रुपयांहून अधिक किंवा आठ आण्याहून कमी बसविला जाणार नाहीं.

प्रोव्हिजो २. कर बसविण्याचे उत्पन्नातून फक्त खालीं दिलेल्या रकमा वजा केल्या जातील.

(अ) कर बसविण्यास सर्वांत कमी असें अयोग्य उत्पन्न रुपये ९९.

(ब) लाईफ इन्सुअरन्स, पेन्शन, किंवा प्रोव्हिडेंट फंड या बद्दल आलिशान रेसिडेंट साहेब जे नियम किंवा अटी ठरवितील त्याला अनुसरून सदरहू फंडाकडेस भरलेली सर्व रकम. (सदरहू रकम वर्षाचें पुरें उत्पन्न—नोकर चाकर वगैरेचा खर्च सुद्धां धरलेल्याचे १/६ पेक्षां ज्यास्त नसावी.)

(क) सरकारी इन्कमट्याक्स.

सदर ३. दर शेकडा पट्टी बसविण्या जोग्या उत्पन्नाच्या रकमेवर जो एक रुपया बसवावयाचा तो कराचा भाग जेव्हां अपूर्ण असल ह्मणजे आठ आण्यापेक्षां कमी असेल त्या वेळेस आठ आणे बसवावे. व तो अंश जर आठ आण्या पेक्षां ज्यास्ती असेल तर एक रुपया बसवावा.

सदर ४. ज्या इसमाला कांहीं एखादे काम करण्या बद्दल महिन्यानें पगार मिळतो आणि जो केवळ सरकारी किंवा खासगी नोकर आहे असा इसम बदली झाल्यामुळें किंवा तीन महिन्यां पेक्षां अधिक दिवस कोणत्याही तऱ्हेच्या रजेवर असल्यामुळें म्युनिसिपाल हद्दी बाहेर असेल त्यास त्या दिवसा बद्दल दिलेला कर परत मागण्याचा अधिकार आहे.

**आकारणी करण्याची रीत**— म्युनिसिपल कामिटीनें मुद्दाम नेमिलेल्या सब कामिटी कडून कराची आकारणी केली जाईल व सदरहू आकारणी म्युनिसिपल कामिटीचे मंजुराती करितां जनरल कामिटी पुढें ठेवण्यांत येईल.

कराच्या आकारणीच्या याद्या गांवांत प्रसिद्ध ठिकाणीं लाविल्या जातील. आणि म्युनिसीपल आफिसांत पाहण्यास मिळतील. कर देणाऱ्या प्रत्येक इसमास कराचे आकारणीची नोटीस दिली जाईल.

सदरहू आकारणी संबंधी ज्याची तक्रार असेल त्यांनीं नोटीस पावल्या दिवसांपासून एक महिन्याचे आंत लेखी तक्रार केली तर म्यु० कमिटी त्याचा विचार करील. जर एखादा इसम किंवा दुकानाचा म्यानेजर गैर हजर असेल आणि दुसरा कोणी योग्य एजंट नसेल सबब नोटीस बजावतां येत नाहीं तर तक्रार दाखल करण्याची तारीख सदरहू इसम परत आले तारखे पासून एक महिना समजली जाईल.

ज्या इसमांस सदरहू सुचविलेल्या करा संबंधी तक्रार करावयाची असेल त्यांनीं या नोटिसीचें तारखे पासून ३० दिवसाचें आंत लेखी तक्रार कमिटी कडेस करावी. त्यांचे तक्रारीचा विचार कमिटी स्पेशल मिटींग मध्यें करील.

आकोलें ता० १९।१।१८९४ — B. M. Sathe. सेक्रेटरी म्युनिसिपाल कमिटी.

---

## वर्तमानसार

प्रत्येक माणुस आपल्या धंद्यांत फायदा होण्या करितां नसा वेळोंवेळीं फरफार करीत असतो त्याच प्रमाणें लोकांस लुटणारे लुटारूही आपल्या फायद्या करितां नव्या नव्या युक्त्या योजीत आहेत. वाटसरांस धोतऱ्याचा अंमल घालून त्यांस बुचाडणें कांहीं तरी नातें सांगून एखाद्याच्या घरीं पहूणा ह्मणून जाऊन त्यास नागविणें, तुह्मास बांळा विण्या करितां अमक्या कडून मी आलों आहे. असें सांगून त्यांस घराबाहेर काढून लुटणें, वगैरे प्रकारचे खेळ या लुटारु लोकांनीं अलीकडे चालविले आहेत. असें वेगळाल्या ठिकाणच्या बातम्यांवरून समजतें. व त्यांचा विचार करून सर्व लोकांनीं सावध रहावें हें अवश्य आहे.

नार्थ वेस्ट रेल्वेंतून एका कैद्यास नेत असतां कैद्यानें गाडीच्या खालीं उडी टाकली, पण रक्षक पोलिसानेंही लागलींच उडी टाकून त्यास पकडलें हल्लीं त्याचपावर तो एक खटला झाला आहे.

हिंदुस्थान सरकारच्या लश्करी खात्याच्या उपयोगा करितां जास्त सोइस्कर अशा गाड्यांचे जे कोणी नवीन नमुने करून दाखवितील त्यांस इनाम देण्यांत येईल असें सरकारानें फरमाविलें होतें त्या प्रमाणें नमुने आले व एकास ७५० पौंड, दुसऱ्यास ५०० पौंड, तिसऱ्यास ३७५ पौंड, चवथ्यास २५० पौंड व पांचव्यास १२५ पौंड याच प्रमाणें पांच जणांस मिळून २००० पौंड इनाम देण्यांत आले.

प्रसिद्ध दरोडेखोर चांदमिया व दुसरे यांस मध्यहिंदुस्थानच्या सरकारी कामदारांनीं कैद केलें आहे.

दरोडेखोर विजयसिंग व त्याचे साथी यांस तारीख ३ रोजीं इटा जिल्ह्यांत पकडल्यावर पांच बंदुका, सात पिस्तुलें व सहा तरवारी इतकीं हत्यारेंहि मिळालीं.

निंगपो येथें वार्षिक ईश्वरोपासनेच्या संबंधानें देवळात शेंकडो बायका मुलें वगैरे बसून भक्तींत चालू असतां व खाण्यापिण्याची चमन करीत असतां एका मुलानें पेटलेली विडी शेजारच्या गवत असलेल्या खोलींत टाकली व एकदम गवताचा भडका होऊन ज्या माडीवर हीं माणसें होतीं त्या माडीचा जिना एकदम पेटला, लोकांनीं आपापल्या बचावा करितां खिडक्या वगैरेंतून उड्या टाकल्या व त्यांत कित्येक ठार मरून कित्येक हातपाय मोडून मरणोन्मुखही झाले. कित्येक तर धुरानें गुदमरून व आगीनें जळूनही गेले.

सरहद्दीवरील अबीर लोकांवर स्वारी करण्याचें ठरलें. सामान सुमान नेण्याची व्यवस्था लागल्यावर स्वारी रवाना होणार.

गोमाल खिंडीची तपासणी करण्याकरतां एक कामदार रवाना झाला आहे.

अबीर लोकांवर गेलेल्या टोळीचा त्या लोकांशीं एक सामनाही झाला. बमजूर येथें इंग्रजसरकारच्या २० लोकांच्या एका टोळीवर त्या ७० लोकांनी एक हल्ला केला, पण इंग्रजी शिपायांनीं त्यास मागे हटवून त्यांचे ७ मारले व १ कैद केला, इंग्रजांचा एक हवालदार घायाळ झाला. इंग्रजी टोळी पुढें चाल करण्याच्या तयारींत आहे.

निझामाच्या राज्यांत कायदेकौंसलाची नेमणूक झाली आहे.

कोणा परकी पुरुषानें परक्या स्त्रीचा रस्त्यांत मुका घेतला असतां त्यांत कांहीं गुन्हा नाहीं, तें मनुष्यधर्मास अनुसरूनच आहे असा डच कोर्टांत नुकताच एक ठराव झाला! पाहिजे त्या स्त्रीचा मुका घेण्याची ज्यांस आवड असेल त्यांणीं डच सरकारच्या राज्यांत जावें. ठा. अ.

नोटीस.

रा. रा. गणाजी वा॥ जयानकाजी ह्मसकी राहणार पींपळगांव (कमळ नायचे) तालुके मलकापूर जिल्हा बुलढाणा यास नोटीस देणार सोनाई मर्द गणाजी ह्मसकीण हाली राहणार बाळापूर इजकडून नोटिसीनें असें कळविलें जातें कीं तुझे बरोबर माझें लग्न होऊन आज अदमासें १५ वर्षें झालीं. मी शाहाणी होऊन आज अदमासें १० दहा वर्षें वर दिवस झाले. ह्या वेळांत तुजपासून मजला दोन लेंकरेंही जाहलीं त्या पैकीं एकही लेंकरूं राहिलें नाहीं. आज सुमारें तीन वर्षें जाहलीं तूं मजला घेऊन जाऊन संसार वगैरे कांहीं करित नाहींस व माझ्या पोटापाण्याची कांहीं तजविज करीत नाहींस. मी आज तीन वर्षें आपल्या मायबापा पाशीं सावकारा पासून कर्ज काढून दिवस घालविले. ह्या तीन वर्षांत मी व माझे मायबाप यांणी तीन चार वेळां तूं मजला घेऊन जावें ह्मणून बरीच खटपट केली परंतु वागवीत नाहींस व अन्नवस्त्रही देत नाहींस. मी आज पावेतो तुझे नांवांवर कर्ज रुपये (१५०) दिडशें काढून खाल्लें. आतां कोणी कर्ज देत नाहींत व मी उपाशी मरत आहे. तर नोटीस पावल्या पासून १५ दिवसांत सदरहू खावटीचे रुपये देऊन चार जातभाई पंचाची खात्री करून द्यावी ती अशी कीं मजला चांगल्या रीतीनें वागवून निवास कांहीं इजा करणार नाहींस वगैरे बद्दल खात्री करून द्यावी ह्मणजे मी जवळ येऊन राहण्यास तयार आहे. असें झालें नाहीं तर रीती प्रमाणें सदरहू मुदत संपताच सदरील खावटीचे रुपये बद्दल कोर्टांत दावा करून रुपये ह्या नोटिसीचे खर्चासुद्धां भरून घेईन. व मी जवळ येऊन राहण्यास तयार आहे तर १५ दिवसांत घेऊन जावें. व सदरी लिहिले प्रमाणें करावें. असें झालें नाहीं तर हीच सोडचिठ्ठी समजून मी दुसरा घरठाव करीन मग कोणत्याही प्रकारचा नवरेपणाचा हक्क माझे वर राहणार नाहीं ह्मणून दिली नोटीस सही ता० १६ माहे जानेवारी सन १८९४ इ०

(सही)
सहीची निशाणी बांगडी.
सोनाई मर्द गणाजी ह्मसकीण राहणार बाळापूर
इच्या हातची असे.

नोटीस

नोटीस बेशमी भिवराबाई मर्द सुंदरसा जात कलाल राहणार मौजे घानोरी हल्लीं मुक्काम निंभळ प्रगणे धुगांव तालुके वो जिल्हे उमरावती यांस खालीं सही करणार याजकडून नोटिशीनें असें कळविलें जाते कीं, माझा साक्षांत चुलता नामें सुंदरसा, यांनीं आह्माला सन १८९० च्या सालीं त्यांच्या वहिवाटीस असलेला स्थावर व जंगम माल आमचे नावांनीं बक्षीसपत्र सबरजिस्ट्रेशन कोर्ट बाळापूर येथें सबरजिस्टरचे कचेरीत नोंदून दिलें. ते दिवसा पासून त्या स्थावर व जंगम जिंदगीवर आमची वहीवाट आहे ती स्थावर व जंगम जिंदगी तूं कोणास कोणतेही कारणास्तव लिहून वगैरे देऊं नये. व त्या भरोषावर कोणाचे कर्ज वगैर काढू नये. जर काढिल्यास तें आह्मी देणार नाहीं. तूं आमची साक्षांत चुलती आहेस. तुला अन्नवस्त्राबद्दल मुक्काम घानोरी येथें संभावित मंडळीच्या समक्ष पक्का ठराव रुपये ७५ पावणशे रुपये झाला. तें तूं कबूल केलेस नंतर तुझी कसी बुद्धि फिरली कळत नाहीं. तूं माझे राहते घरांतून सुंदरसा मेत झाल्या नंतर एक महिन्याचे आंत रुपये ४५० नगदी, दागीने सोन्याची आंगठी एक किंमत ४०, व भीकबाळी सोन्याची किंमत ५०, करदोडा चांदीचा वजनी ४० तोळे, कडी एक चांदीचे वजन तोळे २०, नथ सोन्याची साधारण किंमत ९०, कानांतल्या बुगड्या सोन्याच्या किंमत रुपये २०, मोती एक किंमत रुपये २५, पानबाळ्या सोन्याच्या दोन किंमत रुपये २५, तोड्याचा जोड एक चांदीचा वजन तोळे ८०, वाकीचा जोड चांदीचा वजन तोळे ३०, सरी १, सांकळी १, चांदीची व मनेरी सांकळी चांदीची १, एकंदर वजना तोळे ५० ह्या शिवाय दागीने कमी ज्यास्त चिल्हर रुपये १५० असे एकंदर नगदी रक्कम व दागीने मिळून रुपये १००० हजार होतात. हे सर्व नेलेली रक्कम व दागोने सर्व घेऊन यावें. घर तमचें आहे आणि आह्मी लेकरे तुमची आहो. येथून नेलेले दागीने तुह्मी कोणास विक्री वगैरे केल्यास ती जर आमचे नजरेस आल्यास त्या घेणारे इसमास आह्मी फजीत करून कोर्टाच्या मानाने जो परिणाम निघेल त्यास ते व तुह्मी पात्र व्हाल. वर लिहिलेली स्थावर जंगम जिंदगी वर तुमचे बिलकुल हक्क नाहीं. ह्मणून तुह्मी कोणास कोणतेही कारणा शिवाय लिहून वगैरे देऊं नये. दिल्यास तो दस्तऐवज रद्द समजला जाईल. व कोर्टांत तशा मनुष्याची फजीती केली जाईल. कळावें तारीख १२ माहे जानेवारी सन १८९४ इ०

(सही)
सही बक्षीसा व धनपा वा॥
भजनसा कलाल राहणार
मौजे घानोरी हाली मुक्काम
धूंगांव दस्तूर खुद.

## नोटीस.

विद्यमान डेप्युटि कमिशनर साहेब बहादूर जिल्हा अकोले यांचे कचेरीतून

सर्व लोकांस प्रसिद्ध करण्यांत येतें कीं अकोलें जिल्ह्यांतील बाजारचे लिलाव खालीं लिहिल्या तारखेस दिवसा बारा वाजतां त्या त्या तालुक्यांतील तहसिलदारांचे समोर केले जातील त्या तारखा.

| | |
|---|---|
| अकोलें तारीख | ५–२–९४ |
| अकोट तारीख | १२–२–९४ |
| बाळापूर तारीख | १९–२–९४ |
| खामगांव तारीख | २६–२–९४ |
| जळगांव तारीख | ३–३–९४ |

बाजार लिलावाच्या शर्तीं संबंधाचे नियम जे हल्लीं अमलांत आहेत त्या संबंधाची माहिती तहसिल कचेरींत मिळूं शकेल.

कळावें तारीख १२ माहे जानेवारी सन १८९४ इसवी.

R. P. Colomb
For
Deputy Commissioner.

## जाहिरात.

हे पाक-पद्दा व शिवाय ता. २६।१२।९२ इ. चे वैदर्भांत व शुद्धवऱ्हाडी पत्रांत छापलेल्या औषधी हमेशा मिळतील.

ह्या हेमंत ऋतूंत हिवाळ्यांत खाण्यानें पौष्टिक, शक्तिस्फूर्ति व स्मरण शक्ति, मिळेल;व हस्तपाद, कंबर सांधे, ठणका आणि सर्व वातविकार खात्रीनें नाहींसे होतात. बाळंतीणीस व सर्व स्त्रियांस शक्ती देणारी सौभाग्यसुंठ व सर्व पाक विक्रीस तयार आहेत. वाटेल त्यांनीं मागविल्यास आह्मी ह्याल्युपेबलनेंही पाठवूं. पोष्टखर्च निराळा पडेल. त्वरा करा, गेली वेळा पुन्हा येत नाहीं.

| | |
|---|---|
| १ सालममिश्रीपाक दर शेरास (८० तोळ्यास) | किंमत ३ |
| २ बदाम पाक | २॥ रु. |
| ३ सालममिश्री व बदाम प्रत २ | २ रु. |
| ४ सौभाग्यसुंठ | २ रु. |
| ५ कुष्मांड पाक | ५ रु. |
| ६ गोखरू पाक | ७ रु. |

७ प्रवाल, वंग वगैरे भस्में व औषधी तयार आहेत.

पत्ता — शिवचरणगीर रामगीर वैद्य कुरणखेडकर दवाखाना.

आकोला — वऱ्हाड.

## जाहिरात.

क्रिमिनल प्रोसिजर कोड.
(आक्ट नंबर १० सन १८८२.)
सटीक. आवृत्ती ३ री.

सदरहू आक्ट सन १८८२ पासून सन १८९३ अखेर १२ आक्टांवरून दुरुस्त झाला आहे, त्याप्रमाणें या आवृत्तींत दुरुस्ती केली आहे. सन १८९३ अखेरपर्यंत कलकत्ता मुंबई, मद्रास, व अलहाबाद हायकोर्टांनीं केलेले सर्व निवाडे ज्या त्या कलमाखालीं घातले आहेत. मुंबई हायकोर्टानें केलेले वटहुकूम ज्या त्या कलमावर घातले आहेत व इतर जरूर लागणारे फौजदारी आक्ट सुमारें १४, याजवरील निवाडे व दुरुस्त्या सुद्धां छापून वेगळे जोडले आहेत; सदरहू ग्रंथ माहे फेब्रुवारी सन १८९४ मध्यें तयार होऊन लोकांस मिळेल. याची अगाऊ किंमत माहे जानेवारी सन १८९४ अखेर घेणारांस रुपये ४ व टपाल खर्च ८८ आणे ठेविली आहे व मागाहून घेणारांस किंमत रुपये ६ व टपाल खर्च ८८ आणे पडेल.

| | |
|---|---|
| पुणें "न्यायाश्रय" आफीस ता० ३० नोव्हेंबर सन १८९३. | नरहरराव त्रिंबक राजमाचीकर. बी. ए. शिवराम हरी साठे. न्यायाश्रयकर्ते पुणें. |

☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

किरकोळ ... स ..........................४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसर खेपेस ...........०।

Single copy................................... 4as

Advertisement
Below 10 lines.. 2 Rs
per line over10... 4 as
Repetition per line 3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL XXVIII AKOLA MONDAY 29 JANUARY 1894 NO 5

वर्ष २८ आकोला सोमवार तारीख २९ माहे जानेवारी सन १८९४ इ० अंक ५

### सर्व नजरबंदांच्या माकडचेष्टांस ह्मणून पाडतां येतें.

मी रस्त्यांत जेव्हां झोकांडी खात चालत असें तेव्हां लोकांनीं माझ्याकडे बोट दाखवून हिणवावें कीं पहा काय बेटा झिंगून गेलेला आहे आणि प्रथम दर्शनीं तुह्मासही खास त्यांच्या सारखेंच वाटेलें असेंते. परंतु तें सर्व चुकत होतें. भर रस्त्यांत मला चालतांना झोकांड्या येतात म्हणून आपण मला विचाराल तर त्याचें समर्पक उत्तर देण्यास माझ्या आयुष्यक्रमाचें पूर्व मार्गावर थोडेसें गेलें पाहिजे.

आज तागाईत एखाद्या आनंदी व रंगेल मनुष्याप्रमाणें मी सुखी प्राणी होतों परंतु चार पांच वर्षांपूर्वी मला वाटूं लागलें कीं माझ्यांत काहीं कांहीं तरी कमी जास्त होत आहे. जेवतांना पूर्वीसारखी माझी क्षुधा राहिली नव्हती. मला भूक लागे व खाण्याची ईच्छा होई परंतु तोंडांत घास गेला कीं लागलीच पक्काशय उमळून येई व जसें कांहीं वेढावा करून माझ्या हेतूस ह्मणून पाडी. हें मला अरिष्ट नवीनच व त्याचें मला मोठें आश्चर्य वाटे. मी जेव्हां ह्मणून खाण्याचा आव घाली तेव्हां तेव्हां मला फारच तिटकारा येई. कदाचित पोटात कांहीं अन्न गेलें तर तें अन्न किंवा मांस न वाटतां एखाद्या शिशासारखें जड वाटे त्यामुळें निजायला जातांना आपल्यास जशी सुस्ती चढून थकवा येतो त्या प्रमाणें मला होत असे. ह्यामुळें रात्रीं झोपेचा कल अगदीं बदलला झोंप थोडी पण चांगली येई. कधीं कधीं बरोबर येत नसे, व धुंद झाल्यासारखें मला वाटे त्यामुळें मी केव्हा केव्हां अफू किंवा इतर अमली पदार्थ घेत असें. मी जीभ पाहातां तो तिच्यावर थर जमलेला आणि काम करण्याची हौस बिलकूल नाहींशी झालेली असे.

माझ्या बरगड्यांत आणि पाठीत सपाटून दुखत असे व कधीं कधीं ह्या वेदना खांद्यात माला टोंचल्यासारख्या वाटत. मी आरशांत पाहिलें तों माझे डोळे पिवळे दिसूं लागले. आणि माझ्या दांता व हिरड्या सभोंवतीं कीट जमलेला दिसे व मुखमार्जन करण्यास पाणी न मिळाल्यामुळें किंवा इतर साधनें दातांजवळ नसल्यामुळें माझ्या तोंडाची घाण फारच येई माझा कोठा फारच जड झाला आणि पक्वाशयांत घाणेरडा वायु उत्पन्न होऊन तोंडावाटे ढेंकर देतांना निवून जाई. ह्या वेळेस मला किती वाईट वाटत होतें हें मी कधीं विसरणार नाहीं. ह्या वेळीं रस्त्यांत चालत असता एकदम घेरी यावी, हलक वाटावें. आणि गरगर फिरल्यासारखें वाटून झोकांड्या देत चालावें व जमिनीवर सवंशेळ पडून नमस्कार घालावा लागत असें. माझ्यानें हें विघ्न जितकें टाळता येईल तेवढें टाळून येई व आता तें गेलें असें समजून तो दिवस घालवीत असे.

माझ्या मित्रमंडळीनें व वैद्यानें जीं जीं औषधें घेण्यास सांगितलीं तीं घेतलीं त्या पासून गुण न येता मी अगदीं सुदाम देव झालो. व आता ह्या वस्तीस रामराम ठोकून परलोकचा रस्ता धरावा असें मला वाटूं लागलें ह्या प्रमाणें माझा क्रम चालला होता.

आतां मी तुह्मांस थोडक्यांत निवेदन करतों कीं बरा कसा झालों ह्याचें कारण आपणास कळवावें हें अगदीं रास्त आहे. लंडनांत माझा एक स्नेही होता. त्याच्या कानावर माझी गोष्ट पडल्याबरोबर त्यानें सांगितलें कीं मदर सिजेलचा क्युरेटिव सिरप ( म्हणजे माता सिजेलचा रोगहारक पाक ) तुम्हांस फारच गुणकारी होईल.

माझा कांहीं ह्याच्या म्हणण्यावर भरंवसा बसेना. परंतु एक बाटली तर थोडे दिवस घेऊन पहावी ह्मणून विचार केला. मला ह्या औषधापासून इतका जलद गुण आला कीं मला खातांना बरें वाटावें व झोंप चांगली यावी. मला हें पथ्यावर पडल्यामुळें इतकें बरें वाटलें कीं मी ह्या औषधाच्या आणखी चार बाटल्या पार केल्या.

मी बरा झालों. हें औषध दैविका सारखें वाटलें. मला खचीत वाटलें कीं हें औषध ईश्वराच्या प्रेरणेनेंच मला मिळालें.

मी आतां पुन्हां ताजा तवाना झालों व त्यांमुळें ज्या मला आनंदाच्या उकळ्या फुटल्या त्या सांगता पूर्वत नाहींत. आतां कव्हां तरी थोडेंसें अपचन झालें कीं जें सर्वांस होत असतें, त्या वेळेस मी ह्या औषधाचा लहान घोट घेतो व लागलीच मला त्यापासून आराम वाटतो.

ह्याचा तात्काळ गुण आल्यामुळें मला नजरबंदीच्या खेळाची आठवण होते परंतु खरोखर माता सिजेलचा क्युरेटिव सिरपांत डोळ्यांत माती टाकण्यासारखा कांहीं प्रकार नाहीं. मला अनुभवावरून खात्रीनें सांगतां येतें कीं कितीही जुनाट अग्निमांद्य व अजीर्ण अगदीं वाईट स्थितीपासून असो तरी ह्या औषधा पासून हटकून गुण यावयाचाच.

मी तुमचा उपकार मानणारा
( सही ) जे. सी. सिमसन
२१ ब्रानेबरचा रस्ता, न्यूकास्टल अंडर लाइन, स्टाफर्ड शिरन

B. T.

---

### गप्पाष्टक

कामानंतर घटकाभर विश्रांती !

या पेक्षां अधिक महत्वाचें काम आपल्या हातून या वेळेला कांहीं होत नाहीं. आणि माझ्या सारखे आणखीही पुष्कळ असतील कीं ज्यांना महत्वाचीं व दगदगीचीं कामें दिवसभर केल्यामुळें आतां त्याचा अथवा तशाच कठीण दुसऱ्या कामाचा वीट आला असेल. काम महत्वाचें आणि दगदगीचेंच असलें पाहिजे असें नाहीं. तें सोपें व साधें कां असेना; पुष्कळ वेळ तेंच करीत राहिल्यानें त्याचा सुद्धा नाहीं कां कंटाळा येत? येतोच. आपलें शरीर कांहीं निर्जीव यंत्र नव्हे. आणि यंत्राचें तरी काय? त्याचा एकच भाग जर फार वेळ घांसला गेला अथवा त्याच्या एका अवयवांवरच जर फार बोजा पडला तर तें मोडतो व तें निर्जीव यंत्र सुद्धा बिघडतें, थकतें, थांबतें किंवा विसावा घेतें! तेव्हां सतत काम करण्याचें कामाचा आता ज्यांना कंटाळा आला असेल आणि तें नकोसें झालें असेल त्यानांही मला वाटतें त्या प्रमाणेंच कामाकडे घटकाभर पाठ फिरवावीसें वाटत असेल व घटकाभर विसावा घ्यावा असें वाटत असेल.

विश्रांति पाहिजे असें वाटलें ह्मणजे ती पाहिजेच असें समजावयाचें. याला दुसरें प्रमाण नको कारण या इच्छेचा—मात्र ती योग्य असली पाहिजे. अयोग्य ह्मणजे विकृत अशी नको— रोध करून हट्टानें आणखी तसेंच काम करा आणि पहा शरीराचि व मनाची काय दुर्दशा होते ती बरें? ह्मणून कामाचा कंटाळा आल्याचा इषारा दिल्यावर ह्मणजे विश्रांति पाहिजे असें वाटल्यावर काम सोडून देवू। घडीभर विसावा घेवू। पहा काय चमत्कार होतो तो? केलेल्या श्रमाचा परिहार होईल, नवीन कामाला उत्साह येईल, मन प्रसन्न होईल व शरीर मनाला अनुकूल राहील.

श्रम कोणत्याही प्रकारचा असो. शारीरिक असो वा मानसिक असो. त्या विकारावर स्वस्थतेची मात्रा चांगली लागू पडतेच. हटकून गुण देते. काम करून कंटाळा आला कीं विसांवा घ्यावा. त्यापासून कामामुळें मनाला व शरीराला जो थकवा येतो तो दूर होतो व त्यांना जो झीज लागते तो भरून येते. कामाचे हितकारक परिणाम शरीरांवर आणि मनावर होतात ते त्यांस विसावा दिला ह्मणजे तेंच कायम होतात व पुढें अधिक जोरानें काम करण्यास शक्ति देतात व तीस कायम राखितात.

तेव्हा आह्माला काम जर पाहिजे तर विसावाही पाहिजे, आणि विसावा जर पाहिजे तर कामही पाहिजे. चांगलें काम केल्या खेरीज चांगली विश्रांति मिळत नाहीं व चांगल्या विश्रांती खेरीज चांगलें काम ही होत नाहीं. काम आणि विश्रांति हीं दोन्ही एकमेकांवर इतकीं अवलंबून आहेत. काम करणें हें वस्तुस्थितिनुरूप प्रत्येकाला भाग आहे तेव्हां विश्रांति घेणें हा भागच आहे. आतां ही विश्रांति आह्माला काम नको ह्मणून पाहिजे आहे असें नाहीं तर अधिक काम पाहिजे ह्मणून पाहिजे आहे. विश्रांति घेणें ह्मणजे काम न करणें अशी जर कोणाची समजूत असेल तर ती चुकीची आहे; कारण विश्रांति घेत असतांनाही आपण काम करण्या इतकेंच महत्वाचें काम करीत असतो. किंबहुना त्याहून अधिक. कांहीं करतो त्या वेळीं आपण एक काम करितो व कांहीं करीत नाहीं त्या वेळीं आपण दोन कामें करितो! दिसतो मात्र स्वस्थ पण केवढा उद्योग आंत चालू असतो. पूर्वीच्या श्रमामुळें लागलेली झीज भरून काढतो हें एक व पुढच्या उद्योगासाठीं शक्तिसंचय करीत असतो हें दुसरें! तेव्हा काम न करणें; विश्रांति घेणें अथवा स्वस्थ बसणें ह्मणजे मागल्या उद्योगानें केलेलें कर्ज वारून पुढल्या उद्योगासाठीं मोडवळ जमविणें होय. विश्रांतीचें महत्व किती आहे पहा. पूर्वी काम केल्यामुळें स्वस्थता स्वतः सुखावह होते ह्मणून आपणास ती पाहिजे व पुढें काम करणें आवश्यक व इष्ट आहे ह्मणूनही ती आपणास पाहिजे.

झालें, आपलें काम संपलें, मनाची एकाग्रता मोडली, मनावरील ओझें उतरलें, आणि आपण स्वस्थ बसलो. शुद्ध आणि निरुपाधिक स्वस्थता ही एक उपभोग्य स्थिती आहे यांत संशय नाहीं. शरीर आणि मन शिथील केलें, विचार आणि विकार हांकून दिले आणि आपण जीव— प्रवाहावर स्वस्थ उताणे पडून वहात चाललो अशा वेळचें सुख ज्याचें त्यास ठाऊक! तें अवर्णनीय आणि अनुपम खचित. पण तें किती जणांना किती वेळ अनुभविता येतें? जो हटकून झोंपेंत नेऊन टाकते ह्मणून मुमुक्षूला देखील ज्या स्वस्थ स्थिती विषयीं सावध रहावें लागतें ती आमच्या सारख्या गैरसावधांनां तेव्हांच काबीज करून गाफल करून सोडील यात नवल काय? तेव्हां ही स्थिती उपभोग्य खरी तथापि आह्मी बहुतेक व्यवहारिक जन तिचा उपभोग घेण्याला असमर्थ आहो. चित्तशांतीनें हें सुख आह्माला जर अनुभवितां येत नाहीं. आह्मा धाडांत्यांना जर तें कळत नाहीं तर तिच्या पाशीं सुखावह असें दुसरें देण्याला कांहीं नाहीं. जें आहे तें घेता येत नाहीं व दुसरें मिळत नाहीं तर या अकारणरूपी शून्याकारक स्वस्थ स्थितीचा आह्माला काय उपयोग होणार! झाल्यास फारच थोडा होईल. कांहीं उपयोग नच झाल्यास व नच करून घेतल्यास दुसरें गात्र तिचा उपयोग करून घेतील आणि आयासानें मिळविलेली स्वस्थता घन्याचें आंगीं लागू देणार नाहींत. कारण तिच्या पाठोपाठ चिंता दिवसभर केलेल्या कामा संबंधाचेच विचार किंवा अधिक झाली असतां त्रासदायक होणारी एकाग्रता ज्यांनां लागते अथवा ज्यामुळें येते असले विचार अथवा सूक्ष्म विकार मनांत आले व त्यांनीं मनाला ग्रासले तर स्वस्थतेची ही नपुंसक स्थिती नको व तिजपेक्षां कांहीं कामच बरें असें वाटण्याचा पुष्कळ संभव आहे.

या शुद्ध स्वस्थतेच्या स्थितींत हे दोन मोठे दगे आहेत. एक तर झोंप तिज पासून अगदीं जवळ असल्यामुळें ती बेमालूम—झोंप त्या वेळीं नको असतां—झोंपेंत नेऊन सोडते व दुसरें मनोभूमि त्या वेळीं रिकामी अस-

ह्या मुळें जोरदार मनावृत्तींना व पक्क विचारांना, आपल्या इच्छेविरुद्ध, निलवार येऊन अकांड-तांडव करायाला लागलें फार्ते. पहिला अनर्थ झाला असतां स्वस्थतेचा आह्मा चांगला उपयोग करून घेतला असें होत नाहीं व दुसरा झाला असतां आह्मी स्वस्थता मिळविली असेंच होत नाहीं

( पुढें चालेल )

वऱ्हाडसमाचार

मिती पौष वद्य ८ सके १८१५

## नायब तहशिलदारी.

तालुक्याचा मुख्य नायक म्हणजे तहशीलदार आणि नायब तहशीलदार हा तालुक्याचा दुय्यम अधिकारी होय. या शेवटील हुद्यावरील गृहस्थावर विशेष प्रकारच्या जबाबदाऱ्या असतात. त्याला हिशेबी ज्ञान चांगलें पाहिजे. मुलकी कायदे ठाऊक असावीं लागतात. दिवाणी कडील छोटेखानी न्यायाधीश हेच असतात. हे खजिनदारही असतात. आणि सर्व प्रकारचीं फडाणिशी यांच्या वरच पडते. सारांश, तहशीलदाराचा उजवा हात किंबहुना तहशीलदाराचे डोळे म्हणजे नायब तहशीलदार असतात. पुढें मागें तहशीलदारीच्या जागेचा अधिकारी हेच गृहस्थ होणारे असतात. बहुत बहुत रयत लोकांशी यांचा संबंध पडतो तहशीलदार व रयत या उभयता मधील पेष्कार हे सेक्रेटरी व दुभाषे. आहेत. लोकांच्या गरजा, उणिवा, व दुःखें हीं नायब तहशीलदारास चांगलीं ठाऊक असलीं पाहिजेत. रयतेच्या व सरकारच्या दरम्यान पहिला सुजाण असा अधिकारी हाच होय. तात्पर्य सर्व कामधामाचा पाया नायब तहशीलदारांस रचावा लागतो आणि सर्व कागदपत्र तयार त्यांसच ठेवावे लागतात. तालुक्यांतील अशा कामधामावर व कागदपत्रावर निकाल व निवाडा मात्र करणें तहशीलदारां कडेस असतें.

आकोल्याची ही जागा कालगतीनें रिकामी आहे. त्यावर कोणा गृहस्थाची नेमणूक होते हें पाहणें आहे. वरील प्रकारची कामें करण्याची योग्यता त्या अधिकाऱ्यांच्या अंगी असली तरच तो लायक मनुष्य ठरला जाईल. कर्नल मेकंझी कमिशनर यांच्या हातीं ही जागा भरावयाची आहे साहेब मजकुरांस जागेचा दर्जा कळत नाहीं व मनुष्याची पारख नाहीं असें आम्ही सांगण्यास तयार नाहीं. परंतु अनेक प्रसंगी त्यांची निवड चुकीची, गैरवाकबपणाची, व भिडस्तपणाची असते. वरील जागे साठीं अर्ज, शिफारसी, व जुळवा जुळवी हीं अनेक होतील हें कोणही सांगेल परंतु त्या मधून योग्य निवड करणें शहाण्या समजूतदार अधिकाऱ्याचें काम आहे आणि कमिशनर काय करितात हें पाहण्या कडे सर्वांचे डोळे लागले आहेत.

शाळांशी इतर खात्यांतील नेमणुका नियमानें, हक्कानें, व योग्यतेनें होत असतात. आणि त्या तशा होणें इतर खात्यांचा प्रकृतिधर्मच बनला आहे. सर रेमंड वेस्ट साहेबांनीं मुंबई इलाख्यांतील न्यायखातें आपल्या शहाणपणाच्या जोरानें व विद्येच्या गाढीनें उत्तम करून दिलें तसें मुलकीखातें सुयंत्र करण्याचें श्रेय कर्नल मेकंझी रेव्हेन्यू कमिशनर हे घेतील असें आह्मी मना वाटून इच्छितों. आणि त्या सुकार्याचा आरंभ करण्याचा सांप्रतचा योग उत्तम आहे. विद्येला मान मिळावा, अनुभवाची योग्यता पहावी व सरकारी कामकाजात न्यायाला सोडून मेहरबानी करूं नये हें तत्वज्ञान सोपें दिसतें पण त्यच कठीणपण या प्रसंगीं कर्नल साहेबांस विचारा अंतीं कळून येईल. कर्नल लेन साहेबांनीं एक नवा उत्तम नियम घातला आहे. तो असा कीं पुष्कळ अर्जदार असले ह्मणजे परीक्षा घेऊन नंतर त्यां मधून योग्य इसम निवडावा. हा नियम कर्नल मेकंझी साहेब यावेळीं लागूं करितील तर बरें! नाहीं तर मनुष्य चिंतितो एक व देव करितो दुसरेंच! मेकंझी साहेब निदान या जागे पुरते देव आहेत तेव्हां देव काय केल देतात तें पहावें.

## The Berar Samachar

MONDAY JANUARY, 29, 1894

### OTHER SIDE OF A *SERIOUS* QUESTION or THE DIRECTORSHIP OF BERAR

The Pramoda Sindhu of the 19th. Instant has written a very stirring article in connection with the Directorship of Berar. The article is more in the spirit of the bar than that of the bench. As is our wont we could have easily passed it over and ignored it. But it often happens that dangerous propositions are sometimes asserted and when they are treated as they are worth with the silvery eloquence of Silence they come again to be smuggled as raw productions of the soil. The article, as we understand it, advocates the cause of Natives and supports them as the proper claimants for the post. It moves the Sarvajanic Sabha of Berar to move itself "once more" in the matter. It also condemns the Government for a breach of solemn promise if they deviate from the established rule. And it prefers a foreigner, no matter, however endowed with administrative capacities, provided he were a Native to any European, whatever his claims to this post. No doubt the advocacy is a good one in its own way. The same paper had an article only in November last. The present article is written, much in the same strain, though with somewhat different arguments and in an altogether different style.

It is no business of ourselves to criticise the qualifications of Mr. Mahajani for the post. We can not go so far as the PramodSindhu to assert that Mr. Mahajani's experience in Educational matters stands next to that of no body either in Berar or elsewhere. Men like Mr. Sitaram Vishwanath Patwardhan and Mr. Balvant Ramchandra Sahasrbudhe of the Bombay Educational Department of a decidedly greater length of actual service are not to be compared with Mr. Mahajani. It must be remembered after a varied career as teacher, Deputy Educational Inspector and officiating Educational Inspector Mr. Sahasrabudhe now fills the same post from which Rao Bahadur Dandekar was called to this province. Nor are we prepared to compare Mr. Mahajani with Mr. V. N. Phatak of Poona and Prof: Abaji Vishnu Kathawate occupying the chair of Oriental Languages, Deccan College. Nor are we disposed to point to the only Native Educational Inspector in Madras and in Bengal. It is a known fact that the Educational Inspector of Berar is simply an inspecting and a forwarding officer; the Berar Educational Manual and the various reports of the Director of Public Instruction bear out this proposition. We too have as much respect for Mr. Mahajani's scholarship and intelligence, energy and hardwork as the Pramod Sindu has. But whether Mr. Mahajani is or is not competent for the post is not the point at issue. We therefore are not disposed to enter deeper into the matter. But it must be remembered that scholarship is no great qualification for the post. Again scholarship cannot be measured by mere academic distinctions so much boasted of by the Pramod Sindhu. On Rao Bahadur Dandekar's administration there can be but one opinion. We, like the Pramod Sindhu, are of the same convictions with those of the Local Government that his administration was a complete, entire, and bold success. Yet what academical distinctions had he? Can his scholarship be impeached for want of them? Moreover no sane man can make academic tests of solely Indian Universities, at which non-academic men of English extraction are often the most sound examiners, the sole qualification for eligibility to such posts demanding high administrative capacities. But this too is not a point at issue.

The real points involved in this question are:—

(*I*) How far is the Sarvajanik Sabha justified in moving in a matter little palatable to the people in general?

(*II*) Is the place reserved for natives?

(*III*) Supposing it is reserved for natives are any deviations from the policy just?

(*IV*) If these grounds be overruled who should be properly selected for the post and who he should be whether a Nativé or European?

(I) The proceedings of the Sarvajanik Sabha in this particular matter appear to be very doubtful. The Pramod Sindhu has not definitely said what the Sabha has once done. The Editor of the paper is also a member of the Sabha and its Secretary. The resolution of the Sabha and its action have been unknown to us. No doubt the Sabha is yet in its infant state. Has it ascertained the public opinion on this matter? Much may be said about the Sabha itself, as regards its constitution, functions, procedure, &c. But this is no place for a criticism on it and we decline to express our opinions till we find the Sabha persisting in attributing to the masses the opinions of the individual members. Suffice it to say that if the Sabha has done anything in the matter it has done a very unwise thing under an ambiguous designation and if it does anything in future it will have done something very wrong and opposed to the very principles of such Sabhas. If the Sabha moves further into the matter as the Secretary of the Sabha suggests in his paper under his editorial, it remains to be seen what can be done under similar circumstances. We have greatest respect for several of the members of the Sabha and we have so much confidence in their singleness of eye, rectitude, and honesty of purpose that they will not prostitute such solemn institutions for giving vent to their personal opinions however conclusive and desirable sound and convincing to themselves. One dissent from them precludes the body from being Sarvajanika. But we are here dwelling upon a point that, we are sure, probably does not exist and if it existed sure to be given up. We agree no doubt with a portion of the agreement but not wholly and entirely with it. We are sure Akola has a right to veto the resolutions of a Sabha which boasts even to represent it. Thus far and no further for the present.

II Having clearly shown that the Sabha has no right to send in petitions of this nature under ambiguous designations, we want to see whether the post is reserved for Natives. Much may be said even on this head. But for various reasons we would assume that the place has been reserved for Natives. If it be not we would contend that it has been. We would ever wish it filled up by Natives.

III Now then assuring that the place has been reserved for Natives, the next point to be considered is whether any deviations from the established rule are or will be justifiable. Such a rule must have been made or an understanding in keeping with such a rule must have been established in 1875 after the demise of the late Doctor Sinclair. But are any rules, however congenial to the sacred fancies of a people, to have a retrospective effect? A man has a right to do what he can without doing anything prejudicial to the interests of any body else. Those who entened the service before such a rule as that existed have no right to be barred from the working of such a rule if it were made after they entered it. Otherwise every service will look like a hive of summer bees. A vigorous and an earnest discharge of duties can not be expected from a public servant who had had fair chances for promotion and rewards if he honestly discharged his duties and were afterwards cut off from all hopes of gain by an injudicious inactment. The argument that such men are allowed an undisturbed possession of what they possess is an argument of the wolf against the lamb. It is an argument of those enemies to liberty and freedom who denied emancipation to the Catholics and the Jews and also of those who deny it to the Hindus and the Irish men even at present. There is already in the Educational Department of Berar an English gentleman who has done immense service to the cause of Education. He entered the Department at the time when the idea of a native head of that administration was not even dreampt of. After a gentle man who got less than this gentleman, who had no other recommendation, as he himself says in his first report, except the lame one of long experience, was placed over this officer's head all other Englishmen then in the Department washed their hands of it. But this gentleman first showed by his example that that Englishmen could serve under the official authority of the Natives of India without at the same time degenerating them selves into men who their English brethren dread them to be. In fact, he established a new principle! Does this gentleman, if not for anything else at least for this self sacrifice, not deserve our esteem and gratitude? He